# "मी कां लिहितों ?"

भा
१८२

नगर वाचनालय
ता.
सातारा.

भा
१५८

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

मूल्य
३
रुपये

प्रतिभा प्रकाशन, औरंगाबाद.

प्रकाशकः—
श्री. न. मा. कुळकर्णी
व्यवस्थापक,
प्रतिभाप्रकाशन, औरंगाबाद.

१२८

— सर्व हक्क लेखकांचे स्वाधीन
— मुखपृष्ठावरील चित्र दलाल
— प्रथम मुद्रण १९४९

मुद्रकः—
श्री. जी. आर. अग्रवाल
प्रोप्रायटर,
जगन्नाथ प्रेस, औरंगाबाद.

# प्रारंभीं —

एखाद्या जिवावरच्या आजारांतून आपलें अपत्य बाहेर पडल्यावर जो आनंद व्हावा तसा आनंद प्रतिभा प्रकाशनाचें "मी कां लिहितों ?" हें दुसरें पुष्प वाचकांच्या हातीं देतांना आम्हांस होत आहे. ह्या पुस्तकाच्या मुद्रणास सुरुवात होऊन आज उणींपुरीं दोन वर्षे होत आहेत. मुद्रण चालू असतांना हैद्राबाद संस्थानांतील राजकीय परिस्थिति सारखी चिघळत जाऊन मुद्रणकार्यांत बरेच अडथळे निर्माण झाले. मानवी जीवितच जेथें अशाश्वत ठरलें तेथें त्यावर आधारलेल्या संस्था व अंगीकारिलेलें कार्य स्थगित करण्याचा प्रसंग यावा यांत आश्चर्य नाहीं. मुद्रणस्वातंत्र्यावरील तत्कालीन बंधनें, इतरत्र कोठेंहि पुस्तक छापण्याची अशक्यता, कागदावरील नियंत्रण व मराठवाड्यांतील अल्प व जीर्ण मुद्रणसामुग्री यांचा विचार करतां पुस्तकांत राहिलेल्या उणीवा वाचकांच्या सहानुभूतीनें व आपलेपणानें भरून निघतील असा विश्वास वाटतो.

या पुस्तकांत संग्रहित असलेलीं सर्व भाषणें औरंगाबाद नभोवाणी केंद्रावरून ध्वनिक्षेपित करण्यांत आलीं आहेत. केन्द्राधिकारी, व मराठी विभागाचे प्रमुख श्री. वा. रा. कान्त यांच्या कृपेनें तीं प्रकाशित करण्याची संधि मिळाली आहे याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत ऋणी आहोंत. तसेंच ज्या सहृदय साहित्यिकांनीं आपआपलें लिखाण विनामूल्य प्रकाशित करण्याची आम्हांस परवानगी दिली याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत. कांहीं नामवंत साहित्यिकांचे या विषयावरील विचार या संग्रहांत समाविष्ट करण्याच्या कामीं, प्रयत्न करूनहि, यश आलें नाहीं याबद्दल खेद वाटतो.

विविध व्यवसाय मागें असतांनासुद्धां आमच्या विनंतीस मान देऊन आचार्य अत्रे यांनीं सवड काढून या पुस्तकास प्रस्तावना लिहून दिली याबद्दल, आम्ही त्यांचे अंत:करणपूर्वक आभार मानतों.

१५ ऑगस्ट
१९४९
औरंगाबाद.

न. मा. कुळकर्णी
व्यवस्थापक
प्रतिभा प्रकाशन, औरंगाबाद.

अनुक्रमणिका

# " मी कां लिहितों ? "


| | | |
|---|---|---|
| १ | श्री. न. चिं. केळकर | १ |
| २ | आचार्य काका कालेलकर | ९ |
| ३ | श्री. मामा वरेरकर | १७ |
| ४ | श्री. प्रा. न. र. फाटक | २६ |
| ५ | श्री. चिं. वि. जोशी | ३६ |
| ६ | प्रा. ना. सी. फडके | ४६ |
| ७ | श्री. वि. स. खांडेकर | ५३ |
| ८ | राजकवि यशवंत | ६२ |
| ९ | श्री. अनिल | ६९ |
| १० | श्री. य. गो. जोशी | ७९ |
| ११ | श्री. पु. य. देशपांडे | ८७ |
| १२ | श्री. दिवाकर कृष्ण केळकर | ९६ |
| १३ | सौ. कुसुमावतीबाई देशपांडे | १०४ |
| १४ | श्री. अनंत काणेकर | ११२ |
| १५ | श्री. प्रभाकर पाध्ये | ११९ |
| १६ | श्री. बा. सी मर्ढेकर | १२९ |
| १७ | प्रा. श्री. के. क्षीरसागर | १३८ |
| १८ | सौ. कमळाबाई टिळक | १४५ |
| १९ | सौ. संजीवनी मराठे | १५३ |
| २० | श्री. कुसुमाग्रज | १६० |



SHRI.CHA.PRATAPSINH
MAHARAJ (THORALE)
NAGAR WACHNALAYA, SATARA
128

साहित्यसम्राट न. चिं. केळकर

यांच्या

**पुण्यस्मृतीस**

# तुम्ही कां लिहितां ?

' कां हो, तुम्ही कां लिहितां ? ' असें महाराष्ट्रांतल्या लेखकांना आजपर्यंत कोणीं विचारलें नव्हते. लेखकांनीं लिहावयाचें आणि वाचकांनीं तें वाचायाचें ( बहुधा, वाचायचेंच नाहीं ! ) असा खाक्या आजपर्यंत चालू होता. आपण कां लिहितो याचा लेखकांनींहि कधीं विचार केला नव्हता आणि हे लोक कां लिहितात याची वाचकांनींहि पण कधीं पंचाईत केली नव्हती. जगांतले अनेक व्यवहार जसे आंधळेपणानें चाललेले असतात तसा शब्दसृष्टीमधला हाहि उद्योग आतांपर्यंत बिनबोभाट चालू होता. शेवटीं महाराष्ट्रांतल्या लेखकांना हा प्रश्न औरंगाबादच्या नभोवाणीनें विचारला. फार चांगली गोष्ट झाली. असा प्रश्न यापूर्वीच आमच्या लेखकांना कोणीतरी विचारायलाच पाहिजे होता. हा प्रश्न दिसायला दिसतो बावळटासारखा. पण तसा तो नाहीं. त्यांत मोठी मखली आहे. तो विचारणाऱ्याच्या मनांतली भावना काय आहे हें कळणें कठीण आहे. ज्याला हा प्रश्न केला जातो त्या लेखकाच्या लायकीवरूनच प्रश्नकाराच्या मनांतली भावना कोणती आहे तें समजू शकते अशी यांत मौज आहे. जातिवंत लेखकाला आपण असा प्रश्न केला तर त्यांत आपली नम्रता आणि जिज्ञासा प्रकट होते. आणि भिकार लेखकाला आपण हाच प्रश्न विचारला तर त्यांत आपली चीड आणि संताप व्यक्त होतो. पण त्याचबरोबर ह्यांत दुसरी मोठी गंमत अशी आहे कीं, प्रश्नकार कोणत्या भावनेनें हा प्रश्न विचारीत आहे हें एकदम लेखकांच्या ध्यानांत येत नाहीं. आणि सामान्य लेखकाच्या तर तें कधींच लक्षांत येण्यासारखें नाहीं. केवळ हा प्रश्न विचारल्यानेंच आपल्या लेखनाचा फार मोठा गौरव झाला असा त्याचा (गैर) समज होतो आणि त्या भरांत तो अशीं कांहीं उत्तरें देऊं लागतो कीं,

आपलें हंसता हंसता पोट दुखून येते. औरंगाबाद नभोवाणीनें महाराष्ट्रांतल्या वीस लेखकांना "तुम्ही कां लिहितां ?" हा प्रश्न केवळ त्यांना 'बनविण्या'च्या हेतूनें विचारलेला आहे असें मी मुळींच म्हणत नाहीं. तसें मी कसें म्हणूं ? या वीस लेखकांपैकीं सर्वच लेखक असामान्य प्रतिभेचे आणि कर्तृत्वाचे आहेत, असें नाहीं. पण त्यांपैकीं बहुतेकजण वाङ्मयाच्या ह्या ना त्या क्षेत्रांत पुष्कळच नांवाजलेले आहेत. असें जरी असलें तरी प्रत्येकाच्या प्रतिभेंत किंवा कर्तृत्वांत कांहीं ना कांहीं तरी उणेपणा हा असतोच. त्यामुळें 'तुम्ही कां लिहितां ?' या चमत्कारिक प्रश्नाला उत्तर देतांना त्याच्या बुद्धीचा मोठा गंमतीदार गोंधळ उडून गेलेला आहे. बऱ्याच जणांना हा प्रश्नच मुळीं कळला नाहीं. 'तुम्ही कां लिहितां ?' या प्रश्नाला उत्तरें देण्याऐवजीं 'तुम्हीं कसें लिहितां ?' किंवा 'तुम्ही केव्हांपासून लिहितां ?' या प्रश्नालाच त्यांनीं उत्तरें देऊन टाकलेलीं आहेत. कोर्टांत पहिल्यानेंच येणारा खेडवळ साक्षीदार जसा वकीलाच्या प्रश्नानें गांगरून जातो आणि त्या प्रश्नाला उत्तर देण्याच्या ओघांत इतर गैरलागू गोष्टी सांगून जसा मोकळा होतो तशी कांहीं लेखकांची या प्रश्नाला उत्तर देतांना स्थिति झाली आहे. कांहीं लेखकांनीं तर हा प्रश्न विचारणावरच प्रतिप्रश्नांची उलट फैर झाडलेली आहे ? सूर्य कां उगवतो ? फुलें कां फुलतात ? पाऊस कां पडतो ? कोंबडी कां अंडीं घालते ? एका सरळ प्रश्नाला उत्तर देण्याची ही अजब तऱ्हा फक्त लेखकांच्या दुनियेंत आढळेल. व्यवहारी माणसांच्या सृष्टींत आढळणार नाहीं. एकंदरीत 'तुम्ही कां लिहितां ?' या साध्या प्रश्नाला उत्तरें देतांना महाराष्ट्रांतल्या आमच्या लेखकांनीं खूपच मौज उडवून दिलीं आहे. म्हणून हें पुस्तक वाचतांना वाचकांची बोधाबरोबर करमणूकहि भरपूर होणार आहे. मामा वरेरकर म्हणतात, "हा मला लहानपणापासूनचा रोग आहे. तो अभ्यासानें वाढलेला आहे आणि तो मेरेपर्यंत तसाच राहणार !" हा 'रोग' आपल्याला कसा झाला ह्याचें मामांनीं इत्थंभूत वर्णन केलेलें आहे पण तो

त्यांना कां झाला ह्याची त्यावरून कल्पना येत नाहीं. हिंदुस्थानांत प्रवास केल्यानें आपल्याला लेखनांत ‘ अखिल भारतीय दृष्टि ’ प्राप्त झाली हें मामांनीं दिलेलें उत्तर महाराष्ट्राच्या विनोदी वाङ्मयांत अमर झाल्यावांचून राहणार नाहीं.

चिंतामणराव जोशी म्हणतात कीं “ माझ्या हाताला एक प्रकारची खाजच सुटते. ती शमविण्याकरितां मी लिहायला सुरुवात केली. ” प्रा. फडके म्हणतात कीं, “ लोक वाचतात म्हणून मी लिहितों. लोकांसाठीं मी लिहितों. ” एखाद्या माणसाला जर आपण विचारलें कीं, “ कायरे, तूं प्रवास कां करतोस ? ” त्या प्रश्नाला, “ प्रवासाचीं साधनें आहेत म्हणून मी प्रवास करतों. जी. आय. पी. कंपनीसाठीं मी प्रवास करतों ” असें त्यानें उत्तर द्यावें तशापैकीं प्रा. फडक्यांचें हें उत्तर आहे. त्यावरून मूळ प्रश्नासंबंधीं त्यांचें मनोगत काय आहे हें जरी कळत नाहीं तरी त्यांचा स्वभावधर्म कसा आहे याचा उत्तम बोध होतो. प्रा. न. र. फाटक यांनीं आपलें सरळ उत्तर देऊन टाकलें आहे कीं, “ वर्तमानपत्राच्या कचेरींत खर्डेघाशी करणें हा व्यवसाय आपण पत्करला म्हणून लिहूं लागलों.” केळकर आणि खांडेकर हे दोघे निरनिराळ्या हेतूसाठीं निरनिराळे लेखन करतात. केळकर म्हणतात, “ कांहीं लिखाण मी आनंदाकरतां लिहितों. कांहीं डोक्यांत नाचणाऱ्या ‘ भूतां’ना गाडण्यासाठीं लिहितों. आणि प्रस्तावना, अभिप्राय वगैरे लिखाण मी भिडेखातर लिहितों.” खांडेकर म्हणतात, “ चित्रपट मी पोटाकरतां लिहितों. गोष्टी आनंदासाठीं लिहितों. आणि कादंबऱ्या ध्येयासाठीं लिहितों.” आपण कां लिहितो याबद्दल प्रत्येक लेखकानें केलेली कारणमीमांसा थोड्याफार प्रमाणानें वेगवेगळी असली तरी आपण आंतरिक तळमळीमुळें लिहितो, आत्माविष्कारासाठीं लिहितो किंवा त्यामुळें एक प्रकारचा ब्रम्हानंद प्राप्त होतो म्हणून लिहितो असेंच सर्वांचें सारखें म्हणणें आहे. असें असूनही कालेलकर,

अनिल, य. गो. जोशी, प्रभाकर पाध्ये आणि क्षीरसागर ह्यांनीं या प्रश्नाला दिलेलीं उत्तरें वैशिष्ठ्यपूर्ण आणि चिंतनीय आहेत. ' जितक्या म्हणून प्रवृत्तींत भाग घ्यावा, सेवावृत्तीमधून जितक्या म्हणून ऊर्मि उठाव्या ! त्या सर्वांचें अवसान सरतेशेवटीं तद्विषयक लेखांतच होतें', ह्यांत कालेलकरांच्या जीवनाचें उदात्त तत्वज्ञान प्रकट झाले आहे. ' जीर्ण जगाच्या अमानुष अर्थव्यवस्थेच्या संस्कृतीला माझें मन विटलें आहे. तीविषयीं माझ्या मनांत त्वेष भरला आहे. नव्या जगाची मला ओढ लागली आहे. म्हणून मी लिहितों. इतर दुसरें मी काय करणार ?' हें ' अनिलां'चें उत्तर त्यांच्या असामान्य प्रतिभेला सर्वस्वी शोभणारें असेंच आहे. ' जेथें जेथें मला ' माणूस ' दिसतो तेथें तेथें माझी लेखणी धांवते. माणूसकीचा शोध करण्यासाठीं मी लिहितों ' हें ' य. गो. ' यांचें उत्तर त्यांच्या लेखनाचें सारसर्वस्व आहे हें त्यांच्या साहित्याशीं परिचित असणाऱ्यांना सांगावयास नकोच. ' कोंकणाच्या सौंदर्यावरील आपल्या अपरंपार प्रेमामुळें आपण लिहितो ', हें प्रभाकर पाध्ये यांचें उत्तर खरोखरच पाश्चात्य देशांतील एखाद्या महाकवीला शोभण्यासारखें आहे ! फार काव्य भरलें आहे या उत्तरांत ! क्षीरसागर हे स्वतःला सौंदर्यवादाचे रखवालदार समजतात. अरसिक आणि मूर्ख लोकांपासून जगांतल्या सौंदर्यदृष्टीचें संरक्षण करणें हें आपलें जीवितकार्य आहे असें ते मानतात आणि त्याप्रीत्यर्थ ते आपला जीवहि द्यायला तयार आहेत ! क्षीरसागर हे एक अत्यंत प्रामाणिक आणि विलक्षण तळमळीचे लेखक आहेत हें मला माहित आहे म्हणून, नाहींतर त्यांच्या भूमिकेची मीं थोडीशी थट्टा केली असती. तथापि, क्षीरसागरानीं पत्करलेली भूमिका ही मराठी वाङ्मयांत तरी अभिनव आहे यांत मुळींच शंका नाहीं.

' तुम्ही कां लिहितां ? ' हा प्रश्न केवळ मानसशास्त्राचा नसून तो ध्येयवादाचा आहे. ही गोष्ट फार थोड्या लेखकांच्या लक्ष्यांत आलेली

आहे. तुम्ही आपल्या आयुष्यांत पहिल्यानें लेखनाला सुरुवात कशी केली हें जाणून घेण्याचा ह्या प्रश्नाचा आशय नाहीं. कोणीं कशीं कां सुरुवात केली असेना ! पण जाणीवेच्या अवस्थेला येऊन पोहोंचल्यानंतर लेखक कां लिहितो हें प्रश्नकाराला जाणून घ्यावयाचें आहे. आत्माविष्कारासाठीं मी लिहितों किंवा मला त्यांत ब्रह्मानंद वाटतो म्हणून मी लिहितों या म्हणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. काय तुम्हांला प्रकट करावयाचें आहे ? कशासाठीं तें प्रकट करावयाचें आहे ? त्याच्यावाचून कांहीं समाजाचें अडलें आहे का ? तुम्हांला तुमच्या लेखनामुळें आनंद वाटत असेल ! पण इतरांना तें वाचून तसा आनंद वाटतो का ? त्या आनंदाचें उद्दिष्ट काय ? अशा अनेक शंका लेखकांच्या उत्तरांमधून निर्माण होतात. त्यांचा उलगडा कांहीं कोणीं केलेला नाहीं. कसें कां असेना, औरंगाबाद नभोवाणीनें ' तुम्ही कां लिहितां ?, हा मार्मिक प्रश्न विचारून महाराष्ट्रांतल्या लेखकांना त्यासंबंधीं विचार करावयाला लावले ही कांहीं लहानसहान गोष्ट नाहीं. याचा झाला तर एकच उपयोग होईल. आजपर्यंत ' आपण कां लिहितो ' याबद्दल कसलाहि विचार न करतां जे लेखक लिहीत आले असतील, ते यापुढें लेखणी उचलतांना अगोदर या प्रश्नाचा विचार करतील ! असें जर होईल तर साहित्यावर केवढें उपकार होतील बरें ! त्यामुळें पुष्कळसे लेखक कमी लिहूं लागतील आणि प्रत्यहीं भरमसाटपणें प्रसिद्ध होणारें लिखाण वाचण्याचें ( किंवा टाळण्याचें ) संकट तरी वाचकांवर ओढवणार नाहीं !

मुंबई
१ मे १९४९

**प्रल्हाद केशव अत्रे.**

नगर वाचनालय ता. ... सातारा

# प्रतिभाप्रकाशन, औरंगाबाद.

## प्रकाशित

१ " रुद्रवीणा "

[ कवि कान्त यांच्या भावगीतांचा अभिनव संग्रह ]

२ " मी कां लिहितों ? "

[ नामवंत साहित्यिकांनीं आपल्या लेखनप्रेरणेची केलेली कारणमीमांसा ]

## आगामी

१ आम्ही रानटीच आहोंत

( श्री. कृष्णचंद्र यांच्या अनुवादित कथा )

२ आशिया ( काव्य ) कवि कान्त

३ शततारका ( काव्य ) कवि कान्त

४ अग्निपथ ( काव्य ) कवि कान्त

नगर वाचनालय, सातारा.

# मी कां लिहितों ? १

श्री. न. चिं. केळकर.

पृथ्वीवर असूर्यंपश्य असें कांहीं नाहीं. त्याप्रमाणें मराठी साहित्यांत देखील ‘ अ – केळकरंपश्य ’ असा एकहि लेखनप्रांत उरला नाहीं, असें श्री. न. चिं. उर्फ तात्यासाहेब केळकरांसंबंधींहि निश्चयानें म्हणतां येईल. मराठी वाङ्मयाचा एक कालखंड त्यांच्या कर्तृत्वानें अंकित झाला आहे. श्री. केळकरांचा अफाट लेखनविस्तार पाहून, कांहीं टीकाकारांना त्यांच्याबद्दल असें म्हणण्याचा मोह होतो कीं, “ त्यांच्या नसांत रक्ताऐवजीं शाई वाहते व त्यांच्या बोटांना नखाऐवजीं टांकाच्या निबा आहेत ! ” जवळ जवळ अर्धशतक आपल्या विपुल व विविध लिखाणानें अखिल महाराष्ट्राला रिझविणाऱ्या व विचारप्रवण करणाऱ्या अशा एका अग्रगण्य व कृतकार्य लेखकाचें हृद्गत या भाषणांत पहिल्यांदांच प्रगट होत आहे. या प्रश्नासंबंधीं बोलतांना स्वतः तात्यासाहेब केळकर म्हणतात, “ वयानें व परिस्थितीनें मी आतां उरल्या जन्मांत कागदाला टांक न लाविला तरी चालेल, असें असतांहि मी लिहितों ”, मग तें कां ? आणि या प्रश्नाचें उत्तर ते स्वतःच देतात. या उत्तरांत त्यांचा विशाल अनुभव व लेखकाच्या मनोभूमिकेचें मार्मिक विश्लेषण, यांचा सुंदर संगम तर आहेच; पण त्याबरोबरच त्यांत त्यांच्या दीर्घ वाङ्मयतपस्येचें सुंदर चांदणेंहि वाक्यांवाक्यांतून चमकतांना दिसतें !

या प्रश्नाचें उत्तर अगदीं प्रथमच तोंडाला येतें तें असें कीं, "मला लिहितां येतें म्हणून मीं लिहितों." परंतु हें उत्तर एका अर्थानें खरें असलें तरी अपुरें व आडमुठें वाटण्यासारखें आहे. हें उत्तर खरें या अर्थानें आहे कीं, लिहितां येणें ही लिहिण्याची पहिली अनिर्बाह्य अटच ठरते. कारण मनांत कितीहि लिहावया-जोगें असलें व तें लिहिण्याची इच्छा झाली असली, तरी लिहितां नच आलें तर मनांत लिहिण्याची इच्छा असून काय उपयोग? मुक्या माणसाला बोलावेंसें वाटतें पण बोलतां येत नाहीं; बहिऱ्या माणसाला ऐकावेंसें वाटतें पण ऐकतां येत नाहीं; पांगळ्याला धावा-वेंसें वाटतें पण धावतां येत नाहीं. म्हणजे क्रियेच्या इच्छेपेक्षां क्रिया करण्याची पात्रता ही अधिक महत्वाची ठरते. मीं असे अनेक बुद्धिमान स्नेही पाहिलें आहेत कीं, ते लिहितील तर वाङ्मयांत चांगली भर घालतील, अशा खात्रीनें मी त्यांना लिहा म्हणतो. पण अंगीं पात्रता असतां, त्यांच्या हातून तें होत नाहीं. सामान्य लोकांत दोन प्रकार मला आढळतात. एक असें कीं, त्यांनीं लेखनाचा प्रयत्न केला तरी तो त्यांना खरोखर साधणार नाहीं. पण दुसरें असें कीं, त्यांनीं लेखनकलेसंबंधीं अशी कांहीं उच्च कल्पना मनानें करून ठेविलेली असते कीं, त्या कल्पनेला उतरेल, असें आपल्या हातून लिहिणें होणारच नाहीं, अशा न्यूनगंडाची निष्कास बाधा त्यांना झालेली असते. म्हणजे हा त्यांचा न्यूनगंड कांहीं प्रयत्नानें काढून टाकतां आला, त्यांचा आत्मविश्वास वाढवितां आला, तर ते कदाचित लिहितील व लिहितील तें चांगलें लिहितील. मी हें

म्हणतों याचें कारण असें कीं, लिहितां येणें ही खरोखरच फार मोठीशी कला नाहीं. पण हें केव्हां? तर त्या लेखनाचा विषय त्या लेखकाच्या व्यक्तिमत्वाशीं जुळतां असेल, तेव्हां. याचें उलटसुलट उदाहरणच घेऊं. अशिक्षित माणसाला जर तत्वज्ञान विषयावर लिहावयास सांगाल तर तो काय लिहूं शकेल? पण त्याला आपलें आत्मचरित्र किंवा जीवनविषयक अनुभव लिहावयास सांगितले तर ते तो खचित लिहूं शकेल. कै. लक्ष्मीबाई टिळक कितीशा 'सुशिक्षित' होत्या? परंतु त्यांनीं अगदीं येईल तसें आत्मचरित्र लिहिलें. तें वाङ्मयांत श्रेष्ठ श्रेणींत गणलें गेलें. आणि खरोखर जी एक म्हण आहे कीं, "प्रत्येक मनुष्याला प्रयत्न केल्यास एकतरी पुस्तक लिहितां येईल," ती म्हण खरी आहे. होतें काय कीं, हातांत टांक शाई घेऊन कागदावर अक्षरें उतरविणें, हेंच तंत्र मुळांत इतकें अवघड ठरतें कीं, त्यांतून मनुष्य उत्तीर्णच होऊं शकत नाहीं. लेखनाचा परिचय नसल्यानें तो कंटाळतो. पण समजा, त्याला, "तूं नुसतां बोलत जा, लिहिण्याचें काम मी करतों" असें म्हणणारा कोणी भेटला तर त्याच्या या श्रमविभागानें एखादा ग्रंथ सहज लिहून होईल. ज्यांनीं एक ओळ कधीं कागदावर लिहिली नाहीं, असें कांहीं लोक तोंडानें बोलूं लागले म्हणजे त्यांची रसवंती अशी खुलते कीं, ऐकत राहावेंसें वाटतें, हें मीं पुष्कळ वेळां अनुभवलेलें आहे. लिहिण्यांतला जो मुख्य मोठा महत्वाचा भाग—म्हणजे मजकूर – तो त्यांच्याकडून पार पडूं शकतो. दुसरा जो गौण म्हणजे प्रत्यक्ष लेखनाचा, व अर्थात् शुद्धलेखनाचा – तो त्यांच्या हातून

पार पडत नाहीं, इतकेंच काय तें.

आणि हें इतकें सांगून झालें म्हणजे मग " मी कां लिहितों"? याचें दुसरें उत्तर सांगण्यास मार्ग मोकळा होतो. " मला लिहावयाला येतें म्हणून मी लिहितों," हें जें उत्तर एरवीं आडमुठेपणाचें व कदाचित उद्दामपणाचें वाटण्यासारखें आहे, तें वरील विवेचन लक्षांत घेतलें असतां, तसें वाटणार नाहीं. आतां दुसरें उत्तर असें कीं, मला येत असलें तरी, लिहिण्याची इच्छा होते म्हणून मी लिहितों. मग प्रश्न हा कीं, लिहावयाची इच्छा कां होतें? ती एकाला कां व्हावी व दुसऱ्याला कां होऊं नये? या प्रश्नाचें उत्तर देणें सोपें नाहीं. उत्तर देतां येईल तें हेंच कीं, हा मनुष्यस्वभावाचा भेद आहे. आणि या स्वभावभेदाप्रमाणें तें घडतें किंवा घडत नाहीं. पैकीं घडतें याचें कारण सांगितलें म्हणजे न घडतें याचें कारण सांगावें लागत नाहीं. घडतें याचें कारण हें कीं, लिहिणें हा आत्म्याच्या आविष्काराचा एक प्रकार आहे; आणि कांहीं लोकांना हा आविष्कार प्रिय असतो. आपण पाहतोंच कीं, आपलें तोंड आरशांत दिवसांतून दहादां पाहण्याची संवय असणारे लोक आहेत, व याच्या उलट घरीं आरसा असूनहि, ज्यांना त्यांत आपलें तोंड पाहण्याची इच्छा सहासहा महिनेहि होत नाहीं, असेंहि लोक असतात. आरशांत स्वतःचें तोंड पाहणें, हा आत्माविष्काराचा अत्यंत क्षुद्र प्रकार झाला. परंतु यापेक्षां चांगले, वरच्या प्रतीचेहि आत्माविष्काराचे प्रकार आहेत. उदाहरणार्थ, अंगीं असलेली कोणतीहि चांगली कला प्रगट करणें, हा आत्माविष्कारच होय. आणि तो

आवडतो म्हणून चितारी चित्रें काढल्याशिवाय गप्प बसत नाहीं. गाण्याचा गुण असणारा गायल्याशिवाय राहत नाहीं. शक्ति शारीरिक काय, मानसिक काय, त्यांचा हा धर्मच आहे कीं, त्यांना गुप्त राहवत नाहीं, प्रगट व्हावेंसें वाटतें. आणि मनुष्यावर मोठा जुलूम म्हणजे हा ठरतो कीं, त्याच्या शक्तींना प्रगट होण्याला वाव मिळत नाहीं, प्रतिबंध होतो. आपण होऊन संयम करणें वेगळें, व जुलुमानें तो करावा लागणें वेगळें. संयम ही शक्तींच्या प्रगटीकरणाच्या अतिशयोक्तीविरुद्ध प्रतिक्रिया असते; पण ती ऐच्छिक, प्रासंगिक व तात्पुरती असते. उपवास करणें, ध्यानस्थ बसणें, मौन धरणें, या क्रिया अशा प्रकारच्या संयमाचीं उदाहरणें होत. परंतु संयम हा अपवाद व क्रिया हा नियम असतो.

वाचेच्या द्वारें उद्गार काढणें, हा आत्माविष्काराचाच एक प्रकार होय. हा उद्गार जसा तोंडानें तसाच लेखद्वारेंहि प्रगट करतां येतो. परंतु पहिला प्रकार हा व्यवहारांत ९९ भरेल तर दुसरा १ भरेल, इतकें लेखन हें अल्पमात्र असतें. या उद्गाराला सौंदर्य देणें, सर्वांना एकसारखें साधत नाहीं. म्हणूनच कोणी नामांकित वक्ते किंवा लेखक होतात तर उलट कोणाला धड चार ओळी बोलतां किंवा लिहितां येत नाहींत. आणि ज्यांच्या अशा उद्गारांना सौंदर्य येतें, त्यांना ते तसे उद्गार वरचेवर काढण्यांत आनंदच वाटतो, म्हणून ते तो आनंद भोगतात. चित्रकार व गवई यांच्याप्रमाणेंच लेखन-व्यवसायांत लेखकाचें मन रमतें. म्हणून तो कित्येक वेळां गरजेमुळें, लोकांच्या भिडेमुळें, जुलुमामुळें लिहो, परंतु वरील प्रका-

रचें कोणतेंहि बाहेरचें प्रवर्तन नसलें तरी पुष्कळ वेळां तो स्वतःच्या आनंदाकरितां लिहितो. वाङ्मयचर्चेंत कलेकरितां कला असा जो एक वाद आहे, त्याचें मूळ या आनंदांतच असतें.

पण वरील सर्व कारणें वगळून आणखीहि एक कारण लेखनाचें म्हणून सांगतां येतें. तें मतप्रतिपादन हें होय. या उपयोगांत जुलूम किंवा भीड तर नाहींच, पण केवळ सुखवादी आनंदच नसतो, तर स्वतः आनंद भोगण्यापेक्षां त्या आनंदभोगाहून श्रेष्ठ असें कांहीं कर्तव्य करण्याचा, कांहीं परोपकारबुद्धीचा हेतु असतो. म्हणून कलेकरितां कला या वादाच्या तोडीस तोड देणारा सत्योपासनेकरितां कला, हा वाद पुढें येत असतो. वास्तविक या दोनहि वादांत हें गृहीत धरलेलेंच असतें कीं, गुणाविष्कार, कलाविलास यांपासून प्रथम आनंद उत्पन्न होतोच, पण या आनंदांतच त्याची परिसमाप्ति व्हावयाची, किंवा त्यापलीकडे जाऊन आनंदोत्पत्तीबरोबर इतरहि कांहीं परसापेक्ष कार्य व्हावयाचें, साधावयाचें, हाच काय तो प्रश्न असतो. आणि म्हणून वाङ्मयाचें ध्येय सौंदर्यसाधन हें तर खरेंच, पण त्याचबरोबर सत्यप्रतिपादनाला व कल्याणप्रदतेला कांहीं सहाय्य झालें आहे कीं नाहीं, हें पाहण्याची इच्छा होते व तें झालें, असें आढळल्यास, दुधांत साखर पडावी तशी कृतकृत्यतेच्या भावनेंत भर पडते.

असो. आतां या प्रस्तावनेनंतर 'मी कां लिहितों' या प्रश्नाचें व्यक्तिशः उत्तर देणें सोपें आहे. कारण त्या विवेचनांत

मला विचारलेल्या प्रश्नाचीं बहुतेक उत्तरें आलीं आहेत. आणि खरोखर तसला प्रश्न मलाच विचारणें एक प्रकारें योग्य होईल. कारण वयानें व परिस्थितीनें मी आतां उरल्या जन्मांत कागदाला टांक न लावला तरी चालेल, असें असतांहि मी लिहितों. म्हणून तो प्रश्न मलाच विचारणें योग्य. उलट, असे किती तरी लेखक आहेत कीं, ज्यांना तो प्रश्न विचारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. कां कीं, कारण नसतां लिहिणाराचेंच उत्तर अधिक मूलभूत ठरेल. इतर लेखकांत (१) कोणी लिहिण्यास शिकण्याकरितां लिहितात. (२) कोणी केवळ उदरनिर्वाहाकरितां लिहितात. त्यांत त्यांना स्वतःच्या मनाचा आनंद नसतो. (३) कोणी उदरनिर्वाहाकरितां लिहितातच, पण त्याबरोबर त्यांना त्या लेखनांतून आनंदहि लाभतो. (४) कोणी द्रव्यप्राप्तीकरितां न लिहितां केवळ आनंदाकरितां लिहितात. (५) कोणाला लेखनांत आनंद लाभतो, परंतु तो आनंद कलाविलासाचा नसून मतप्रतिपादनाचा असतो. मतप्रतिपादन हें साध्य व लेखन हें त्याचें साधन म्हणून ते लिहितात. (६) मात्र यांहीपेक्षां एक वरचा वर्ग मी मानतो. तो, केवळ जगाला कांहींतरी उच्च शिक्षण देण्याच्या हेतूनें लिहितात, त्यांचा. उपजीविका, कलेचा आनंद, मतप्रसार, या सर्व गोष्टी स्वार्थी होत. पण जनतेला शिक्षण देणें हा परोपकार होय.

मी स्वतः आतां लिहितों, तें जुलुमानें लिहित नाहीं, पैशाकरितां लिहीत नाहीं, प्रसिद्धीकरितां नाहीं, मतप्रसाराकरितांहि नाहीं; पण, कांहीं केवळ आनंदसेवनाकरितां लिहितों; कांहीं

( प्रस्तावना अभिप्राय वगैरे ) लोकांच्या भिडेखातर लिहितों; सांगितलें तर कोणाला खरें वाटणार नाहीं, पण डोक्यांत घोळणाऱ्या विचाररूपी, कल्पनारूपी समंधाला, पिशाचाला, गति देण्याकरितां लिहितों. तो विचार, त्या कल्पना, डोक्यांतून काढून टाकण्याला लिहून टाकणें, हाच उपाय ठरतो. पण प्रथम आडमुठेपणाचें म्हणून जें उत्तर दिलें, तेंच शेवटीं देण्याशिवाय गत्यंतर नाहीं, व तें हेंच कीं, मला लिहितां येतें म्हणून लिहितों.

नगर वाचनालय, सातारा

# मी कां लिहितों ?



**आचार्य काका कालेलकर.**

गुजराथ विद्यापीठाचे भूतपूर्व कुलगुरु, गुजराथी, हिंदी व मराठीचे अभिजात व सव्यसाची साहित्यिक व शिक्षणतज्ज्ञ, आचार्य काका कालेलकर यांच्या लेखणीनें गुजराथी साहित्याला गौरविलें आहे, तर मराठी वाङ्मयाला नवीन विचारधारा प्रदान केली आहे. त्यांच्या सहज, भावतरल, सहानुभूतीसारख्या कोमल व रसाळ भाषेनें एका नव्या शैलीचें लेणें मराठी भाषेवर चढविलें आहे; आणि अहिंसामय क्रांतीचें गांधीवादी तत्वज्ञान व जीवनवादी साहित्यदृष्टि यांच्या किरणांनीं मराठी साहित्याच्या वाटा त्यांनीं उजळल्या आहेत. आपल्या वाङ्मयसेवेसंबंधीं बोलतांना काका कालेलकर ह्मणतात, " माझ्या भारतभक्तींत देव आणि देऊळ असें द्वैतच नाहीं. देव देवळाच्या आंतहि आहे, बाहेरहि आहे; आणि देऊळहि देवच आहे ..................... माझ्या उपासनेंत मातेचें मंदिर एवढें मोठें आहे कीं, त्याला बाहेरचें दारच नाहीं. येथें इतकीं अनंत दर्शनें आहेत कीं, उभे राहण्याचीहि सोय नाहीं. "

आपल्या लेखनाला ते " कल्पनाकुसुमें " ह्मणत नाहींत, तर तीं " जीवनकुसुमें " आहेत, असा त्यांचा विश्वास आहे. अशा विशाल दृष्टीचा व जीवनावर असीम श्रद्धा ठेवणारा जीवनवादी वाङ्मयसेवक कोणत्या प्रेरणेमुळें आपलें लेखन करतो, याचें कुतूहल त्यांच्या सर्व रसिक वाचकांना वाटणें सहाजिकच आहे. ह्या जिज्ञासु वाचकांचें समाधान काका कालेलकरांच्या या लेखानें होईल. अथांग सहानुभूति, मानवजातीविषयीं तळमळ व प्रेम, आणि फुलांवरील दहिंवरासारखें शोभणारें त्या प्रेमाचें सांद्र सौंदर्य, इत्यादि त्याचे लेखनगुण या लेखांतून इतक्या प्रकर्षानें प्रगट झालेले दिसतील कीं, वाचतांना तुम्हांस वाटेल येथें शब्दांनाहि रोमांच फुटत आहेत!

" लिहावयाची प्रेरणा मला कशामुळें होते ? " या प्रश्नाचें उत्तर ज्याप्रमाणें निरनिराळे लोक निरनिराळ्या रीतींनीं देतील, त्याचप्रमाणें एकच मनुष्य निरनिराळ्या वेळीं निरनिराळीं उत्तरें देईल.

सगळ्याच लेखकांनीं जर प्रामाणिकपणें उत्तर देण्याचें ठरविलें, तर कोण जाणें कितीं विचित्र विचित्र उत्तरें आपल्यास वाचावयास मिळतील. जगांतील कांहीं नामांकित लेखक म्हणतील, " बाबांनो ! निदान मला तरी लिहावयाची प्रेरणा पोटांतील आगीमुळें झाली. पोट भरण्याचें कांहींच साधन हातीं लागेना, आत्महत्या करण्याचेंहि साधेना, तेव्हां शेवटीं घेतली लेखणी आणि लागलों भरकटायला ! "

धर्मतत्त्वाची मीमांसा करणाऱ्या एका लेखकाला दारूच्या प्याल्यानेंच लिहिण्याची प्रेरणा प्राप्त झाली होती.

आणखी एकाला घराचें भाडें भरण्यासाठीं तात्बडतोब एक लघुकथा लिहून द्यावी लागली होती; आणि एकाला तर आपल्या मृत मातेच्या शवासाठीं कफनपेटी विकत घेण्याची पंचाईत पडली, तेव्हांच कांहींतरी लिहून पैसे मिळवावें लागले. विल्यम कूपरसारखा कवि तर, केव्हां केव्हां स्वतःला येऊं पाहणारा वेडाचा झटका टाळण्यासाठींच कविता लिहीत असे.

कित्येक लोक म्हणतील कीं, ज्याप्रमाणें एखादी गुपित गोष्ट फोडण्यासाठीं किंवा चहाडी सांगून एखाद्याची फजिती करण्यासाठीं

जीभ वळवळते, त्याचप्रमाणें आमच्या लेखणीला जेव्हां अनावर खाज सुटते, तेव्हां लिहिल्यावांचून गत्यंतरच नसतें. एक इंग्रज कवि कविता करण्याचा स्वतःचा हेतु सांगत असतां म्हणतो, " I sing, because I must "—माझ्यानें राहवत नाहीं म्हणूनच मी कविता करतों.

कांहीं लोकांनीं आजकालच्या समाजावर तोंडसुख घेण्याच्या उद्देशानें एक नवीनच उपपत्ति लाविली आहे. ते म्हणतात कीं, स्वतःचे विचार लपवितां यावेत म्हणूनच मनुष्यानें भाषेचा आविष्कार केला आहे. Language is the art of concealing thought. ही उपपत्ति खरी धरायची म्हणजे लेखकाची प्रवृत्ति हा एक फसवाफसवीचा व्यापार म्हणावा लागेल.

पण या सर्व गोष्टी आपण सोडून देऊं. मला येथें, " मी लेखनाला प्रवृत्त कां होतों? कशामुळें मला लिहायला होतें ? " एवढेंच सांगावयाचें आहे. डॉक्टर केतकरांप्रमाणें मी असें म्हणूं शकणार नाहीं कीं, कम्पॉझिटरांना लागणाऱ्या कॉपीच्या भुकेला निवविण्यासाठीं मी कांहीं लिखाण केलें आहे. मी जातीचा मनुष्य-प्रेमी शिक्षक आहें. विद्यार्थ्यांशीं किंवा स्नेह्यासोबत्यांशीं बोलण्यांतच माझा बहुतेक वेळ जातो. माझ्या वाङ्मयाला लिहिणें, हें देखील बोलण्याचा एक प्रकार आहे. तें कसें, तें मी अंमळशानें सांगणार आहें. मुख्य गोष्ट अशी आहे कीं, लहानपणींच मला प्रवास करण्याची गोडी लागली होती. ठिकठिकाणीं हिंडावें, प्रकृतीचें वैभव आणि मनुष्याची संस्कृति, या दोहोंचें निरीक्षण करावें, ओढ्यांच्या

आणि इतरांच्या गोष्टी ऐकाव्यात व त्या माणसांना सांगाव्यात, यांतच मला निरतिशय आनंद वाटत असे. जें कांहीं आपण वाचलें, पाहिलें किंवा अनुभविलें, तें दुसऱ्यांना सांगावें, आपल्या अनुभवाचा दुसऱ्याला वांटेकरी करावें, अशी प्रचारकी वृत्ति अगदीं लहानपणापासून मला जडलेली होती. पण हा कांहीं माझा विशेष गुण म्हणतां यावयाचा नाहीं. अगदीं पिसाळलेल्या कुत्र्यापासून तों थोर थोर संतांपर्यंत सर्वांविषयींच असें म्हणतां येईल, कीं " आपुल्यासारिखें करिती तात्काळ। नाहीं काळवेळ तयांलागीं. " व्यसनी लोकांत हाच गुण सर्वत्र दिसून आला आहे, आणि निवृत्तिमार्गी वैराग्यांतहि हाच गुण उत्कर्षेंकरून प्रगट झाला आहे.

मी हिमालयांत असतांना माझ्या शेजारच्या झोंपडींत राहणाऱ्या एका ब्रह्मचाऱ्यानें मला म्हणावें, " तुम्हांला मौनाचें महत्त्व पटलेलें नाहीं. खऱ्या साधकानें मौनाचा भंग कधीं करतां कामा नये. " या बाबतींत आमचा मतभेद झाल्यामुळें आम्ही एकमेकांशीं बोलण्याचें टाळलें. पुढें सिलोनमधून दुसरा एक मौनवादी आला. मी त्या दोघांची ओळख करून दिली. त्या दिवसापासून केव्हांहि पहा, ते दोघे साधक एकत्र असावयाचे आणि जेव्हां पहावें तेव्हां मौनाच्या महात्म्यावर त्यांचें संभाषण चालू असावयाचें. मीं तात्काळ ठरविलें कीं, मौनाविषयीं बोलल्यामुळें मौनाचा भंग होत नसतो !

या थोड्याशा विषयांतरामुळें, मला वाटतें, मनुष्य लिहायला प्रवृत्त कां होतो, हें श्रोत्यांना अगदीं सोळा आणे समजण्यासारखें आहे. मला स्वतःला आपल्या हातानें लिहिण्याची संवयच नाहीं.

लेख असो किंवा पत्र असो, लिहायला कोणीतरी लागतेंच. मला लिहितां येत नाहीं, असें नाहीं; हातांत किंवा बोटांत दोष आहे, असेंहि नाहीं; पण स्वतः लिहिण्याची इच्छाच होत नाहीं. लेखकाच्या रूपानें कोणी श्रोता असला म्हणजे लिहविण्याच्या मिषानें मी बोलूं लागतों. ऐकणारें कोणी असेल तरच लिहविण्याचा पान्हा मला फुटावयाचा. श्रोता जर उत्तम जिज्ञासु, रसिक आणि मर्मज्ञ असेल तरच वक्त्याला स्वतःची सर्व कला प्रगट करावीशी वाटते. पत्रें किंवा लेख लिहवितांना मला जर सच्चिदानंदबाबासारखा लेखकु मिळाला तरच माझ्या हातून नीटसें लिहिणें होतें. वाटेल तसला लेखक मला चालत नाहीं. माझ्यांतील मनुष्यप्रेमाला पाझर फोडण्याची शक्ति असेल, अशा व्यक्तीकडूनच आपलें लिखाण लिहवून घेण्याचा माझा आग्रह असतो. ईश्वराच्या कृपेनें गेल्या वीसपंचवीस वर्षांत असाधारण सहानुभूतीचे चिटणीस मला मिळत गेले म्हणूनच माझ्याकडून गुजराथी, मराठी, हिंदी वगैरे भाषांतून हजारों पृष्ठांचें साहित्य लिहिलें गेलें.

स्वतःला सुचणारे विचार, स्फुरणाऱ्या कल्पना, येणारे अनुभव आणि उठणाऱ्या शंका दुसऱ्यांमध्यें संक्रान्त कशा होतील, या विषयींच्या उत्कट तळमळीमुळेंच माझेंतरी निदान सर्व लिखाण होत असतें. या तळमळीलाच मी मनुष्यप्रेम म्हणतों.

अशी तळमळ नसेल, तेव्हांदेखील मनुष्याच्या हातून लेखनाची निर्मिति होऊं शकते. त्याचा प्रेरक हेतु असतो – सिसृक्षा.

सृष्टि करण्याच्या इच्छेला, जन्म देण्याच्या इच्छेला, सिसृक्षा असें म्हणतात. आईबापांना, ज्याप्रमाणें आपल्याला मुलें असावींत, असें वाटतें; वयांत आलेल्या मुलीला सामान्यपणें वाटूं लागतें कीं, आपण आतां लेकुरवाळी व्हावें, त्याचप्रमाणें लेखनाच्या कलाधराला आंतूनच स्फूर्ति होत असते कीं, आपण एकाद्या कलाकृतीला जन्म देऊन आपल्या व्यक्तित्वाला प्रगट केलें पाहिजे. प्रसूतिवेदना सहन करून-देखील ज्याप्रमाणें आई पुत्रेषणा तृप्त करते आणि आपल्या छकुल्याचा चेहरा पाहून सर्व दुःख विसरते, त्याचप्रमाणें लेखकालाहि उत्कृष्ट कलाकृतीला जन्म देण्यांत स्वतःचें जीवन कृतार्थ झाल्याची धन्यता मिळत असते. हा निर्मितीचा आनंद जवळ जवळ ब्रह्मानंदाइतका उत्कट असतो, असें म्हणण्याचा रिवाज पडला आहे.

हल्लीच्या युगांत – आणि मीहि याच युगाचा प्रतिनिधि आहे— लोककल्याणाच्या दृष्टीनेंच लेखनकार्य केलें जातें. जगांतील अन्याय, अत्याचार, पारतंत्र्य आणि अज्ञान यांचा नाश करण्यासाठीं कांहींना कांहीं कृति घडलीच पाहिजे, निदान साहित्यिक विचारणा झालीच पाहिजे, असें उत्कटपणानें वाटणें, हा हल्लीच्या युगाचा एक विशेष आहे. आणि म्हणूनच जीव तोडून एखादी गोष्ट लिहिली आणि समाजाला ती पटली, म्हणजे परम समाधान होतें.

राजकारण असो किंवा समाजकारण, अर्थकारण असो, कीं धर्मकारण, समाजाला नव्या नव्या गोष्टी पटवून दिल्यावांचून समाजामध्यें सुधारणा किंवा प्रगति होऊं शकत नाहीं. याचा अर्थ असा

झाला कीं, लोकशाहीच्या युगांत राजकारणाच्या मुळाशीं लोकशिक्षणाचा भक्कम पाया असावा लागतो. आपण राजकारणांत पडावयाचें नाहीं, अर्थकारणाचा बोजा वहावयाचा नाहीं, धर्मकारणाच्या खरकट्यांत हात घालावयाचा नाहीं, असें प्रथमपासून ठरवून माझ्या क्रान्तिकारी मनानें शिक्षणाची कास धरली. तरुण पिढीच्या शालेय शिक्षणाला वाहून न घेतां, लोकसमुदायाच्या सार्वभौम शिक्षणाचा प्रश्न हातीं घेतल्यामुळें, मनुष्यजीवनाशीं संबंध असलेल्या सर्वच विषयांवर मला लिहावें लागलें. गुजराथमध्यें, ज्या ज्या चळवळी उत्पन्न झाल्या किंवा उत्पन्न करण्याजोग्या वाटल्या, त्या सर्वांच्या मूलभूत तत्वांची चर्चा करणें, अशा रीतीनें अपरिहार्य झाल्यामुळें मला लेखणी चालवावी लागली; आणि एकदां लिहावयाची संवय झाली म्हणजे कोणीहि प्रश्न विचारला किंवा लेख मागितला किंवा कार्यांतील अडचणी व्यक्त केल्या म्हणजे लिहावयाला ताबडतोब स्फूर्ति व्हावयाची. गीतेंत म्हटलें आहे. " सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते, " सर्व प्रकारच्या कर्मांची परिसमाप्ति ज्ञानांत होते. कित्येक वर्षेंपर्यंत " सर्वाः प्रवृत्तयो नूनं तृप्तिमायान्ति लेखने, " असाच माझा अनुभव होता, असें म्हणतां येईल. जितक्या म्हणून प्रवृत्तींत भाग घ्यावा, सेवावृत्तींतून जितक्या म्हणून ऊर्मि उठाव्या, त्या सर्वांचें अवसान सरतेशेवटीं तद्विषयक लेखांतच व्हावयाचें. म्हणूनच मी म्हणतों कीं, लेखनाच्या हेतूंमध्यें साहित्य – सिसृक्षा, मनुष्यप्रेम, आत्मसाक्षात्कार आणि विविध क्षेत्रांतून केल्या जाणाऱ्या सेवेंमधून प्राप्त होणारें आत्मौपम्य, एवढेच लेखनाचे मुख्य हेतु

म्हणतां येतील. निदान माझ्या बाबतींत तरी एवढे हेतुच माझ्या वाङ्मयाला प्रेरक ठरले आहेत. आणि या हेतूनें लिहिलेल्या साहित्यानें लोकसेवा घडली असो वा नसो, मला स्वतःला त्यांतून शुद्ध, सात्विक संतोषाचा अखंड झरा लाभला आहे.

वाचनालय सातारा

नगर वाचनालय सातारा
नं.........
नं.........

# मी कां लिहितों ?  ३

श्री. मामा वरेरकर.

साहित्यसंमेलनाच्या अध्यक्षपदावरून बोलतांना, श्री. मामा वरेरकरांनीं, " साहित्यक्षेत्रांतील नांगऱ्या, " असें विनयानें स्वतःचें वर्णन केलें आहे, तर श्री. खांडेकरांसारख्या चिकित्सक टीकाकारानें त्यांच्याविषयीं असे उद्गार काढले आहेत कीं, वरेरकरांइतका प्रगमनशील व मराठी रंगभूमीवर बहुविध सुधारणा घडवून आणणारा नाटककार झाला नाहीं.

हुंड्यासारख्या कौटुंबिक अन्यायापासून मजूर–भांडवलदार लढ्यासारख्या व्यापक सामाजिक प्रश्नांपर्यंत सर्वांना मामांनीं आपल्या नाटकांतून वाचा फोडली आहे. जेथें जेथें त्यांना अन्याय दिसून आला, तेथें तेथें त्यांनीं त्याचा निषेध केला आहे; आणि सामाजिक व राजकीय सत्तेच्या गुलामगिरीविरुद्ध बंड करण्याची भावना त्यांनीं बहुजनसमाजांत चेतविण्याचा प्रयत्न केला आहे. दलितांविषयींची कळकळ हीच त्यांच्या लेखणीची शक्ति व सुंदरता आहे, म्हणूनच त्यांच्या प्रचारकी लेखनाला साहित्याचें सुवर्णरूप प्राप्त झालें आहे.

लेखणीचें हें सामर्थ्य व जीवनाचें विशाल ज्ञान मामांनीं कोठें मिळविलें ? विश्वविद्यालयांतून ? नाहीं. अनुभवाचीं अक्षरें वाचून व जीवनाचा ग्रंथ अभ्यासून. आणि त्यामुळेंच त्यांच्या लिखाणांत पढिक पदवीधरांच्या शिदोरीचा शिळेपणा प्रत्ययास येत नाहीं, उलट तव्यावरील भाकरीचा ताजेपणा व ऊब दृष्टोत्पत्तीस येते.

प्रस्तुत लेखांत मामा आपल्या वाङ्मयजीवनाबद्दल म्हणतात, " आयुष्यभर जिवापाड श्रम केले; त्या परिश्रमाच्या पायीं दैन्याचे व दुःखाचे चटके भरपूर प्रमाणांत मला भोगावे लागले. " असें असूनहि, " या देहांत प्राण असेपर्यंत मी लिहीत राहणार ! " असा निर्धार ते कां व्यक्त करतात ? सर्वस्वाचा होम मांडला असतांहि लेखक आपलें वाङ्मयसेवेचें व्रत सोडीत नाहीं, तें कोणत्या प्रबल प्रेरणेमुळें ? कोणत्या मोहिनीमुळें ?

श्री. मामा वरेरकरांनीं नेमकें याच प्रश्नाचें उत्तर या लेखांत दिलें आहे, आणि त्या ओघांत लेखक होण्यासाठीं केवढी तपश्चर्या करावी लागते, याचेंहि दिग्दर्शन केलें आहे.

मी कां लिहितों ? हा जन्मजात रोग आहे मला. साधारण कळूं लागलं, तेव्हांपासूनच मला लेखनाची आवड. नाटककार व्हावं, ही माझी पहिल्यापासूनची महत्वाकांक्षा. वयाच्या चौथ्या वर्षापासून पाहिलेलीं नाटकं मला अजूनसुद्धां चांगलीं आठवतात. वयाच्या आठव्या वर्षीं मी एक नाटक लिहिलं होतं आणि तें बसवावं म्हणून एका नाटकमंडळीकडेसुद्धां गेलें होतों. योगायोग हाच कीं, माझं पहिलं नाटक जें रंगभूमीवर आलं, तें याच आठव्या वर्षींच्या नाटकाच्या कथानकावरचं होतं.

नाटक पहाण्याचा मला मोठा ध्यास होता, आणि ती माझी आवड पुरी करण्याइतके माझे वडील उदार होते. म्हणूनच अगदीं अल्पवयांतसुद्धां मीं कुणाहि मोठ्या माणसापेक्षां जास्त नाटकं पाहिलीं होतीं. तशींच त्यावेळीं मिळत असलेलीं सारीं नाटकं मीं वाचलीं होतीं. नाटकाप्रमाणेंच त्या वेळच्या बहुतेक साऱ्या कादंबऱ्या मीं जशा वाचल्या होत्या, तशींच मराठी आणि संस्कृत भाषेंतील पुष्कळशीं पुराणं मीं वाचलीं होतीं. वैष्णव कवींचं वाङ्मय पहिल्यापासून भरपूर वाचल्यामुळं, मराठी भाषेच्या घाटणीबद्दल माझे कांहीं निश्चित असे संकेत पहिल्यापासूनच बनून गेले होते. मूळची लेखनाची आवड, त्यांत पुष्कळसं वाचन केलेलं, पुष्कळसे लेखक पुष्कळसं लिखाण करतात, हें दिसून आल्यामुळं लेखनाचा हव्यास वाढूं लागला.

अमूक एक प्रकारचंच वाङ्मय वाचावं, असं कांहीं माझं धोरण नसे. जें मिळेल, तें वाचायचं; जें वाचलं असेल, तें पचवायचं; आणि पचलेलं वाचन रवंथ करीत राहायचं; अशी लहानपणींच मला संवय होती. कुणाहि लेखकाचं लेखन वाचतांना, पहिल्यापासूनच माझी दृष्टि चिकित्सकाची असे. कुणाच्याहि लेखनांत मी चटकन रंगून जात नसे. पुस्तक वाचीत असतांना, येणारे प्रसंग मीं कसें लिहिलें असतें, याचा विचार आधीं माझ्या मनांत येत असे. लेखनाच्या उद्दिष्टाप्रमाणेंच लेखकाची लेखनसरणी अगदीं कांटेकोर नजरेनें छानून पहायचीहि मला संवय होती. त्याचमुळं मी कुणाहि लेखकाचा लेखनशैलीच्या दृष्टीनं अनुयायी बनलों नाहीं.

लहान तोंडीं मोठा घांस घेणं मला पहिल्यापासूनच आवडत असल्यामुळं, वयाच्या तेराव्या वर्षीं, मी एका साप्ताहिकाची संपादकीय जबाबदारी पत्करली होती. हें काम करतांना मात्र माझी दृष्टि सर्वस्वी स्वतंत्र नसे. केसरी मी आवडीनं वाचीत असें. पण त्या तेवढ्या वयांतसुद्धां आगरकरांच्या सुधारकाची छाप माझ्या मनावर फार मोठ्या प्रमाणावर बसली होती.

माझ्या गांवचं वातावरण सुधारणेला सर्वस्वी प्रतिकूल होतं. माझे वडील मोठे धार्मिक आणि तत्त्वज्ञ होते, तरीहि नव्या विचारांचं त्यांना वावडं नव्हतं. म्हणूनच आमच्या घरीं आगरकरांचा ‘ सुधारक ’ येत असे. संपादकाचं काम पत्करलं त्यावेळीं आगरकर हयात नव्हते, म्हणून त्या कामीं मला केसरीच मार्गदर्शक होत होता. पण सामाजिक आणि धार्मिक बाबतींतलीं केसरीचीं मतं

मला पटत नव्हतं. असं कांहीं लिहायची वेळ येई, त्यावेळीं मी आगरकरांचे आधार घेत असें.

वृत्तपत्राचं जीवन म्हणजे सर्वस्वी राजकारण. राजकारणाचे आडवेतिडवे धागेदोरे विणण्याचं सामर्थ्य त्यावेळीं माझ्या अंगीं नव्हतं. तरीहि मी माझ्या पत्राचे अग्रलेख लिहितांना केसरीकारांचा आव आणीत असें आणि तो पचूनहि जात असे. इथं मात्र बरचसं अनुकरण असें. त्यानंतर मी किरकोळ कविता आणि गोष्टी लिहूं लागलों. त्यावेळीं अशा लेखांवर लेखकाचं नांव घालायची फारशी पद्धत नसे. नवा लेखक आपल्या खऱ्या नांवाखालीं लेख लिहायला सहसा कचरत असे. मीहि तसंच करीत असें. लेखक म्हणून मिर-विण्यापेक्षा आपलं लेखन आपल्या ओळखीदेखीच्या वाचकांना कितपत रुचतं; कोण त्याला कोणत्या प्रकारं नांव ठेवतो किंवा कोणत्या कारणासाठीं तारीफ करतो; हें, लेखकाचं नांव नसल्यामुळं, अचूक कळून येत असे. लेखक या नात्यानं गुपचुप उमेदवारी करायची संवय त्या वेळच्या बहुतेक साऱ्याच लेखकांना होती. म्हणजे त्या वेळच्या आम्हां लेखकांना आत्मविश्वास नव्हता, असं नव्हे. जें कांहीं आम्हीं लिहीत असूं, तें निश्चयात्मक असें खरं; पण वाचकांची आवड ताडून पहाण्याची जिज्ञासा त्या वेळच्या आम्हां लेखकांना मोठ्या तीव्रतेनं जाणवत असे.

वाचन हा लेखन करण्यासाठीं अवश्य असलेला एक व्यायाम आहे. तो व्यायाम करतांना, जें पुस्तक वाचलं जाई, त्याचं अनु-करण आपल्या पुस्तकांत होऊं नये, याची खबरदारी मी पहिल्या-

पासूनच घेत असें. बुद्धीला व्यायाम देण्यापुरतंच तें वाचन असें. अपरिचित विषयांचा सांगोपांग परिचय करून घेणं, हें मुख्य ध्येय असें. ज्ञानार्जनासाठीं केलेल्या वाचनाप्रमाणंच लेखनशैली निश्चित होण्यासाठींहि, या वाचनाचा उपयोग होई. त्या वेळीं नवे नवे लेखक वाङ्मयाच्या क्षितिजावर मोठ्या तेजस्वितेनें झळकूं लागले होते. त्या झळाळीनं दिपून जाऊन, पुष्कळसे लेखक त्यांचं अनुकरण करीत असत. त्यांच्या त्या झळाळीनं मीहि दिपून जात होतों. पण त्या बरोबरच त्यांचं अनुकरण माझ्या लेखनांत होऊं नये, म्हणून डोळ्यांत तेल घालून जपत होतों. त्याचमुळं पहिल्यापासून आजपर्यंत माझं लेखन अनुकरणात्मक झालं नाहीं.

जगाला संदेश देण्यासाठीं मी लिहितों, अशी प्रौढी मिरविण्याइतका दिमाख माझ्या ठायीं नाहीं. नाटककार होणं ही माझी महत्त्वाकांक्षा होती. नाटक हा विषयच मोठा व्यापक आहे. पौराणिक किंवा ऐतिहासिक नाटकं लिहिणारालादेखील पुराण आणि इतिहासाचा अभ्यास चिकित्सक नजरेनं करावा लागतो; पण कल्पकतेवर सर्वस्वी भर देऊन, ज्यावेळीं नाटक लिहिलं जातं, त्या वेळीं साऱ्या कांहीं विषयांचा सांगोपांग अभ्यास करणं अवश्य होत असतं. नाटक मंडळ्यांच्या जरुरीला अनुसरून पहिलीं दोन तीन नाटकं, जरी मी पौराणिक कथाभागांवर लिहिलीं, तरीहि त्या विषयांवर माझ्या बुद्धीप्रमाणं मी स्वतंत्र दृष्टीचा प्रकाश पाडला होता. पण तशी नाटकं लिहिणं माझी खरी आवड नव्हती. कुणीहि हाताळले नाहींत, असे नवे नवे विषय नाटकासाठीं शोधून काढायचा

माझा हव्यास असे. त्या हव्यासापायीं सामान्य जनसमाजाचं सूक्ष्म दृष्टीनं अवलोकन करणं अवश्य झालं होतं. त्याचमुळं मला जगाकडं पाहण्याची एक विशेष प्रकारची दृष्टि कमावून घ्यावी लागत होती.

कलाकाराची दृष्टि यंत्राच्या दृष्टीपेक्षां वेगळी असते. चित्रकारानं काढलेलं चित्र आणि कॅमेरानं घेतलेला फोटो या दोहोंत जो फरक असतो, तो या अवलोकन शक्तीच्या स्वतंत्रतेमुळंच. ती अवलोकन-शक्ति तयार करण्याचा मला ध्यास होता. इंग्रजी वाङ्मयाचा परिचय होऊं लागला, तसतशी ही दृष्टि फाकूं लागली. विषयांची विविधता कशी संपादावी, याचा बराचसा अंदाज येऊं लागला. परदेशी वाङ्मयांतील विषयांचं मी केव्हांच अनुकरण केलं नाहीं. परदेशी वाङ्मयांतील विषयांच्या अनुरोधानं आपल्या समाजांतील विषय कसे निवडून काढावे, हेंच माझं धोरण असें. अभ्यासा-प्रमाणंच जशी अध्यवसायाची आवश्यकता आहे, तशीच दृष्टीला व्यापकता येण्यासाठीं, प्रवासाचीहि जरूरी आहे. आपला देश, आपला देश, असं आपण म्हणतों, त्यावेळीं आपल्या गांवापलीकडे तरी आपली नजर गेलेली असते कीं काय, याची शंकाच असते. त्या आपल्या देशाची यथार्थ नसली तरी बरीचशी कल्पना यावी, म्हणून वेगवेगळ्या वेळीं हिमालयापासून रामेश्वरापर्यंत धावता प्रवास करण्याची मी संधि साधली. त्यामुळं दृष्टीचा अकुंचितपणा नाहींसा झाला. प्रत्येक विषयाकडे अखिल भारतीय दृष्टीनं पाहतां येऊं लागलं, आणि त्या अनुरोधानंच मी माझं वाङ्मय निर्माण करूं लागलों.

पूर्वी मीं सांगितलंच आहे कीं, आधुनिक नाटक लिहायचं म्हणजे, नाविन्य आणायचं तर, थोडा थोडा कां होईना, प्रत्येक विषयाचा परिचय पाहिजे. शास्त्रं फार आहेत; तत्त्वज्ञानं जशीं वेगवेगळीं आहेत, तशींच तीं परस्पर विरोधींहि आहेत. तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाशिवाय नाटकं लिहितां येणार नाहींत. मानसशास्त्राचा जसा तात्त्विक परिचय पाहिजे; मनोविज्ञानाची संपूर्ण प्रतीति पाहिजे; तसंच नाटककाराच्या अंगीं, मनुष्यस्वभावाचं चिकित्सायुक्त अवलोकन करण्याची स्वतंत्र शक्तिहि पाहिजे. निसर्गाच्या सृष्टीइतकीच मानवी सृष्टि अनंत आहे. त्या अनंताच्या समुच्चयानं एकेक व्यक्ति निर्माण करावी, तेव्हांच नाटकांतील एकेक भूमिका तयार होते. नाटककारावर विधात्याइतकीच जबाबदारी असते. कथा - कादंबरीकारदेखील नवी सृष्टि निर्माण करतो, पण त्याच्या त्या निर्मितीचं प्रात्यक्षिक करून दाखवावं लागत नाहीं. नाटक म्हणजे नाटककारानं निर्माण केलेल्या व्यक्तींच्या स्वभावविकासाचं नैसर्गिक प्रात्यक्षिक आहे. तिथं अवास्तवता पचली जात नाहीं. असा एक काळ होता कीं, अवास्तवतेच्या काव्यमय सौंदर्यावरच नाटकाची उभारणी केली जात होती. पण आधुनिक काळांत ती काव्यात्मकता दृश्याला मानवत नाहीं. नाटक या नात्यानं जें दृश्य समोर दिसत असतं, तें जगांत वावरणाऱ्या मानवी सृष्टीच्या प्रत्यक्ष कसोटीला उतरलं नाहीं, तर आजच्या प्रेक्षकाचं समाधान होणार नाहीं. तें माणुसकीचं वास्तव स्वरूप निर्माण करण्यासाठीं इतर कोणत्याहि पुस्तकापेक्षां जगाच्या पुस्तकाचा अभ्यास करणं जास्त

अवश्य आहे. केवळ पुस्तकी ज्ञानावर विसंबून निर्माण केलेली सृष्टि काव्यात्म ठरेल, पण सजीव ठरणार नाहीं. कल्पनेची भरारी म्हणजे सर्कशींतल्या उड्या आहेत. त्या अस्वाभाविक कोल्हांटउड्या पाहून, माणूस थक्क होऊन जाईल. पण त्या असल्या भराऱ्यांत विधात्याचं विधातृत्व दिसून येणार नाहीं. त्या विधातृत्वाची प्रतीति पूर्णपणें पटावी, म्हणून जो अभ्यास करावा लागतो, तो वास्तव जगांतल्या घडामोडींचा. तें वास्तव जग सामान्यांच्या दृष्टीला दिसत नाहीं. ती वास्तवता हुडकून काढणं ज्याला साधत नाहीं, त्याला नाट्य-निर्मिति करणं शक्य नाहीं. तीच दृष्टि मिळविण्यासाठीं मीं आयुष्य-भर जिवापाड परिश्रम केले. त्या परिश्रमांच्या पायीं दुःखाचे आणि दैन्याचे चटके भरपूर प्रमाणांत मला भोगावे लागले. हे चटके जसजसे वाढत गेले, तसतशी लेखनाची निर्मितिहि वाढत जाऊं लागली. म्हणूनच मला विषयांचा तुटवडा कधीं च भासला नाहीं.

सर्वांना शहाणे करून सोडण्यासाठीं नव्हे, पण जें जें कांहीं आपणाला कळलं, बुद्धीला पटलं, हृदयाला जाणवलं, त्याचा आस्वाद आपल्या भाऊबंदांनींहि घ्यावा, म्हणूनच मी लिहितों. आपल्या सुखांत किंवा दुःखांत भागीदार मिळाला नाहीं, तर त्या सुखाचा किंवा दुःखाचा आनंद आकंठ अनुभवतां येत नाहीं. लेखन हेंच एक असं साधन आहे कीं, तिथं स्वतःला तोशीस न लागतां असंख्य भागीदार मिळूं शकतात. त्या असंख्य भागीदारांच्या भागीदारीमुळं मूळ भांडवल आणि त्यावर मिळणारा नफा विभागला तर जात नाहींच, उलट तो असंख्य पटीनं वाढला जातो. लेखन

नगर वाचनालय, सातारा.



हाच एक असा व्यापार आहे कीं, तिथं नफ्याची आवड आणि तोट्याची नुकसानी केव्हांहि जाणवत नाहीं. तोट्यांतूनच नफ्याचे मार्ग दिसूं लागतात, ते केवळ या लेखनाच्या व्यापारांतच; म्हणूनच मी लिहितों. काव्यानंदांत निमग्न होऊन सहज स्फूर्तीनं माझं लेखन निर्माण होतं, असं म्हणतात, ते सोर ढोंगी आहेत, असा माझा समज आहे. निर्मितीच्या आनंदांत ईश्वराच्या ऐश्वर्याची — विधातेपणाच्या व्यापक वैभवाची जाणीव आहे, म्हणूनच मी लिहितों.

जें कांहीं लिहिलें आहे, त्याचा असंख्य वाचकांनीं उपभोग घेतला; कांहीं तृप्त झाले, कांहीं नाराज झाले; कांहींनीं ढेकरा दिल्या तर कांहींनीं थुंकून टाकलं; ज्यानं त्यानं आपापल्यापरीनं — खुषीचा किंवा नाखुषीचा — आस्वाद घेतला, कीं लेखकाच्या लेखनाचं सार्थक झालं, असं समजावं. लेखनाची निर्मिति हा एक कैफ आहे. तें एक अनावर व्यसन आहे. कोणत्याहि व्यसनाप्रमाणंच हें लेखनाचं व्यसनसुद्धां मरेपर्यंत लेखकाची पकड धरून बसतं. आधींच हा जन्मजात रोग, त्यांत अनुभवानं आणि अभ्यासानं तो बळावलेला; व्यासंगानं आणि अध्यवसायानं अनावर होऊन असाध्य झालेला; म्हणूनच त्या रोगाचीं लक्षणं लेखनाच्या रूपानं प्रत्ययाला येतात; आनंदाला किंवा दुःखाला कारणीभूत होतात. असंख्य वाचक आपलं लेखन वाचीत आहेत, या जाणीवेनं समुदायाशीं समरस होतां येतं; सामुदायिक सायुज्य मिळतं; म्हणूनच मी लिहितों — म्हणूनच मी लिहीत आहे — आणि म्हणूनच या देहांत प्राण असेपर्यंत लिहीत रहाणार आहें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत
आ १४८

# मी कां लिहितों ? ४

श्री. प्रा. न. र. फाटक

" मी हाडाचा लेखक नाहीं, " असें प्रा. न. र. फाटक जरी या लेखांत म्हणत असले, तरी झुंझार टीकाकार व धडाडीचे वृत्तपत्रकार म्हणून आज कित्येक वर्षांपासून महाराष्ट्र त्यांना ओळखीत आहे. ज्या थोड्या धुरंधुर पत्रपंडितांच्या बळावर आज मराठीचा वृत्तसंसार उभा आहे, त्यांत त्यांना मानाचें स्थान द्यावें लागेल. देशांतील राजकीय, धार्मिक व सामाजिक स्थित्यंतरांचे अभ्यासक, निर्भीड पण व्यासंगी टीकाकार, तसेच समतोल वृत्तीचे चरित्रकार म्हणून त्यांनीं जी कीर्ति संपादन केली आहे, ती साहित्याच्या इतिहासांत अढळ राहील, यांत शंका नाहीं. त्यांच्या प्रतिपादनांत आवेश, तळमळ व स्पष्टोक्ति हे गुण प्रामुख्यानें आढळून येतात. त्यांची निस्पृहता व बाणेदारपणा पाहिला कीं, "वाङ्मयसृष्टींतील रामशास्त्री " असेंच त्यांचें कोणीहि वर्णन करील.

वरील प्रकारचें लिखाण त्यांनीं कशाच्या जोरावर केलें ? अशी कोणती प्रेरणा त्यांच्या अंगीं आहे कीं, जीमुळें श्री. न. चिं. केळकर यांच्यासारख्या साहित्यसम्राटावरसुद्धां त्यांनीं लेखणी उचलावी ? रामदासी राजकारणाच्या खरेखोटेपणाविषयीं वाद मांडावा ? एकीकडे " नारायणरावाचा खून कीं आत्महत्या " या पुस्तकाचा समाचार घेण्यासाठीं टाकाची फेंक करावी, तर दुसरीकडे ज्ञानेश्वरीचें रसग्रहण करण्याची मधुकरवृत्तिहि दाखवावी ? "लोकांतील रूढ कल्पनांचें कृत्रिम उघडकीस आणावें," असें त्यांना वाटतें किंवा असत्याचा उजळमाथ्यानें होणारा भ्रामक जयजयकार हटकल्याशिवाय जाऊं देणें त्यांना बरें वाटत नाहीं; तें कां ?

या सर्व गोष्टींचें विश्लेषण त्यांनीं या लेखांत केलें आहे आणि तसें करतांना त्यांनीं आपल्या लेखनप्रेरणेचीं अनेक कारणें सांगितलीं आहेत. प्रतिपक्ष जितका बलवान असेल तितकी त्यांच्या लेखणीला तीक्ष्ण धार चढेत, असें ते एके ठिकाणीं म्हणतात. त्यांच्या लेखनाचें हें प्रेरक तुह्मांस खात्रीनें वैशिष्ट्यपूर्ण वाटेल.

सुरुवातीसच हें मला झटकन् सांगून टाकावेंसें वाटतें कीं, मी हाडाचा लेखक नाहीं. हाडाचा लेखक म्हणजे ज्याला कांहीं ना कांहीं निरंतर लिहीत राहिल्याशिवाय चैनच पडत नाहीं, असा मनुष्य. महाराष्ट्रांत असे हाडाचे लेखक अलीकडच्या काळांत पुष्कळच निघाले आहेत. त्यांचें आणखीहि एक वैशिष्ट्य सांगण्याजोगें आहे व तें म्हणजे लेखनकार्याची विविधता. पूर्वीं ज्याप्रमाणें हरिभाऊ आपटे म्हणजे कादंबरीकार, खाडिलकर - कोल्हटकर म्हणजे नाटककार, अशी कित्येकांच्या संबंधानें प्रामुख्यानें लेखनाची एकविधता आढळत असे. तसा प्रकार आतां उरलेला नाहीं. याचा अर्थ असा नव्हे कीं, हरिभाऊंनीं किंवा खाडिलकर-कोल्हटकरांनीं कादंबरी - नाटकांशिवाय दुसरें कांहींच लिहिलें नाहीं. हरिभाऊंनीं जशीं नाटकें लिहिलीं आहेत, तशा कोल्हटकरांनींहि एकदोन छोटेखानी कादंबऱ्या लिहिल्या आहेत. अर्थ एवढाच कीं, एकाचा भर कादंबऱ्यांवर होता, तर दुसऱ्याचा भर नाटकांवर होता. खाडिलकर केसरी, लोकमान्य, नवाकाळ पत्रांचे बहुत वर्षे संपादक होते, हें ध्यानीं बाळगल्यास त्यांच्या हातून, संपादक या नात्यानें लिहिले गेलेले भिन्नभिन्न विषयांवरील प्रभावशाली लेख सहज लक्षांत येतील. पण त्यांना लोक ओळखतात ते नाटककार म्हणून. चालू तरुण पिढींतल्या लेखकांपैकीं कितीतरी जण वाङ्मयाच्या नानाविध शाखा शृंगारतांना दिसतात. अशा हाडाच्या लेखकांपैकीं मी नाहीं. परंतु मीं कांहीं आजवर थोडें थोडकें लिहिलेलें नाहीं. मोजदाद घ्यायला बसल्यास एखाद्या कोशाच्या आकाराचीं हजारों

पानें भरण्याइतकें माझें लिखाण अवाढव्य ठरेल. मीं गेल्या पंचवीस वर्षांतच कोणासाठीं किती लिहिलें आहे, याचा माझा मलाच पत्ता लागणें शक्य नाहीं, असें मीं विधान केल्यास, तें अतिशयोक्तीचें मानूं नये.

माझ्या विषयाच्या नांवांतून एक श्लेष निघूं शकतो, त्याचाहि विचार सुरवातीस करणें बरें. पुष्कळांना लिहिण्याची प्रेरणा होण्यासाठीं कांहीं अंतःस्फूर्तीऐवजीं बाह्य साधनें अवश्य असतात. म्हणजे त्यांना स्फूर्ति मूळची नसते, असें नाहीं. स्फूर्ति असते, पण सुपारीचें खांड, तंबाखूची चिमूट, तपकिरीची चिमूट, विडी सिगारेटचा झुरका, दारुचा घोट, अशांतलें कांहीं बाह्य साधन पुरविल्याशिवाय ती स्फूर्ति कामच करीत नाहीं, असें कित्येकांच्या बाबतींत ऐकूं येतें. मला असें लेखनप्रेरणेचें कांहीं साधन लागतें काय, या प्रश्नाला माझें उत्तर नकारार्थी आहे. मला फक्त तंबाखू खाण्याची चटक आहे, पण तिच्या लगामीं माझा लेखनव्यापार कधींच गेलेला नाहीं. मग मी जें लेखन करीत असेन, तें कशाच्या प्रेरणेनें ? हाडाचा लेखक नाहीं, तरीसुद्धां लेखन केलें, त्याला वरच्यासारख्या बाह्य साधनाची गरज वाटली नाहीं — वाटत नाहीं; मग मीं लिहिलें अगर लिहितों तें कशाच्या प्रेरणेनें ?

या प्रश्नाचें उत्तर अगदीं सोपें व सरळ आहे. मीं इंदुप्रकाश, नवाकाळ पत्रांच्या संपादकीय वर्गांत पुष्कळ वर्षें काम करीत असतांना, अफाट लिहिलें. त्या लेखनाची प्रेरणा नोकरीच्या कामाची

होती. कचेऱ्यांतील कारकून नाहीं का रोज बरीचशी खर्डेघाशी करीत? त्यांची खर्डेघाशी निर्बुद्ध यंत्रासारखी असते; संपादकांच्या खर्डेघाशींत बुद्धि झिजवावी लागते; हा दोघांच्या कामांतला फरक. संपादकाला दहापंधरा दिवसांच्या अवधीवर, एखादा महत्त्वाचा सार्वजनिक प्रसंग उपस्थित होण्याची शक्यता दिसली, तर संपादक त्या प्रसंगाच्या स्वरूपाचें ज्ञान अगाऊच करून घेतो व त्याप्रसंगीं आपलें वृत्तपत्र लोकांच्या डोळ्यांत भरेल, अशी व्यवस्था करतो. आपल्या वृत्तपत्राचा नांवलौकिक राखण्याची जबाबदारी जाणवत असेल तर कोणत्याहि संपादकाला असें वागण्याखेरीज गत्यंतरच नसतें. माझ्या हातूनहि अशा कांहीं प्रसंगाच्या निमित्तानें कित्येक चिरस्मरणीय लेख लिहिले गेले आहेत. त्यांची प्रेरणा नौकरीचें काम चोख बजावणें एवढीच म्हणावी लागते.

नोकरीबाहेर मीं केलेलें लिखाण स्नेहपरिचयादिकांच्या भिडेचा परिणाम होय. मुंबईच्या व इतर ठिकाणच्या अनेक नियतकालिकांमध्यें, मी माझ्या नांवानें, टोपण नांवानें किंवा अजिबात नांव न देतां, पुष्कळच लिहिलें आहे. कांहीं महिन्यांमागें, मीं "यशवंता"-मध्यें एका पुस्तकाचें परीक्षण म्हणून, बरेच लेख लिहिले. 'यशवंत'चे संपादक ओळखीचे. त्यांनीं फारच गळ घातली. शेवटीं त्यांची भीड मोडवेना, तेव्हां लेख लिहिले. हीच स्थिति अनेक नियतकालिकांच्या दिवाळी विशेषांकांतील लेखांबद्दल सांगतां येईल. मी स्वेच्छेनें एकाहि दिवाळी अंकाला लेख दिल्याचें स्मरत नाहीं. लेखाच्या मागणीचें पत्र माझ्यावर परिणामच करूं शकत नाहीं.

संपादक अथवा त्याचा एखादा माझ्या विशेष ओळखीचा सहकारी, यांपैकीं कोणी येऊन, त्यानें जिकीर केल्याशिवाय त्यांच्या मागणीबद्दल माझ्या अंतरंगांत रुकारच उठत नाहीं. रुकार द्यावा तर विषय सुचत नाहीं. पण हे लेख मागणारे लोक माझ्या ज्ञानाच्या मर्यादा लक्षांत घेऊन, बहुधा माझ्याकरितां एखाद्या विषयाची निवड आधींच करून माझ्याकडे येतात. त्यांनीं विषय सुचविल्यावर थोड्याशा फेरफारानें विषय निश्चित होतो. आणि त्यांनीं रुकारच घेतलेला असतो म्हणून मला लिहावें लागतें. मासिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या बहुतेक सर्व लेखांचा असाच वृत्तांत आहे.

आयत्या वेळीं अडचण उत्पन्न झालेली दिसतांच, तिच्या उल्लंघनाची ईर्ष्या चढून, मीं जें लेखन केलें, त्याची माहिती मनोरंजक ठरेल. नवाकाळ पत्रांत मी कांहीं लघुकथा लिहिल्या आहेत. मात्र त्यांवर माझें नांव सांपडायचें नाहीं. लघुकथेच्या लेखकानें आपल्या कथेंतील एखाद्या प्रसंगाची कल्पना चित्रकाराला देऊन चित्र तयार करवावें, असा एकदां नियम होता. केव्हां केव्हां चित्र काढलें जाऊन, त्याचा ब्लॉकहि तयार होऊन हातीं पडावा आणि त्या चित्राची गोष्ट मात्र हातीं नसावी, असें घडे. सकाळच्या दोन्हीं टपालांनीं किंवा माणसाहातीं गोष्ट न आल्यास, तिची उणीव भरून काढण्यासाठीं, मींच गोष्ट लिहून काढीत असे. तयार झालेल्या चित्रांतल्या देखाव्याला धरून कल्पना करावयाच्या आणि गोष्ट जमवायाची. पुन्हा हें काम अति झपाट्यानें उरकावयाचें असे. कम्पॉझिटर लोकांचा खोळंबा झाल्यास, गोष्ट नसल्याचा बोभाटा

होऊन, कदाचित आपल्या वरिष्ठांचा ठपका येईल, ही भीति असे. मला आठवतें कीं, अशा आयत्या वेळीं लिहून काढलेल्या कांहीं गोष्टींची कथातंत्राच्या तज्ज्ञांनीं तारीफ केलेली होती. अडून राहावयाचें नाहीं, अडचण ओलांडावयाची, हा स्वभावांतला विशेष, कदाचित् या कथालेखनाची प्रेरणा म्हणतां येईल.

मला महाराष्ट्रांत टीकाकार म्हणून ओळखतात. माझ्या हातून लिहिल्या गेलेल्या कांहीं टीका महाराष्ट्राला बहुत काळ स्मरतील, असें वाटतें. श्री. न. चिं. केळकर यांच्या टिळकचरित्रावर १९२४ सालीं लिहिलेले टीकालेख, त्यानंतर रामदासी राजकारणाच्या खरेखोटेपणाबद्दल केलेला उहापोह, त्यानंतर विष्णुशास्त्री चिपळूणकरांच्या योग्यतेचें केलेलें मूल्यमापन व गुदस्तां बेळगांवच्या "नारायणरावाचा खून कीं आत्महत्या" या पुस्तकाचा घेतलेला समाचार, हीं प्रकरणें लोकांनीं चटकन् विसरून जावीं, अशीं नाहींत. या विषयावर लिहिण्याची प्रेरणा मला माझ्या अभ्यासांतून मिळाली. मी इतिहासाचा भक्त आहें, मग तो इतिहास आजचा असो कीं कालचा असो. रानड्यांचें चरित्र लिहितांना, मला मागील शतकाचा समग्र इतिहास चोखाळावा लागला. त्यानंतर नामदार गोखल्यांच्या चरित्राचा अभ्यास करतांना, पुन्हा त्याच इतिहासाची उजळणी झाली. टिळक हे रानडे-गोखल्यांचे बहुतांशीं समकालीनच. यामुळें टिळकचरित्रांतील चुका दिसून आल्या, तेव्हां त्या जनतेपुढें न मांडल्यास आपण खऱ्या ज्ञानाच्या दृष्टीनें जनतेचे गुन्हेगार ठरूं, अशी भावना बळकट झाली. तशीच अवस्था रामदासी

चरित्राचा आणि वाङ्मयाचा अभ्यास करतांना अनुभवास आली. इतके दिवस जें ऐकिलें, ज्याचें हृदयांत मोठ्या आस्थेनें पोषण केलें, तें सारें निराधार, बनावट असा ग्रह त्या अभ्यासानें वाढत गेला. हा अभ्यास बरींच वर्षे चालविला होता. इकडे नेहमींच्या लोकप्रिय कल्पनांचा प्रसार रामदासाचे भक्त मोठ्या आवेशानें करीत होते. प्रथम या विषयाचा खल व्याख्यानांचे द्वारें केला. परंतु तेवढ्यानें भागत नाहीं, असें दिसल्यावर, लेख लिहिले. मग सपाटून वाद झाला. ते लेख लिहितांना लोकांतील रूढ कल्पनांचें कृत्रिम उघडकीस आणावें, असा उद्देश मनामध्यें प्राबल्यानें वावरत होता. येथें माझ्या स्वभावातला एक विशेष नमूद करावासा वाटतो. मग त्याला कोणी गुण समजो वा कोणी दोष समजो. तो विशेष हा:—आपल्या लेखानें प्रतिपक्षी अंगावर आला, म्हणजे लेखनाची प्रेरणा खवळून, त्याच्या पाडावाचें साहस करण्याला मी प्रवृत्त होत असतों. कोणी चांगलासा नामवंत प्रतिपक्षी न भेटल्यास माझ्या लेखनाची मूळ प्रेरणा थंडावते. याचें एक उदाहरण सांगतों. सुमारें बारा वर्षांमागें मी " भागवत धर्म आणि सूफी पंथ " या विषयावर एक तुलनात्मक लेख लिहून, असें दाखविलें होतें कीं, भागवत धर्मावर मुसलमानांच्या सूफी पंथाचा पुष्कळ परिणाम घडला आहे. माझी समजूत होती कीं, त्या लेखावर कोणीतरी भागवत धर्माचे बलाढ्य सांप्रदायिक तुटून पडतील व त्यांच्या प्रतिकारार्थ माझ्याहि लेखणीला चेव चेढल. परंतु ही माझी समजूत सपशेल खोटी ठरली, आणि तो विषय जो मागें पडला, तो आजतागायत. सूफी पंथ व

ग्रंथ वाचनालय, सातारा



भागवतधर्म यांचा तुलनात्मक अभ्यास मी अजूनहि करीत आहे, पण तो लोकांसमोर कधीं येईल, हें सांगवत नाहीं. चांगला प्रतिपक्षी असणें, हें माझ्या लेखनाचें एक प्रेरक असतें. रामदासी वाद महाराष्ट्रभर गाजण्याचें कारण असेंच आहे. अलीकडच्या ऐतिहासिक लेखमालेचें करण असेंच आहे. बेळगांवच्या पुस्तकाचा अत्यंत आवेशानें कित्येकांनीं जयजयकार माजविल्यामुळें, त्या पुस्तकाचें अवलोकन केलें, त्यामध्यें जिकडे तिकडे पुराव्यांचा गोंधळ, मनःपूत कल्पनांचा खेळ, भ्रामक प्रतिपादनाचा थयथयाट, असा विचित्र प्रकार दिसला. असें असूनहि त्याची थोरवी मोठ्या दणक्यानें गाइली जावी व महाराष्ट्रांत इतिहाससंशोधन ५० वर्षें चाललें असून, कोणींहि या अनाठायी स्तुतिवादाविरुद्ध 'ब्र' काढूं नये, याचा चमत्कार वाटला. परंतु मीं स्वयंप्रेरणेनें लेख लिहिले असते कीं नाहीं, याची शंकाच आहे. वास्तविक या पुस्तकाचा विचार करावा, इतका त्याचा लेखकहि प्रसिद्ध नाहीं, आणि पुस्तकांतहि भरीवपणा नाहीं. मीं एकदां म्हटलें कीं, लेखनाची खुमखूम चित्तांत उसळण्यासाठीं मला भक्कम प्रतिपक्षी लागतो. या पुस्तकाच्या आंतबाहेर जर कांहीं नव्हतें तर एकवीस लेखांच्या विस्तारानें मी त्याची विचारपूस कां केली, असा प्रश्न, पुष्कळांच्या डोक्यांत कदाचित हा मजकूर ऐकत असतांना, येऊन जाईल. त्या पुस्तकाचा भ्रामक जयजयकार, हें त्याकडे लक्ष देण्याचें कारण होतें. अशा पुस्तकांतील भ्रमांचा फैलाव जर त्यास जोरानें हटकल्याशिवाय होऊं दिला, तर कालांतरानें ते भ्रम निरपवाद सत्याची जागा आडवून बसायचे, व मग

त्यांचें निर्मूलन कठिण व्हावयाचें या भीतीनें, मी, माझी अलीकडे बरींच वर्षे खळबळीच्या वादापासून दूर असलेली लेखणी, उचलली. या एकंदर हकीकतीवरून समजेल कीं, लेखनास प्रवृत्त करणारीं माझ्या बाबतींतलीं कारणें अगदीं विचित्र आहेत. मी राजकीय, सामाजिक, धार्मिक स्थित्यंतरांचा शक्य तेवढा अभ्यास मनापासून, हौसेनें, केवळ त्या त्या विषयांत स्वतःस ज्ञान असावें, यासाठीं करीत असतो. इतिहास, अर्थशास्त्र, समाजशास्त्र, तत्त्वज्ञान, वाङ्मय हे माझ्या आवडीचे विषय आहेत. पुष्कळदां मला यांपैकीं कोणत्या विषयांत किती कळतें, याची ओळखसुद्धां नसते, म्हणून आपल्यापाशीं लोकांना मुद्दाम सांगण्यासारखें कांहीं आहे व तें सांगितलेंच पाहिजे, असा आग्रह मनांत मुळींच नसतो. अर्थात् लेखनाकडे मन झुकत नाहीं, हें सरळच आहे.

आमच्या प्राचीन काव्यशास्त्रकारांनीं लेखनाचीं - म्हणजे ग्रंथरचनेचीं – एकूण सहा प्रयोजनें किंवा प्रेरणा सांगून ठेविल्या आहेत. कोणी द्रव्यासाठीं, कोणी कीर्तीसाठीं, कोणी अमंगल स्थितींतून सुटण्यासाठीं, तर कोणी सरकारदरबारची लोकांना माहिती पुरविण्यासाठीं, कोणी तात्कालिक आनंदासाठीं, तर कोणी लोकांना उपदेश करण्यासाठीं, या प्रमाणें त्या कारणानें कवीच्या मनाची उठावणी होऊन, त्याच्या हातून लेखन घडतें, असा जुन्या शास्त्रकारांचा सिद्धांत आहे. माझ्या लेखनाच्या आढाव्यानें संपादकीय कामगिरी निर्वाहासाठीं–दुसऱ्या शब्दांत बोलायचें म्हणजे द्रव्यासाठीं- केली.

इतर लेखनाला प्रकाशकांच्या सौजन्यानें थोडेंफार द्रव्य मिळालें, पण त्यासाठीं मीं लिहिलें नाहीं. लेख चांगला वठला तर लोकांनीं त्याची वाहवा करावी, किंवा न रुचल्यास त्याची निर्भर्त्सना करावी, या प्रकारानें भलेंबुरें नांवहि झालें, मी ह्यालाच कीर्ति समजतों. परंतु तें माझें साध्य कधींच नव्हतें. एखाद्या नियतकालिकाला कबूल केल्याप्रमाणें लेख दिला कीं, शब्द पाळला गेला म्हणून जो आनंद लाभेल तोच माझा खराखुरा आनंद असतो. लेख कलेच्या दृष्टीनें कसा काय साधला, अगर त्यांतील माहितीचा, कल्पनांचा विचारांचा वगैरे मालमसाला कसल्या तोलाचा आहे, याची फिकीर मला करतां येत नाहीं, कारण आयत्या वेळीं लेख लिहावे लागतात. कदाचित् हा दोष दैनिकांतील कामामुळें माझ्या स्वभावांत शिरला असेल. शेवटीं सारांशरूपानें मला लेखनार्थ चेतविणारीं कारणें सांगायचीं तर थोडक्यांत म्हणतां येईल कीं, प्रकाशक, स्नेही-मित्रांची भीड, कोणाची अडचण, त्यांत पुन्हां प्रकाशनाची मुदत अगदीं नजीक येऊन भिडलेली असावी, ही माझ्या लेखनाची प्रेरणा आहे.

# मी कां लिहितों ? ९

श्री. चिं. वि. जोशी.

श्री. चिं. वि. जोशी हे बडोद्याला पालीचे प्राध्यापक आहेत, हें पुष्कळांना माहीत नसेल; पण ते 'चिमणरावांचे' मानसपिता आहेत, हें ठाऊक नसलेला माणूस विरळा. आणि त्यांच्या मानसपुत्रानें – चिमणरावानें – त्यांच्या यशाचा झेंडा सर्वत्र फडकविला आहे, हें सांगण्याची येथें मुतराम आवश्यकता नाहीं.

मराठी विनोदाचा प्रांत पिकविला पुष्कळांनीं ( आणि त्यामुळेंच महाराष्ट्रांत 'खसखस' इतकी सवंग व स्वस्त झाली आहे ); परंतु वसविला फार थोड्या लेखकांनीं. विनोदमूर्तींची अशी स्वतंत्र वसाहत स्थापन करणाऱ्या विनोदी लेखकांत श्री. जोशी हे आजचे श्रेष्ठ लेखक आहेत. श्री. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे सुदामा, बंडूनाना व पांडुतात्या; गडकऱ्यांचा बाळकराम; ताम्हणकरांचा दाजी आणि जोशांचे चिमणराव व गुंड्याभाऊ, या मंडळींना ओळखीत नाहीं, असा एकहि सुशिक्षित महाराष्ट्रांत सांपडणार नाहीं. हें विनोदी व्यक्तिरेखनच श्री. चिं वि. जोशांचें महनीय वैशिष्ट्य आहे.

पूर्वीच्या कल्पनानिष्ठ व शब्दनिष्ठ विनोदाला बाजूस सारून, स्वभाववैशिष्ट्यावर आधारलेलें आणि सहज विरोधी प्रसंगांतून उत्पन्न होणारें विनोदी वाङ्मय निर्माण करण्याची जी नवीन विनोदपरंपरा महाराष्ट्रांत सुरुं झाली आहे, त्याच्या नेतृत्वाचा मान यांनाच द्यावा लागेल.

जगांत चोंहीकडे विनोद भरून राहिला आहे; पाहणारी दृष्टि मात्र पाहिजे. श्री. जोशांना नेमका हा विनोदच कसा दिसतो व ते त्याचें कां व कसें चित्रण करतात, याची कथा वाचकाला कळाल्यास, ती त्याला त्यांच्या विनोदी कथेइतकीच हृदयंगम वाटेल नाहीं कां ?

नभोवाणी - चालकांनीं ह्या प्रश्नाचें उत्तर लिहिण्यास सांगून माझ्या आठवणींना आणि विचारांना चालना दिली आहे खरी! मी आज वयाच्या ५५ व्या वर्षीं लिहितों ( किंवा लिहवितों ); स्मरणशक्तीला ताण देऊन, बाळपणच्या आठवणी जाग्या केल्या, तर वयाच्या ८ व्या वर्षींहि मी असेंच कांहींतरी लिहीत असें, असें स्मरतें. आमचें एक विष्णूचें देऊळ आहे पुण्यास. देवळांत नेहमीं कथापुराणें, कीर्तनें व्हायचीं. मला लहानपणीं बैठ्या किंवा धावत्या खेळांची आवड नव्हती. शाळेंतून आल्यावर संध्याकाळचा वेळ मी देवळांत कथा किंवा पुराण ऐकण्यांत घालवीं.

कथेंत बहुधा तुकारामाच्या अभंगांचें पालुपद असायचें आणि तें मला इतकें आवडें कीं, मीहि वेडेवांकडे अभंग रचूं लागलों. अभंगांचे पहिले चरण आतां मला स्मरत नाहींत, पण त्यांची समाप्ति मात्र बिनचूक आठवते:—

" ऐसे म्हणे चिंतामण, व्यास दीसे नारायण "

माझे अभंग मी शाळेच्या गणिताच्या वहींत लिहून ठेवीं. एके दिवशीं वडिलांनीं माझी वही तपासली आणि तींत गणिताऐवजीं हे अभंग पाहून, त्यांनीं मला इतका मार दिला कीं महाराष्ट्र, एका अभविष्यत् कवीला मुकला! माझ्यांतल्या कवीला जर माझ्या वडिलांनीं खुडून टाकिलें नसतें, तर मराठी काव्यसंपदेंत किती मौलिक भर ............... जाऊं द्या झालें.

माझे वडील आगरकरांच्या पश्चात् सुधारक पत्राचे कर्ते झाले व चौदा वर्षें त्यांनीं तें पत्र चालविलें. सुधारकामुळें आमच्या घरीं बहुतेक सर्व वर्तमानपत्रें, मासिकें आणि पुस्तकें अभिप्रायार्थ किंवा मोबदला म्हणून येत असत. तीं वाचण्याची गोडी प्रथम लागली आणि अनुकरणानें लिहिण्याचीहि हौस उत्पन्न झाली. श्रवण आणि वाचन ह्या दोन मुखांनीं लेखनसामुग्रीचा भरपूर पुरवठा माझ्या बाळमनांत होऊं लागल्यावर, त्याच्या उत्सर्जनाची तीव्र उत्कंठा लागणें, अपरिहार्य होतें. त्या चाळीस वर्षांपूर्वींच्या काळांत मुलांनीं अभ्यासाच्या पुस्तकांशिवाय, इतर कोठेंही लक्ष देऊं नये, असा प्रेमळ मातापितरांचा कटाक्ष आणि मला तर कांहींतरी लिहिण्याची हौस. तेव्हां अभ्यासाचा थाट भोंवतीं जमवून, एक पौराणिक कादंबरी मीं लिहून काढिली.

ती वडिलांच्या दृष्टीस पडण्याचा अवकाश ! मजवर आकाशच कोसळलें ! लेखनाची बंदी आणि ती बिचारी 'सुदर्शन' कादंबरी आंघोळीचें पाणी तापविण्याच्या बंबांत भस्मसात् करणें, अशा दोन शिक्षा मला फर्माविण्यांत आल्या. तथापि जिभ्याची खोड मेल्याशिवाय थोडीच जाणार आहे? चोरून गोष्टी, चुटके, प्रवासवर्णनें हें चालूं ठेवलेंच.

रा. वासुदेव गोविंद आपटे हे आमच्या सुधारक ऑफीसांत रोज बैठकीस येत. त्यांनीं आनंद मासिक काढिलें. त्यांत ' मुलांचे लेख ', हें सदर सुरूं करून, त्यांनीं केवळ अभ्यासवादी माता-

पितरांच्या अंगाचा भडका उडवून दिला. आनंदाच्या दुसऱ्या वर्षी, मी लिहिलेली एक गोष्ट माझ्या संपूर्ण नांवासह त्यांत छापून आली, तेव्हां माझ्या अभिमानास व आनंदास सीमा उरली नाहीं. स्वतःच्या छापलेल्या नांवाकडे डोळेभर पाहून, मला समाधान वाटलें आईला तें छापील नांव दाखविल्यावर, तिलाहि आपला मुलगा गोष्टी लिहिण्याच्या नादानें अगदींच वाया गेला नाहीं, असें वाटलें. त्या काळांत छपाई इतकी विपुल झालेली नव्हती. आपण बाकीच्या मुलांपेक्षा विशेष कांहींतरी - शहाणे नाहीं, पण कांहींतरी - आहों आणि आपण त्यांना कांहीं नवें सांगू शकतों, अशी घमेंडयुक्त भावना आतां माझ्या मनांत उत्पन्न झाली. वडिलांनीं किती मार दिला, तरी तो सहन करूं, पण लिहिणें बंद करणार नाहीं, असा मनाचा निश्चय झाला. वडिलांनीं " कारटा ऐकत नाहीं " असें म्हणून मारण्याचें बंद केलें. पण माझ्या लेखनाविरुद्ध त्यांचें मत त्यांच्या १९४४ त झालेल्या मृत्यूपर्यंत कायम होतें !

१९०५ ते १९०८ पर्यंतच्या चळवळींत मीं आपले मामा नारायण गंगाधर व गोपाळ गंगाधर लिमये यांच्या सहकार्यानें ' तरवार ' नांवाचें हस्तलिखित वर्तमानपत्र काढिलें. त्यांत विशेषतः गमतीदार गोष्टी आणि चुटके यांचे सदर मी आपल्या हातांत घेतलें होतें. कोल्हटकरांचे ' सुदाम्याचे पोहे ' आणि ' नाटकी ' नांवानें लिहिणाऱ्या लेखकाचे ' नाटक्याचे तारे ' ह्या दोन हास्यकारक लेखमालांचा गोपूमामावर व मजवर फार परिणाम झाला. नारायणराव जन्मतः कवि असल्यानें, हास्योत्पादक लिहिण्याकडे

त्यांची प्रवृत्ति होत नसे. पण आमची दोघांची प्रवृत्ति छिद्रान्वेषी असल्यानें, व्यंगलेख आणि हास्यकथा लिहिण्याचा अभ्यास आम्हीं सुरूं केला. वडील माणसांच्या न कळत आम्ही आपली 'तरवार' परजीत होतों. पण बरोबरीचा विद्यार्थीवर्ग आमचें लिखाण वाचून खूष होत असे आणि त्यामुळें, आम्हांला आणखी लिहावें, स्वतःची करमणूक करून घ्यावी, दुसऱ्यांची करमणूक करावी व वाहवा मिळवावी, असें फार वाटत असें.

कॉलेजांत गेल्यावर, माझा 'संपादक आणि न्हावी' नांवाचा लेख प्रसिद्ध झाला. कोल्हटकरांच्या 'हजामतीची नीतिमीमांसा' ह्या विनोदी निबंधाच्या अनुकरणानें, हें संपादक वर्गाचें व्यंगचित्र मीं प्रथम इंग्रजी पांचवींत असतांना रेखाटलें होतें व तें हरिभाऊ आपट्यांच्या करमणुकींत प्रसिद्धीसाठीं पाठविलें होतें. त्यानंतर दोन तीन दिवसांनीं माझे वडील आईला जेवणाचें वेळीं सांगूं लागले, "हरिभाऊ म्हणत होते, माझ्याकडे एक 'वर्तमानपत्रकार आणि न्हावी' नांवाचा गमतीदार लेख आला आहे. गमतीदार आहे पण लिहिणाऱ्या मुर्खाला एवढं कळायला पाहिजे होतं कीं, वर्तमानपत्र-कर्ता स्वतःची फजिती स्वतःच्या पत्रांत देईल कशी ?"

माझ्या अंगाचा थरकांप झाला. जर कां तो लेख माझा आहे, असें वडिलांना कळालें, तर आपल्याला चांगलाच चोप बसेल, अशी भीति मला वाटत होती, पण हरिभाऊंनीं लेखाला गमतीदार म्हटलें, हें ऐकून मला फार आनंद झाला होता.

तोच सगळा मजकूर पांच वर्षांनीं कॉलेजच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध केला. त्यावेळीं स्वतःला उद्देशून 'चिंतामणराव' असा शब्द मीं वापरला होता. कॉलेज त्रैमासिकाचे संपादक प्रो. वामन गोविंद काळे यांनीं तो बदलून 'चिमणराव' केला. हा बदल मला इतका पसंत पडला कीं, माझ्या हास्यकथांच्या नायकाचें तेंच नांव मीं कायम केलें.

कॉलेजांतून बाहेर पडल्यावर, गंभीर गोष्टी, निबंध आणि हास्यलेख, असें त्रिविध लिखाण मी करूं लागलों. प्रथम प्रथम हास्यलेख कोल्हटकरी वळणाचे असत. शब्दांवर व शब्दप्रयोगांवर कोट्या आणि व्यंगदर्शक उपरोधी भाषापद्धति, हे त्या वळणाचे विशेष. तथापि माझ्या ध्यानांत येऊं लागलें कीं, कोट्यांच्या काट्याकुट्यांतून सहल करतांना, वाचक अगदीं जेरीस येतो. लेखनाचा मुख्य उद्देश बाजूला राहून लेखकाचें चातुर्यच मुख्य होऊन बसतें. उपरोधी भाषापद्धतिहि माफक प्रमाणांतच वाचकवर्गास रुचते. एकसारखे उपरोधी बोलण्याची संवय असलेल्या माणसांस कोंकणांत 'कुसका' म्हणतात. तसें एकसारखें उपरोधी लिहिणारेहि कुसके वाटले जाण्याचा संभव आहे. उपरोधी लिहिण्यानें, कांहीं वाचकांस चुरचुरींत आनंद होत असला, तरी पुष्कळांचीं मनें दुखवलीं जातात, असा अनुभव आल्यानें, हास्यसाहित्यापुरता आम्ही-म्हणजे लिमये आणि मी - अशा दोघांनीं आमच्या गुरूंच्या मार्गापासून वेगळा मार्ग शोधून काढिला व तो म्हणजे हास्यकथा.

कोल्हटकर आणि गडकरी यांनींहि हास्यकथा बिलकुल

लिहिल्या नाहींत, असें नाहीं. पण कथा हें त्यांच्या लिखाणांतील गौण अंग असून, कोटि, उपरोध अथवा व्याजोक्ति, आणि अतिशयोक्ति हीं अंगें सूत्रबद्ध करण्यापुरताच कथेचा ते उपयोग करीत; आम्हीं कथा प्रधान करून सहज जमली तर एखादी कोटी, वाचकाला बोंचक वाटणार नाहीं अशी व्याजोक्ति आणि अशक्य प्रकारांत जमा होणार नाहीं अशी अतिशयोक्ति प्रसंगोपात वापरूं लागलों. कथेंत अनपेक्षित प्रसंग आणि विचित्र स्वभाव यांच्या वर्णनाचा मीठमसाला घालून, ती चटकदार करण्याचा आम्हीं यत्न केला. बहुतकरून प्रत्येक हास्यकथेंत तत्त्व ग्रथित करण्याचा माझा प्रघात आहे. परंतु तें तत्त्व स्पष्ट शब्दांत न सांगतां, वाचकांनीं अनुमानानें जाणावें, अशा आडनीड पद्धतीनें त्याची मी मांडणी करितों.

साधारणपणें १९२६ पर्यंत गंभीर आणि विनोदी अशा दोन्हीं प्रकारचें लिखाण मी करीत असें. लहानपणीं गोष्टी ऐकण्याची गोडी फार होती व ती वेगळाल्या प्रकारांनीं पुरविली गेली. ऐकलेल्या गोष्टी सांगण्याची आवड उत्पन्न होणें साहजिकच होतें व पुढें आपल्या गोष्टी अधिक लांबच्या लोकांनीं ऐकाव्या, म्हणून त्या लिहिण्याची आवड लागली. गोष्टीप्रमाणेंच आपल्या मतांचा प्रसार करण्यासाठीं लेखनाचीच कांस धरणें जरूर झालें; कारण लहानपणापासून सभाधीटपणाचा अभाव असल्यानें, वक्तृत्वाच्या द्वारें आत्मनिवेदन करण्याची अशक्यता माहीत होती. कित्येक राजकीय व सामाजिक विषयांवर गंभीर लेखहि मीं पूर्वीं लिहिले होते.

तथापि काय असेल तें असो, मासिकांच्या संपादकांनीं विनोदी लेखच मागण्याचा सपाटा लावला. दिवाळीचे अंक आणि खास अंक सजविण्यासाठीं हास्यलेखांचा तुटवडा मराठी मासिकांना जाणवूं लागला. कोल्हटकर, गडकरी, 'नाटक्याचे तारे' – कर्ते पटवर्धन यांनीं मराठी वाङ्मयांतील विनोदाची तार इतकी उंच लावून ठेविली होती कीं, अद्यापहि इतर देशी भाषांतील वाङ्मयांत खपणारा उथळ विनोद गेल्या चाळीस वर्षांपासूनच मराठी वाचकांना तुच्छ वाटूं लागला. महाराष्ट्राला विनोदाचें वावडें नाहीं - उथळ विनोदाचें आहे. अर्थात् विनोदी लिखाण पुरविणारे लेखक थोडे असल्यानें, त्यांच्यावरच सगळा बोजा पडतो. त्यामुळें गेल्या वीस वर्षांत मीं ललितलेखनापैकीं विनोदी लेखनच पुष्कळ केलें व साधारण वाचक-वर्गाला तेंच माहीत आहे.

मी लिहिण्याला प्रारंभ कां केला, तें मला सांगितलेंच. हौस नव्हे, तर ती हाताला एक प्रकारची खाज सुटत असते – ती शमविण्याकरितां लिहिण्याला प्रारंभ केला. खाजेलाहि कांहींतरी कारण लागतेंच; कीटकदंश, चर्मरोग, खाजकुयरीचा स्पर्श इत्यादि शारीरिक खाजेचीं कारणें आहेत. लिहिण्याच्या ह्या खाजेचीं कारणेंहि सांगतां येतील. लिहीत असतां, आपल्या मनांतील कल्पनांना मूर्त-स्वरूप येत असलेलें डोळ्यांनीं पाहून, आनंद वाटत असतो. कोणत्याहि कलाकृतीची निर्मिति जेव्हां कलावन्त करतो, तेव्हां त्याला हा आनंद होत असतो. चित्रकार जेव्हां मनांतील संज्ञे-बरहुकूम हातांनीं आकृति काढितो; गायक मनांत आलेली स्वरप्रवेणी

घशांतून बाहेर काढितो; किंवा कोष्टी मनांत योजलेला वाण तंतूंनीं विणून प्रत्यक्ष सिद्ध करतो; त्यावेळीं त्यांना होणारा आनंद आणि लेखकाला आपल्या कृतीचा होणारा आनंद सारखे आहेत.

लिहीत असतां होणारा आनंद वाचकनिरपेक्ष असतो. आपली कृति वाचली जाणार नाहीं किंवा वाचली गेली तरी इतरांस तिचें महत्व वाटणार नाहीं, हें माहीत असूनहि खरा हाडाचा लेखक लिहीतच असतो. तो आत्मानंदासाठीं लिहितो. ' कलेसाठीं कला ' म्हणतात, ती हीच.

पण इतकी आत्मनिष्ठता किंवा स्पष्ट शब्दांत सांगावयाचें म्हणजे इतका आप्पलपोटेपणा एखाद्याच्याच अंगीं असतो. आपल्या कलेची वाखाणणी व्हावी, असें प्रत्येक कलावंताला वाटत असतें. गाणारी कितीही रंगून गेली असली, तरी ' वाहवा ! छान ! ' अशा स्तुतिपर उद्गारांनीं अधिकच रंग तिच्या गाण्याला चढतो. लेखक हा जरा वरच्या अध्यात्मिक पातळींत असला – कधीं कधीं नसतोही ! – तरी तोहि माणूसच आहे. अष्ट लोकधर्मांच्या बाहेर नाहीं. आपण आपल्या मनाच्या तृप्तीसाठीं रचलेला प्रबंध जगानें वाचावा; चांगला म्हणावें; पर्यायानें आपलीहि जगानें वाखाणणी करावी, असें प्रत्येकाला वाटतें. वैराग्यशाली तुकारामबाबांच्या वह्या इंद्रायणींत टाकल्या, तेव्हां त्यांनाहि फार वाईट वाटलें. मग आमच्या-सारख्या सामान्य लेखकांचा काय पाड ? चार लोकांत आपली कीर्ति व्हावी व आपली मानमान्यता वाढावी, या हेतूनें आपण

लिहिलेली रचना प्रसिद्ध करण्याच्या मागें मी लागलों. कित्येक लेखक पैशासाठीं लिहितात; त्यांना मी दोष देत नाहीं. मी पैशासाठीं कधींहि लिहीत नाहीं पण तो आपोआप चालून येतो.

हल्लीं लिहिण्याची ऊर्मि येत नाहीं. आपल्याजवळ लिहिण्याजोग्या कल्पना, कागदावर उतरण्याजोगे अनुभव उरले नाहींत, ही जाणीव मला आहे. वय:परत्वें असेंहि वाटतें कीं, हास्योत्पादनाचा यत्न आतां शोभत नाहीं. गंभीरच लिहावें; पण नियतकालिकांचे संपादक ऐकत नाहींत, विनोदी लेखासाठींच अडून बसतात. मीहि मग त्यांचें ऐकतों. नातीची करमणूक करण्यासाठीं तिच्यापुढें वेडीवांकडीं तोंडें करावीं लागतातच ना? त्याप्रमाणें अजूनहि विनोदाचा प्रयास करतों पण तो करतांना, स्वत:ला मात्र मी हांसवीत नाहीं.

# मी कां लिहितों ?

६

प्रा. ना. सी. फडके.

तुम्हीं आपल्या आवडत्या ग्रंथकाराचें नांव सांगा असा प्रश्न कोणालाहि विचारा, तो पहिलें नांव प्रा. ना. सी. फडके यांचेंच सांगेल. प्रा. फडके हे मराठीचे आजचे सर्वश्रेष्ठ कादंबरीकार व साहित्यिक आहेत.

कलेसाठीं कला कीं जीवनासाठीं कला या वादांत प्रा. फडके कलेचे प्रचारक ( कदाचित हा शब्द त्यांना अवडणार नाहीं, कारण प्रचारांत कला नसेत असें कुणी म्हणतात ) आहेत. म्हणून जीवनाच्या व्यासपीठावर नव्हें, तर ' प्रमत्त मयुरपिच्छांच्या सुबक सिंहासनावर ' त्यांनीं कलेला अधिष्ठित केलें आहे. सौंदर्य हें नीति - अनीतिपलीकडचें असून, सौंदर्याविष्कार हाच कलेचा हेतु व आनंद हा तिचा आत्मा, असें त्यांचें मत आहे. कलेनें जीवनाची दासी होऊं नयें असें त्यांना वाटतें. त्यांची ही मीमांसा मूलगामी आहे असें कांहींचें मत आहे, तर त्यांचें कलेचें हें तत्त्वज्ञान केवळ स्वप्नरंजन आहे असें कांहीं म्हणतात; कांहींजण तर असेंहि प्रतिपादन करतात कीं त्यांची ही मतप्रणाली म्हणजे साहित्यांतला दुबळा पलायनवाद ( *Escapism* ) होय.

लेखनहेतुसंबंधींचा हा वाद माजविण्याला व गाजविण्याला प्रा. फडकेच कारणीभूत झालेले आहेत. परंतु या वादांतली त्यांची भूमिका तत्त्वचर्चकाची – एका पक्षाच्या प्रवक्त्याची होती. त्यांच्या या लेखाचें स्वरूप-मात्र त्याहून अगदीं वेगळें आहे. येथें त्यांचा अनुभव बोलका झाला आहे. त्यांच्या तर्कानें आत्मकथनाचें ' अहं ' निष्ठ परंतु स्नेहाळ स्वरूप धारण केलें आहे. त्यांच्या मतांच्या सुतीं मोत्यांना आत्मानंदाच्या प्रतीतीचें पाणी चढलें आहे. मोत्यांच्या पाण्यानें अंग भिजत नाहीं. परंतु प्रा. फडक्यांच्या मानस-मौक्तिकांच्या पाण्यानें न्हाऊन तुम्हीं तुषारपुलकित होणार नाहीं असें कोण म्हणूं शकेल ?.

मी कां लिहितों, हा प्रश्न प्रथमदर्शनीं नुसता चमत्कारिकच नव्हे, तर कांहींसा उपमर्दकारक वाटण्यासारखा आहे. एखाद्या लेखकाला कुणी जर एकदम विचारलं, कीं, तुम्ही कां लिहितां? तर त्याला वाटेल, हा काय भलताच प्रश्न! असा प्रश्न विचारणं म्हणजे मी लिहिण्याचा उपद्व्याप विनाकारण करीत आहें, असं सुचविण्या-सारखंच आहे. शिवाय तो प्रश्न ऐकतांच लेखकाला असंहि वाटेल कीं, हा प्रश्न वायफळ आणि आगंतुक आहे; याचं उत्तर अगदीं सोपं आणि उघड असल्यामुळें हा प्रश्न खरं म्हटलं तर उद्भवतच नाहीं. 'तुम्ही कां लिहितां' असा प्रश्न ज्यानं केला असेल, त्याच्याकडे 'किती वेडेपणाचा तुमचा प्रश्न हो!' अशा अर्थानें लेखक पाहील, व तुमच्या प्रश्नाचं उत्तर द्यायला मला काय अवकाश, अशा आविर्भावानं तो म्हणेल, 'मी कां लिहितों? अहो, कां लिहितों, तें अगदीं उघड आहे. मी लिहितों याचं कारण –'

परंतु तें त्याच्या तोंडचं वाक्य बहुधा पुरं होणार नाहीं, आणि पुढें त्याचं बोलणं चालू राहणार नाहीं!

याचं कारण असं कीं, त्या प्रश्नाचं उत्तर त्याला वाटतं तितकं सोपं नाहीं. लिहिण्याच्या क्रियेंतच लेखक इतका मग्न झालेला असतो कीं, 'मी कां लिहितों?' हा प्रश्न त्यानं स्वतःच्या मनाला कधीं विचारलेला नसतो. असा प्रश्न उपस्थित करणं शक्य आहे, याचीच मुळीं त्याला जाणीव नसते. सामान्य मनुष्य प्रत्यक्ष जगण्याच्या क्रियेंतच इतका गुंतलेला असतो कीं, आपण कां जगतों,

या प्रश्नाचा विचार करण्याची फुरसतच त्याला कधीं मिळत नाहीं. कुणी जर त्याला हटकून विचारलं कीं, ' अरे बाबा, तूं जगतोस कशासाठीं ? ' तर तो म्हणेल, 'हा तुमचा प्रश्न किती वेडेपणाचा!' आणि यावर प्रश्न विचारणारा म्हणाला कीं, ' प्रश्न वेडेपणाचा असू दे, पण तूं उत्तर दे. ' तर तें उत्तर अगदीं उघड आहे, असं त्याला वाटेल, पण देतां येणार नाहीं. तुम्हीं कां लिहितां तें सांगा, असा प्रश्न लेखकाला विचारणं म्हणजे या सारखाच प्रकार आहे.

परंतु हा प्रश्न आतां विचारला गेला आहे. तेव्हां माझ्या-सारख्या लेखकानं त्याच्यावर विचार करावयासच हवा. हे लेखक बेटे विनाकारण लिहीत सुटले असले पाहिजेत, असा ध्वनि या प्रश्नांत थोडासा असेल, तर प्रश्न उपमर्दकारक नसला तरी खवचट-पणाचा म्हणावा लागेल; आणि खवचट प्रश्नाला खवचट उत्तर देणं कांहीं फारसं वावगं नाहीं, म्हणून मला असं म्हणायचा मोह होतो कीं, मी कां लिहितों, असं तुम्ही विचारतां, त्याचं उघड उत्तर असं आहे कीं, मी जें लिहीन तें वाचायला लोक तयार आहेत, म्हणून मी लिहितों. कित्येक वेळां कवि आपल्याला असं सांगतात कीं, आम्हीं आमच्या आनंदासाठीं लिहितों. परंतु हें सांगणं मला कांहीं फारसं सुसंगत वाटत नाहीं. जो केवळ स्वतःच्या आनंदा-साठीं काव्य लिहितो, तो फक्त कागदावर लिहील आणि स्वस्थ बसेल. कारण कविता कागदावर लिहून झाली कीं, कवीला जो कोणता आनंद हवा, तो मिळाला, असं व्हावयास हरकत नाहीं. परंतु केवळ स्वतःच्या आनंदासाठीं आम्ही लिहितों म्हणणारे कवि-

नगर वाचनालय, सातारा.
नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


देखील काव्य कागदावर लिहून स्वस्थ बसत नाहींत. तें काव्य प्रसिद्ध व्हावं, लोकांनीं वाचावं, अशी त्यांची धडपड असते. म्हणून पद्य काय अगर गद्य काय, माझ्या आनंदासाठीं मी लिहितों, हें म्हणणं खोटं ठरेल. मी जें लिहितों, तें लोकांसाठीं लिहितों; लोकांनीं वाचावं, म्हणून लिहितों. केवळ माझ्या आनंदासाठीं मी व्याख्यान देतों, असं म्हणणं वक्त्याला शोभेल काय? श्रोत्यावांचून तो व्याख्यान देईल काय? नाहीं! त्याचं व्याख्यान श्रोत्यांसाठींच असतं, आणि श्रोत्यांना तें ऐकण्याची इच्छा असते, म्हणून असतं. लेखनाची गोष्ट अशीच आहे. मी कां लिहितों? तर मी जें लिहीन तें उत्सुकतेनें वाचणारे वाचक आहेत, म्हणून मी लिहितों. एकाद्या सुप्रसिद्ध नटाला जर विचारलं कीं, अरे तुझं वय झालं, अजून तूं नाटकांत कां काम करतोस? तर तो उत्तर देईल कीं, 'लोक मला काम करायसाठीं आग्रहानं बोलावतात, माझं काम पहायची लोकांची इच्छा आहे म्हणून.' याच न्यायानं मी लिहितों याचं खरं कारण हेंच कीं, मी लिहावं, अशी लोकांची इच्छा आहे. मी लोकांसाठीं लिहितों.

परंतु मी लोकांसाठीं लिहितों म्हणजे तरी काय, याचा अधिक स्पष्ट खुलासा झाला पाहिजे. ललितलेखकाची एक व्याख्या अशी करतां येईल कीं, स्वतःचीं सुखदुःखं किंवा कल्पनेनं जाणलेलीं इतरांचीं सुखदुःखं प्रभावी भाषेंत जो सांगतो, त्याला ललितलेखक म्हणावं. समाजांत हजारों व्यक्तींचीं हजारों प्रकारचीं सुखदुःखं भरलेलीं आहेत. त्या सुखदुःखांतून जीं माणसं प्रत्यक्ष जात असतात,

त्यांना त्यांचे कार्यकारणसंबंध कळत नाहींत; आणि तीं इतरांना सांगण्याची त्यांची इच्छा असली तरी परिणामकारक रीतीनं सांगण्याचं सामर्थ्य त्यांच्या अंगीं नसतं. परंतु त्या हजारों मुक्या लोकांचीं सुखदुःखं सहानुभूतीच्या व कल्पनाशक्तीच्या जोरावर ओळखणारा व तीं त्यांचीं त्यांनादेखील सांगतां येणार नाहींत, इतक्या उत्तम प्रकारें सांगणारा असा एक कुणी तरी असतो, व तो तीं सांगूं लागला कीं, ललित साहित्य तयार होतं. हें साहित्य निर्माण करणाराला कवि, कादंबरीकार, नाटककार अशा नावानं आपण ओळखतों. म्हणजे ललितलेखक हा समाजाचा एक प्रकारचा प्रतिनिधि आहे. हा प्रतिनिधि ज्याप्रमाणें स्वतःचे बरेवाईट अनुभव सांगेल, त्याप्रमाणेंच एकंदर समाजाचेहि सांगेल. लोकांचीं विविध सुखदुःखं हा ललितलेखकाचा विषय होय. तीं सुखदुःखं लोकांना नीट कळावीं, त्यावर त्यांनीं विचार करावा, त्यांतून त्यांनीं मार्ग काढावा, यांसाठीं ललितलेखक लेख लिहीत असतो. हें काम प्रत्येक लेखक आपआपल्या शक्तीप्रमाणें कमीअधिक चांगलं करील. परंतु त्याचं काम हें, यांत शंका नाहीं. 'मी कां लिहितों ?' या प्रश्नाला, मी लोकांसाठीं लिहितों, असं जें उत्तर मी दिलं, त्यांतला अभिप्राय हाच आहे.

मला असं वाटतं कीं, ज्याला लेखन करण्याची हौस आहे, व ज्याच्या अंगीं लेखनकौशल्यहि थोड्याफार प्रमाणांत आहे, अशा प्रत्येक माणसानं एक प्रतिज्ञा करायला हवी. ती अशी कीं, माझ्या मनाला जें पटतं तेंच मी लिहीन. आणि तें लिहीनच. म्हणजे असं

१२८ आषा७४८

कीं, कोणत्याहि लोभाला बळी पडून, मी दुसऱ्याचीं मतं तात्पुरतीं दत्तक घेऊन सांगणार नाहीं; आणि उलट कुणाच्याहि रोषाला अगर सत्तेला भिऊन, माझीं स्वतःचीं मतं मी लपवून ठेवणार नाहीं. निस्पृहतेची आणि निर्भयतेची अशी ही दुहेरी प्रतिज्ञा आहे. या प्रतिज्ञेनं जो लिहितो, त्याचं लिखाण संख्यागुणानं कमी असलं, तरी मी त्याला मोठा साहित्यिक समजतों, व त्याच्या लिहिण्याला मोठं साहित्य अशी मी संज्ञा देतों. अशाप्रकारचं मोठं साहित्य निर्माण करण्याची माझी इच्छा आहे, म्हणून मी लिहितें. माझीं सामाजिक, धार्मिक, राजकीय मतं बरोबर असतील किंवा चुकीचीं असतील. चुकीचीं असलीं तरी तीं मला पटलेलीं आहेत, व म्हणून त्याबद्दल माझ्या ठिकाणीं थोडासा आग्रह आहे. तीं समाजाला सांगितलीं पाहिजेत, असं मला वाटतं, म्हणून लिहितों.

या जगांत येणारा प्रत्येक इसम तें सोडून जाण्यापूर्वीं त्यावर आपला ठसा मागें ठेवून जात असतो. जीं माणसं फार मोठीं असतात, त्यांचा ठसा सगळ्यांच्या लक्षांत येतो, व इतिहासांत नमूद केला जातो. लहान सामान्य माणसांचे ठसे लोकांना दिसत नाहींत, पण म्हणून ते उमटत नाहींत, असं नव्हे. ते उमटतातच; व अशा सर्व ठशांनीं मिळूनच जगाची घडी बदलत असते, ज्याला आपण इतिहास म्हणतों, तो घडत असतो, व मनुष्यजातीची प्रगति होत जाते. हें लक्षांत घेऊन, सामान्य माणसांनीं देखील मानवी जीविता-कडे हौसेनं व उत्सुकतेनं पहायला शिकलं पाहिजे. आपण सामान्य असलों तरी या जीविताचे घटक आहोंत व आपलंहि कांहींतरी

नगर वाचनालय, सातारा.

महत्त्व आहे, अशा बुद्धीनं प्रत्येक माणसानं वागायला पाहिजे. या लहानशा साध्या विचाराला जीविताचं तत्त्वज्ञान असं मोठं नांव देता येईल. हें तत्त्वज्ञान मला पटलेलं आहे, व माझ्या भोंवतालच्या शक्य तितक्या अधिक माणसांना शक्य तितक्या अधिक प्रमाणांत तें पटवून द्यावं, अशी माझी इच्छा आहे. तें पटवून देण्याचं एक साधन सुदैवानं माझ्या हातीं मिळालेलं आहे. या साधनाची — म्हणजे लेखनकलेची — गंमत अशी आहे कीं, तें जों जों अधिक वापरीत जावं, तों तों त्यापासून कांहींतरी महत्त्वाची गोष्ट आपण साध्य करीत आहोंत, याचा तर आनंद होतोच, परंतु शिवाय त्या साधनाला अधिकाधिक धार चढत चाललेली दिसते, त्याचाहि आणखी एक निराळाच आनंद मिळतो. या दोहोंना मिळून ‘ वाङ्मयानंद ’ असें म्हणतां येईल. या आनंदाची मला चटक लागलेली आहे; व्यसन लागलेलं आहे; म्हणून मीं लिहितों! आणि नेहमींच लिहिणार !

# मी कां लिहितों ? ७

**श्री. वि. स. खांडेकर.**

लघुकथालेखक, कादंबरीकार, टीकाकार व पटकथालेखक या नात्यांनीं श्री. वि. स. खांडेकर यांनीं मराठी वाङ्मयांत एक वैशिष्ट्यपूर्ण व स्वतंत्र स्थान मिळविलें आहे. ‘ अलीकडील ग्रंथकारांत त्यांच्या तोडीचा कल्पक ग्रंथकार बहुधा एकहि आढळणार नाहीं ’, असें श्री. माडखोलकरांनीं त्यांच्या-संबंधीं उद्‌गार काढले आहेत; आणि आचार्य अत्र्यांनीं तर ‘ आधुनिक कालिदास ’ म्हणून त्यांचा गौरव केला आहे.

प्रा. फडके नितांत कलावादी आहेत तर श्री. खांडेकर हे केवळ जीवनवादी आहेत. जीवन समृद्ध व प्रगत करण्यासाठींच कलेचा जन्म असून त्यांतच तिची पूर्तता आहे, असा श्री. खांडेकरांचा सिद्धांत आहे; आणि पूर्वीच्या स्मार्तवैष्णवांच्या हरिहरवादाप्रमाणेंच या दोघांनीं, मराठी साहित्यांत, हा वाद मोठ्या हिरिरीनें घातला आहे

तें कांहीं असो, या दृष्टिकोनामुळें, खांडेकरांच्या लेखनांत, दलितां-विषयींची तळमळ व विषमता व अन्याय यांविषयींचा तीव्र संताप या भावना उत्कटत्वानें प्रगट झालेल्या दिसतात. जीवनाच्या संघर्षाकडे ते भूतदयेनें पाहतात आणि अनुकंपेनें ओथंबलेल्या लेखणीनें त्याचें चित्रण करतात. गरीब व श्रीमंत, सत्ताधीश व गुलाम, भांडवलदार व मजूर आणि जीवनवादी व कलावादी यांच्या मधलें दोन ध्रुवांचें अंतर तोडण्यासाठीं, त्यांच्या लेखणीची अविश्रांत घडपड चालली आहे, असें त्यांच्या वाङ्मयावरून वाटतें. परंतु जीवनवादी लेखकांची प्रतिभा दोन ध्रुवांचें हें अंतर कधींतरी तोडूं शकेल कां?

हें अंतर तुटेल तेव्हां तुटो, सध्यां एवढें मात्र खरें कीं, या वाङ्मय-दृष्टीमुळें खांडेकऱ्यांच्या कृतींना एक अनुपमेय व अमूल्य सौंदर्य प्राप्त झालें आहे. त्याच्याकडे पाहून कोणीहि असेंच म्हणेल कीं, हत्तीच्या गंडस्थळांत मोत्यांचा आढळ होतो कीं नाहीं, तें मला माहित नाहीं; परंतु खांडेकरांच्या शब्दांशब्दांतून मात्र भूतदयेचे अश्रू मोत्याप्रमाणें चमकतांना दिसतात, हें एक सुंदर सत्य आहे.

' मी कां लिहितों ? ' या कुतूहलजनक प्रश्नांत अवघे तीन शब्द असल्यामुळें, त्याचें उत्तर आपण सहज देऊं शकूं, असें मला प्रथम वाटलें होतें. पण बटु वामनाच्या तीन पावलांनीं जसें त्रिभुवन व्यापलें, त्याप्रमाणें या तीन शब्दांचीं प्रामाणिक व सविस्तर उत्तरें द्यावयाचीं एखाद्या लेखकानें ठरविलें, तर खरोखर त्याला एक मोठा ग्रंथच लिहावा लागेल. तो ग्रंथ म्हणजे त्याच्या साहित्यजीवनाचें आत्मवृत्तच होईल. आणि हें आत्मचरित्र रूसो, गांधी किंवा इझाडोरा डंकन यांच्याइतक्या सत्यनिष्ठेनें त्यानें लिहिलें, तरच त्यानें दिलेलीं उत्तरें वाचकांचें समाधान करूं शकतील.

माझ्या आजच्या छोट्या भाषणांत अशा प्रकारचा प्रयत्न मीं करणें हास्यास्पद होईल. तथापि तृणपर्णावर चमकणाऱ्या छोट्याशा दंवबिंदूंतहि आकाशाचें जसें प्रतिबिंब दिसूं शकतें, त्याप्रमाणें या प्रश्नाचें उत्तर म्हणून मला काय सांगायचें आहे, त्याचें अगदीं पुसट आणि अंधुक कां होईना चित्र रेखाटण्याचा मी प्रयत्न करितों.

' मी कां लिहितों ? ' या प्रश्नाचें एकाच लेखकाचें उत्तर त्याच्या वयोमानावर आणि मानसिक विकासावर अवलंबून राहील. पंचवीस वर्षांपूर्वीं माझें लेखन प्रसिद्ध व्हायला सुरुवात झाली. त्यावेळीं माझी विशी नुकतीच उलटली असून, मी पंचविशीकडे झुकलों होतों. पंचविशींत एक प्रकारची धुंद करून सोडणारी उन्मादकता असते, हें कांहीं मी नव्यानें सांगायला नको ! ' मी

का लिहितों ?' या प्रश्नाचें उत्तर देण्याची पाळी त्यावेळीं माझ्यावर आली असती, तर हा प्रश्न विचारणाऱ्याला मोठ्या ऐटीनें मीं म्हटलें असतें, 'सभ्यगृहस्था ! कवि हा जन्मावा लागतो, तो कारखान्यांत तयार करितां येत नाहीं, हें सुभाषित तुझ्या कानांवरून अद्याप गेलें नाहीं काय? अरे बाबा, लेखन हें येरागबाळाचें काम नाहीं. 'हीं निःश्वसितें कोण सोडिलें,' याचा तूं विचार केला आहेस काय? हें स्फूर्तीचें संगीत आहे, हें प्रतिभेचें नृत्य आहे; ज्यानें कोकिळेला गोड गळा दिला, ज्यानें रातराणीला मधुर सुगंध दिला, ज्यानें मयुराला नयनमनोहर पिसारा दिला, तोच मला हें सारें लिहायला लावीत आहे'!

ही किंवा हिच्याहूनहि अधिक काव्यमय अशी बडबड त्यावेळीं मी निश्चित केली असती, पण आतां पंचवीस वर्षांनीं त्या वेळच्या माझ्या लेखनाकडे मी जेव्हां जेव्हां वळून पाहतों, तेव्हां तेव्हां माझें मलाच हसूं येतें. मी जिला स्फूर्ती समजत होतों, तिच्यांत अनुकरणाची हौसच अधिक होती. मी जिला प्रतिभा मानीत होतों, ती देवल — खाडिलकरांसारखे नामांकित नाटककार निर्माण करणाऱ्या सांगलींत ज्याचा जन्म झाला होता, ज्याच्या भोंवतीं लहानपणापासून अनेक सुंदर नाटकांचें रम्य आणि धुंद वातावरण पसरलें होतें, वयाच्या आठव्या वर्षी वडील अर्धांगवायूनें आजारी पडल्यामुळें ज्याच्या अस्वस्थ बालमनाला कथाकादंबऱ्यांखेरीज दुसरा आनंदाचा झरा आसपास दिसत नव्हता, अशा

एका वाङ्मयप्रेमी विद्यार्थ्याची विविध संस्कारांनीं विकसित झालेली बुद्धि होती.

पण त्यावेळीं मात्र मला तसें वाटत नव्हतें. थोडेसें भाषा-प्रभुत्व, बरेचसें कोल्हटकर-गडकऱ्यांचें अनुकरण, कांहीं अंतःकर-णाला जखम करून गेलेले कटु अनुभव आणि मधून मधून आपली चमक दाखविणारी कल्पकता, एवढेंच त्यावेळचें माझें लेखनाचें भांडवल होतें, असें म्हणायला हरकत नाहीं. पण या भांडवलावर मी त्यावेळीं सारा महाराष्ट्र पादाक्रांत करायला निघालों होतों. मला मधूनच अमरत्वाचा झटका येई आणि वाटे आपण फार चांगलें लिहितों, आपल्या लेखनांतील अक्षर नी अक्षर, अक्षर वाङ्मयांत जमा होण्याच्या लायकीचें आहे, उद्यांच्या इतिहासकारांना माझ्या लेखणींत तरवारीचें सामर्थ्य होतें, असेंच लिहून ठेवावें लागेल !

हा झटका मला फार क्वचित् येत असे म्हणून म्हणा किंवा श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांसारख्या चिकित्सक लेखनगुरूंकडून लेख-नाची चिरफाड होण्याचें भाग्य लाभल्यामुळें म्हणा, लवकरच मला एक गोष्ट कळून चुकली, ती म्हणजे कठोर आत्मपरीक्षण हीच कलावंताच्या प्रगतीची पहिली पायरी असते. जो स्वतःच आपला निष्ठुर टीकाकार होऊं शकेल, तोच कलेची खरी सेवा करूं शकेल.

हें मला जसजसें जाणवूं लागलें, तसतसें माझें मन अनुक-रणाकडे पाठ फिरवून स्वतःच्या विचारांचा, कल्पनांचा आणि भाव-

नांचा प्रामाणिक आविष्कार करण्याचा प्रयत्न करूं लागलें. ' नवमल्लिका ' हा माझा अगदीं पहिला लघुकथासंग्रह घेतला तरी त्यांत अनुकरणाच्या जबरदस्त लालसेबरोबर आत्माविष्काराची पुसट प्रवृत्तीहि प्रतिबिंबित झालेली दिसून येईल, ' जांभळीची शाळा तपासणी ' ही त्या संग्रहांतली विनोदी गोष्ट लिहितांना, मला जो आनंद लाभला होता, त्याची आठवण मी अजूनहि विसरलों नाहीं. तसें पाहिलें तर कोटिबाजपणाचा माझ्यावर कायमचा छाप बसला असूनहि, मी फारशा विनोदी गोष्टी लिहिल्या नाहींत. मला विनोद फार आवडतो आणि माझ्या खाजगी संभाषणांत तो स्वैरतेनें प्रगटहि होतो. पण कुठल्याहि नव्या प्रसंगाकडे किंवा अनुभवाकडे पाहतांना, माझ्यांतला जो कथालेखक जागृत होतो तो मात्र विनोदप्रवण असूं शकत नाहीं. जीवनांतल्या अनेक अनुभूतींचें बहिरंग विनोदी असूं शकतें. त्या बहिरंगाकडे कुतूहलानें पाहतांना, त्याच्या आधारानें विनोदी लेखन करण्याची मलाहि इच्छा उत्पन्न होते! पण न कळत मी अनुभूतींच्या अंतरंगांत प्रवेश करतों आणि अशा रीतीनें मी थोडासा खोल गेलों कीं, तेथें लपलेलें कारुण्य मला जाणवूं लागतें. असें असूनहि ' जांभळीची शाळा तपासणी ' ही हास्यकारक गोष्ट मीं १९२७ सालीं लिहिली, ती कुणा मासिकाची मागें निकड होती म्हणून नव्हे, एकाद्या नियतकालिकाकडून त्या गोष्टीकरितां पैसे मिळण्याची आशा होती म्हणून नव्हे किंवा विचारक्रांतीच्या महत्त्वाच्या काळांत ललितलेखकाच्या लेखणीनें केवळ आपल्या विभ्रमविलासांत गुंग होऊन राहणें अनुचित आहे, या माझ्या श्रद्धे-

मुळेंहि नव्हे ! तर कोंकणांतल्या एका लहानशा खेड्यांतल्या शाळेचें जें चित्र जातां जातां मला पाहायला मिळालें, त्यानें माझ्या कल्पनेला चालना दिल्यामुळें ! त्या दिवशीं माझी कल्पना त्या शाळेभोंवतींच पिंगा घालूं लागली. तिनें खेडेगांवांतल्या शाळेचें एक मजेदार चित्र माझ्या डोळ्यांपुढें उभें केलें ! तें चित्र म्हणजे आपल्या प्रचलित शिक्षणपद्धतीवरली चुरचुरीत टीकाच आहे, अशी माझी खात्री होऊन चुकली. तें कागदावर रेखाटल्याशिवाय मला चैनच पडेना. अनेक महत्त्वाचीं कामें बाजूला ठेवून, मी ती गोष्ट लिहायला बसलों आणि तीनचार तासांत लिहून संपविली.

विजेप्रमाणें लखलकन् चमकून जाणाऱ्या एखाद्या सुंदर कल्पनेनें मन गुंग होऊन गेलें, एखादा विलक्षण कारुण्यपूर्ण अनुभव अथवा विरोध अंतःकरणाला चाटून गेला, एखाद्या दृश्यानें किंवा विचारानें बुद्धीची पकड घेऊन, तिला अगदीं अस्वस्थ करून सोडलें कीं, त्या मनस्थितींत कलाकृतीचें बीज रुजूं शकतें इतकेंच नव्हे, तर प्रसंगीं अंकुरितहि होतें — असा माझा अनुभव आहे. कीर्तीची लालसा लेखनाला प्रेरक होऊं शकते, असें मम्मटापासून विसाव्या शतकांतल्या अद्यावत् टीकाकारांपर्यंत सर्वांचें मत आहे. मासिकांत एखाद्या लेखावर आपलें छापून आलेलें नांव पुनःपुन्हा पाहण्यांत किंवा नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या आपल्या पहिल्यावहिल्या पुस्तकाला वारंवार कुरवाळण्यांत, नवशिक्या लेखकाला विलक्षण आनंद होतो, हें मी नाकारीत नाहीं. पण केवळ कीर्ति मिळविण्या-साठीं म्हणून मनुष्य फारसें उच्च दर्जाचें अथवा विपुल लेखन करूं

शकेल, असें मला वाटत नाहीं. उलट कीर्ति मिळाल्यावर त्याच्या लेखनाच्या वेगाला एक प्रकारचा पायबंद बसतो! कीर्ति ही लक्ष्मी-सारखी आहे. ती मिळविण्यापेक्षां तिचें रक्षण करणें, हें अधिक कठिण आहे, याची त्याला पुढें पुढें तीव्रतेनें जाणीव होत जाते. ज्याला ही जाणीव झाली आहे, असा प्रौढ अंतर्मुख लेखक आपल्या पंचविशी-तिशींतल्या लिखाणाच्या सुधारून वाढविलेल्या आवृत्त्या काढायला अत्यंत नाखूष असतो. कांहीं नवीन किंवा विशेष सांगा-यचें झालें, तरच लेखणी उचलावी, असें पुढें पुढें त्याला वाटूं लागतें. कै. वामन मल्हार जोशी यांच्या हातून आयुष्याच्या शेवटच्या दहा वर्षांत अगदीं अल्प लेखन झालें, याला त्यांच्या प्रकृतीच्या अस्वस्थ्या-इतकीच ही जाणीवहि कारणीभूत होती, यांत शंका नाहीं.

मात्र कीर्तीसाठीं हुकमेहुकूम न लिहिणाऱ्या लेखकाला पैशा-साठीं लेखणी उचलावी लागते, असा माझा अनुभव आहे. कीर्ति हें एक सुंदर स्वप्न आहे. पण पैसा ही दुपारची भाकरी आहे आणि लेखक कितीहि ध्येयनिष्ठ असला, आत्माविष्काराकरितांच लिहाव-याचें असा त्याचा बाणा असला, ज्या भावनेनें आपलें अंतःकरण तळापासून ढवळून काढलें आहे, ती सर्वांगसुंदर स्वरूपांत शब्द-सृष्टींत प्रगट करण्याकरितांच लेखणी उचलायची अशी त्यानें प्रतिज्ञा केली असली, समाजांतलें सौंदर्य, सामर्थ्य आणि साधुत्व वृद्धिंगत करणें, हेंच साहित्याचें एकमेव कार्य आहे, अशी त्याची श्रद्धा असली, तरी —

तरी पैशाकरतां पुष्कळदां त्याला आपल्या आदर्शापासून खालीं यावें लागतें. निदान मी तरी तसा खालीं आलों आहें. कलि-काळापेक्षां माध्यान्हकाळ कठिण असतो, अशी तडफडणाऱ्या मनाची समजूत घालीत, स्वतःला सदोष, कलाहीन किंवा निर्जीव वाटणारें लेखन मीं केलें आहे. एक उदाहरण घेऊनच सांगतों. ' अमृत ' हा माझा चित्रपट १९४१ सालीं पडद्यावर आला. पण १९२८ सालांतल्या हिवाळ्यांत, एका संध्याकाळीं शिरोड्याच्या माझ्या शाळेंतल्या शेतांतल्या बांधावर मी बसलों असतांना, उजव्या बाजूला पसरलेल्या एका जमीनदाराच्या जागेंतल्या माडीचे उंच उंच शेंडे आणि त्या माडीजवळूनच दारू-दुकानाकडे जायला निघालेला एक चांभार पाहून, जी कल्पना मला सुचली होती, ज्या कल्पनेचा विकास करण्यांत पुढें अनेक वर्षे मी अपूर्व आनंदाचा अनुभव घेतला होता, ज्या विकासांतून निर्माण झालेल्या कथासूत्रावर आधा-रलेली आपली ' चांभाराचा देव ' ही कादंबरी ' उल्का ' आणि ' दोन ध्रुव ' यांच्यापेक्षांहि चांगली होणार, असे मनोरे मी मनांत उभारीत होतों, त्या विकासाचें सर्व सौंदर्य रुपेरी पडद्यावर येऊं शकलें नाहीं. मला चरितार्थाकरितां पैशाची जरूरी होती, चित्रपट कंपनीला माझी कथा हवी होती ! मात्र त्या कथेचें मूळचें रम्य पण उग्र स्वरूप कंपनीच्या धंदेवाईक दृष्टीला परवडणारें नव्हतें. तिनें दुःखान्त कथेला सुखान्त बनविलें, जीवनावरली श्रद्धा उडून गेलेल्या एका तरुणाच्या चित्राचें थिल्लर प्रणयीं तरुणांत रूपांतर केलें, दोन वर्गांतल्या कलहाचे भीषण आणि कठोर प्रतिध्वनि हींच ज्या चित्र-कथेंतील खरीखुरीं गाणीं झालीं असतां तिला प्रेमगीतांनीं नटविलें !

— आणि म्हणूनच आज ' मी कां लिहितों ? ' या प्रश्नाचें उत्तर मला एका वाक्यांत द्यावयाचें झालें, तर मी सांगेन, ' मी चित्रपट लिहितों तें पोटासाठीं; लघुनिबंध व रूपककथा लिहितों, त्या स्वतःच्या आनंदासाठीं; आणि टीका, निबंध, लघुकथा व कादंबऱ्या लिहितों, त्या कलेच्या द्वारें जीवनाची सेवा करण्याच्या तत्त्वावर माझी श्रद्धा आहे म्हणून ! '

# मी कां लिहितों ? ८

## राजकवि यशवन्त
( श्री. य. दि. पेंढरकर )

आधुनिक काव्यप्रांतांत रविकिरणमंडळानें जें कार्य केलें आहे, त्याचें राजकवि यशवन्त हें मूर्तिमंत प्रतीक होत. जीवनांतील सामान्य क्षणांचें व संवेदनांचें असामान्य सौंदर्य त्यांनीं साकार केलें. बहुसंख्य लोकांच्या वांट्याला येणारें असमाधान व असफलता यांना बोलके करून, आपल्या आत्मनिष्ठेच्या प्रभावानें – एक प्रकारच्या ओजानें – त्यांना त्यांनीं अलंकृत केलें. आपल्या कल्पक प्रतिभेनें या भावनांना त्यांनीं स्वर्णरूप दिलें आहे; आणि हेंच राजकवींचें अनर्घ्य यशोधन होय. असंतुष्टता व अश्रद्धा हीं आजच्या युगाचीं प्रमुख लक्षणें होत आणि युगाच्या या आंतरिक उद्‌गारांनाच त्यांनीं आपल्या वाणीनें सशब्द केलें. म्हणूनच ते महाराष्ट्राचे आवडते कवि झाले. पण यामुळेंच त्यांच्या काव्याला कांहीं स्त्रैण व निराशावादी म्हणतात. परंतु या भावविवशतेबद्दल स्वतः राजकवि यशवंत अशी ग्वाही देतात:–

"विव्हळण्यांतुनि परंतु बघतों निर्माया जग नवें"

राजकवि यशवन्त आपल्या कवितेचें वर्णन करितांना म्हणतात, "माझी कविता ही माझ्या सुखदुःखांचा परिपाक आहे." या वैयक्तिक सुखदुःखांना हें सामुदायिक आकर्षण कोठून प्राप्त होतें ? आणि कवींनीं स्वतःच्या या हर्षविषादादि भावनांचें समष्टीकरण कसें व कां केलें ? या समष्टीकरणास प्रवृत्त करणारी प्रेरणा तर माणसास लेखनप्रवृत्त करीत नसेल ?

वाहणें आणि प्रकाशणें हा पाण्याचा व अग्नीचा जीवनधर्म आहे. कविता लिहिणें हा कवीचा असाच जीवनधर्म होऊं शकेल काय ?

काय सांगूं या प्रश्नाचें उत्तर ?

मी कां लिहितों बरं ?

रात्र सरतांना पूर्व क्षितिजावर अरुणाचा उदय कां होतो ? कळ्या कां उमलतात ? कृष्ण मेघांतून पावसाच्या सरीवर सरी कां कोसळतात ? मोर कां नाचतात ? पाण्याचें बर्फ कां होतें किंवा बर्फाचे डोंगरच्या डोंगर कां वितळूं लागतात ? समुद्रावर लाटांचं तांडवनृत्य कां सुरूं होतं ? गाई कां पानवतात ? कोंबडी जें अंडें उबवतें त्याचं कवच फोडून त्यांतून पिलूं कां बाहेर येतं ? ह्या प्रश्नांचीं उत्तरें देतां येतील ना ? झालं तर मग, ह्या प्रश्नांच्या उत्तरांचा जो मथितार्थ तोच ' मी कां लिहितों ? ' ह्या प्रश्नाच्याहि उत्तराचा माथितार्थ.

वाटेनें चालतांना किंवा घरांत वावरतांना ठेंच लागली कीं, आपण प्रौढदेखील विव्हळतों. बाळपण सरल्यामुळें, एवढ्या — तेवढ्याला रडायची चोरी झालेली असते; आणि हर्षखेद निखालस मावळून जावेत, इतक्या विमुक्तावस्थेला सामान्य संसारीं माणसं सहसा जाऊं शकत नाहींत. म्हणून आपण प्रौढदेखील ठेंच लागतांच ' हायहुय्य ' करतों. सहलीला बाहेर पडलों असतांना किंवा घर बसल्या खिडकींतून वा सौधावरून, दृष्टीसमोर सूर्योदयाचें किंवा सूर्यास्ताचें रम्य, तेजानें रसरसलेलें रंगक्रीडित पाहून, प्रसन्न चित्तानें आपण कौतुकाल्हादाचे उद्गार काढतों. तें विव्हळणें किंवा उल्हसणें जितकें स्वाभाविक आणि क्रमसिद्ध होय, तितकेंच ललित-

लेखकानें लेखणीला हात घालणेंहि स्वाभाविक होय. पूर्व क्षितिजावर तेजोराशी अरुणाचें अवतरण किंवा कळ्यांचें विकसन जितकें नैसर्गिक, बर्फाचें पाणी किंवा पाण्याचें बर्फ होणें जितकें नियमसिद्ध, मेघांतून जलवृष्टि होणें जितकें सोपपत्तिक आणि कोंबडीच्या पिलानें कवच फोडून अंड्यांतून बाहेर प्रगट होणें जितकें यथाकालोद्भव, तितकेंच कलावंत लेखकानें लेखनप्रवृत्त होणेंहि स्वाभाविक व कालोचित होय. ठेंच लागली कीं विव्हळणें किंवा प्रफुल्ल चांदणें पडलेलें पाहून, त्यांत नाचूं, बागडूं, विहार करूं, असें वाटूं लागणें, यांच्या मुळाशीं जी संवेदनक्षमता व प्रेरणा, तीच ललितलेखकाच्या लिखाणाचीहि जन्मदात्री होय.

'देशकालवर्तमानें । आपण चिंताग्रस्थ होतीं मनें ।
म्हणती कैसीं वांचतील जनें । कैसीं ब्राह्मण्यें तगतील ॥
कैसी क्षेम राहेल जगती । कैसी देव - देवालयें तगतीं ॥
कैसे कुटुंबवत्छल लोक जगती । कोणेकडे जातील हे' ॥

अशी उरींपोटीं विश्वचिंता बाळगून, अखंड चाळणा करणाऱ्या महंताच्या कर्मभूमींत जन्माला येण्याइतकें जरी माझें पूर्वसंचित असलें, तरी —

'जें कांहीं आपणासी ठावें । ते इतरांसी शिकवावें ।
शहाणे करून सोडावें । सकल जन' ॥

ह्या ( त्या महंताच्या ) अभिनिवेशानें लेखनोद्योगास प्रवृत्त होणाऱ्यांपैकीं मी नाहीं. लोकांना सांगायजोगें कांहीं अलौकिक

शहाणपण मजजवळ आहे, असें मला वाटत नाहीं; आणि समर्था-सारखा विश्वसंसाराचा व्यापआटोपहि माझ्या आवाक्यांतला नाहीं.

पण सुरवातीच्या निरनिराळ्या प्रश्नांतून व्यक्त होणाऱ्या प्रेरणा-शक्तीनें मीं लिहितों. मनांत सांडत जाणाऱ्या विकार-विचारांचं ओझं असह्य झालं म्हणजे तें उतरून ठेवावें लागतें — तें उतरून ठेविल्याशिवाय चैन पडेनासें होतें. भारावलेल्या मनाला हलकें वाटा-यला हवें म्हणून हातीं लेखणी घेण्याचा माझा स्वभाव आहे. मनाला व्यथित करणारे सल काढून टाकायला हवेत, मनाला व्याकुळ कर-णारीं दुःखं बोलून दाखवायला हवींत, मनाला रिझविणाऱ्या गोष्टींची अभिव्यक्ति करायला हवी. असें करण्याची इच्छा नसलेल्या मनाला जगांत जगणें जड जाईल. अशी अभिव्यक्ति करूं पाहणारें मनच आपला गोतावळा निर्माण करूं शकतें. असें करणाऱ्या मनालाच आपली वाट चालतां येते.

रस्त्यानें जातांना, लहान मुलांना एकादी गम्मत दिसली तर ती गम्मत मुलें जितक्या उत्सुकतेनें पाहतात, तितक्याच उत्सुकतेनें त्या गमती आपल्या सौंगड्यांना किंवा भावंडांना सांगायला तीं नाहीं कां धांव घेत? पाहिलेल्या गमती दुसऱ्याला सांगितल्याशिवाय त्यांना चैनच पडणार नाहीं; पाहिलेल्या गमती दुसऱ्याला निवेदन केल्याशिवाय, त्या गमती अनुभवल्याचा आनंद पुराच होत नसतो. दुःख सांगून दुःख हलकें करणें आणि सुख सांगून सुखाची गोडी वाढविणें, हा मनाचा धर्म आहे. मनांत जें शिजूं लागतें, त्याचे

कढ बाहेर सांडणारच; मनांत जें घुसळूं लागतें, तें कांठाबाहेर ओसंडणारच. हाच मनोधर्म, मला वाटतं, कोणाच्याहि लेखणीला चालवितो.

'यशोधन' नामक माझ्या कवितासंग्रहांत मीं 'सुनीत' नांवाच्या सुनीतांत असें म्हटलें आहे कीं, :—

होतो स्पर्श इळूंच कोठुनि तरी हृत्तार कम्पाकुला
देते जागृति भावनंप्रति, जशी मन्दानिलें सिन्धुला
तेणें उद्भवती विचार, जलधीपृष्ठीं तरङ्गावली
तत्त्वें सुन्दर मौक्तिकेंच जणुं तीं ज्याच्यांत सामावलीं

त्याच्याच जोडीला, 'भावमंथन' नामक माझ्या तदनंतरच्या कवितासंग्रहाच्या सुरुवातीला कीट्स् कवीचें अवतरण दिलें आहे, तें वाचून पाहावें. तें अवतरण असें आहे —

*'No sooner had I stepped into these pleasures*
*Than I began to think of rhymes and measures.*
*The air that floated by me seemed to say:—*
*"Write; thou wilt never have a better day."*
*And so I did'*

कीट्स्च्या ह्या उद्गाराचा अर्थ हाच कीं, " भिन्नभिन्न सुखानुभूतींच्या प्रांगणांत माझें पाऊल पडलें न पडलें तोंच, माझ्या मनांत छंद-यमकानुप्रास घोळूं लागले. माझ्या भोंवतालीं हेलवणारें वातावरणदेखील मला जणूं काय प्रोत्साहन देऊं लागलें कीं, ' घे,

लेखणी घे आणि लिहून टाक. अशी सोन्यासारखी संधि फिरून येणार नाहीं.' वातावरणांतून मिळणाऱ्या ह्या आदेशाप्रमाणें मी लिहीत आलों आहें"

ह्या दोन्ही अवतरणांसारखाच वरील निवेदनाचा सारांश नाहीं का? आणि कविवर्य केशवसुतहि —

'जें रम्य तें बघुनियां मज वेड लागें
गाणें सवेंचि मग होय मनांत जागें'

असेंच म्हणतात. 'रम्य' ह्या शब्दाचा रूढ अर्थ संकुचित आहे. निदान वरील उक्तींत *Pleasures* आणि 'रम्य' ह्या शब्दांचा अर्थ फार व्यापकपणानें घेणें जरूर आहे. पारध्यानें केलेली शिकार, प्रियतम व्यक्तीचा वियोग, आणि पुष्पविकासाप्रमाणेंच पुष्पाची मलूलता, हीं सारीं ललितलेखकाच्या लेखनप्रवृत्तीपुरतीं 'रम्य' च होत – हीं सारा *Pleasures* च होत. सुखदुःखाच्या मांडवाखालून जातांना, मनाला त्या त्या प्रकारचे हेलकावे मिळतात, मन विकास पावूं लागतें, नाचावेंसें वाटतें. कांहीं वेळा गोठून जाण्यासारख्या येतात, तर कांहीं वेळा जिवाचें पाणी पाणी करून टाकणाऱ्या उद्भवतात. मीं असेंच एकेठिकाणीं म्हटल्याप्रमाणें:—

—'त्याच ठिबकत्या रक्तामधुनी लिहितों गाणें नवें'

× × ×

—'विव्हळण्यांतुनि परन्तु बघतों निर्मीया जग नवें'

× × ×

—' अंधाराच्या जाचामधुनी प्रकाशवांछा स्फुरे '

× × ×

—' साखळदंडातल्या दुर्‍याचीं सुखद सुगंधित फुलें
नभोविहारी बनवूं बघतों करगत किमयेमुळें '

ह्याच माझ्या लेखनप्रवृत्तींचा सारांश होईल.

मी का लिहितों ? ह्या प्रश्नाची व्याप्ति मर्यादित करून, मीं हें निवेदन केलें आहे. त्याच प्रश्नांतून 'लिखाण कां प्रकाशित करतों ?' हा प्रश्नहि अंधुकपणें डोकावतो, असें वाटल्यावरून, त्याचेंहि ओझरतें उत्तर वर येऊन गेलें आहे. आपण पाहिलेली गम्मत सांगणाऱ्यांना न सांगणारा आणि मिळालेला खाऊ एकान्तांत जाऊन खाणारा बालक मित्रविहीन, एकलकोंडा, माणूसघाण्या समजावा. तद्वतच, आपलीं सुखदुःखें दुसऱ्याला न सांगणारा मनुष्यहि ! आपलें दुःख दुसऱ्याला सांगण्यानें समदुःखीं जीवांना धीर येतो आणि सुख सांगण्यानें त्यांच्या आशा पल्लवित होतात आणि अशा रीतीनें ' आपला ' असा एक व्यापक समाज निर्माण होतो. एकान्तांत अनुभवावयाचे किंवा अनुभवलेले भोग देखील औचित्यविवेकाच्या मर्यादा सांभाळून सांगण्याकडे प्रवृत्ति होते, ती ह्यामुळेंच.

लेखनाला प्रवृत्त होणाऱ्या मनाचा हा धर्मच तेवढा सांगितला. त्या प्रवृत्तीच्या यशस्वितेला हव्या असणाऱ्या इतर साहित्याचा—अध्ययन, कला, हेतु, जीवनविषयक दृष्टिकोन, श्रद्धा, वगैरे गोष्टींचा समावेश—ह्या प्रश्नांत होत नाहीं, असा माझा समज आहे.

# मी कां लिहितों ?

श्री. अनिल
( श्री. आ. रा. देशपांडे )

" नवें जग तें
परकष्टावर पुष्ट व्हावयाला
ज्यांत न जागा
मात्र भरपूर सहश्रमाच्या
सहजीवनांत नांदावयाला "

अशा समानतेच्या नव्या जगाचें चित्र जसें कवि अनिल यांनीं आपल्या कवितेंत रंगविलें आहे, तसेंच या जीवननिष्ठ प्रतिभेवर आत्मनिष्ठ गूढवादाचाहि सुंदर फुलोरा त्यांनीं फुलविला आहे. या गूढवादाला ते 'प्रीतिधर्म' म्हणतात. गूढवादी कविता हें वैदर्भीय काव्याचें एक मनोहर वैशिष्ट्य आहे. या प्रकारच्या काव्यरचनेचा बहुमान श्री अनिलानांच आहे; आणि मराठी मुक्तछंदाचे तर ते यशस्वी प्रवर्तक आहेत.

मराठी आधुनिक काव्यांत आमुलाग्र परिवर्तन व्हावें अशी त्यांची तळमळ आहे. " कथन हा काव्याचा विषय लघुकथांनीं व्यापल्यामुळें काव्याच्या विषयाच्या दृष्टीनें क्रांतिकारक प्रयोग करणें आवश्यक झालें आहे " असें सांगून, " भावनात्मक पण जीवनोपयोगी तत्त्वज्ञान आणि जीवनाची चिकित्सा ह्या भागांत मराठी कविता शिरली आणि आधुनिक कविप्रतिभेचा प्रज्ञेशीं संयोग झाला तर मराठी कवितेचा पुन्हा विकास होईल " असा मार्गहि त्यांनीं सुचविला आहे. 'भग्नमूर्ति' व 'चिनी मुलास पत्र' हीं त्यांचीं खंडकाव्यें या नव्या प्रयोगाचीं जिवंत उदाहरणें होत. आरंभीं उद्धृत केलेल्या ओळींतील, सहश्रमांच्या सहजीवनाच्या व मानवहिताच्या समाहाराच्या नव्या संसाराचें स्वप्न त्यांच्या या 'प्रज्ञेचें' च प्रतिक आहे.

मात्र स्वतः अनिल आपल्या काव्यरचनेंतील अनुभूतीविषयीं नम्रपणें इतकेंच सांगतातः—

" भावनांनीं हें हृदय भरुनि आलें   किती त्याचे नयनांत भरू झाले
मूक कांहीं हृदयांत विरुनि गेल्या   किती थोड्या ह्या भावगीत झाल्या "

'मी कां लिहितों ?' हा प्रश्न आजच्या या भाषणाच्या निमित्तानें पहिल्यानेंच माझा मला विचारण्याचा प्रसंग आला. तसें पाहिलें, तर माझें लिहिणें इतकें बेताचें आहे कीं, मी कां लिहीत नाहीं, हाच प्रश्न विचारणें योग्य होईल! आठवूं लागलों, म्हणजे लिहिल्यापेक्षां न लिहिलेलेंच मला अधिक आठवतें!

मीं मुख्यतः कविताच लिहिल्या. काव्यासंबंधीं व मुक्तछंदा-संबंधीं जें थोडेंबहुत लेखन केलें, तें आनुषंगिकच आहे. त्या लेखनासंबंधीं, तें कां लिहिलें, हें उघड असल्यामुळें, कांहीं सांगणें जरूर नाहीं. काव्य हाच माझ्या लेखनाचा विशेष असल्यामुळें त्यासंबंधींच मी सांगणार आहे.

मला वाटतें, नुसतें काव्य लिहिणाराला मी कां लिहितों, हें सांगणें चांगलेंच अवघड आहे. कांहीं कवींनीं तर असेंहि म्हटलें आहे कीं, कोकिळाला 'तूं कुहू कुहू कां करत्येस' हें विचारण्या-सारखेंच, कवीला 'तूं कविता कां करतोस', हें विचारणें आहे. ह्यांत थोडासा 'कविपणाचा' भाग आहे, हें मला कबूल आहे; पण थोडें सत्यहि आहे. कवि आपल्या कृतीला आपला 'स्वभाव' समजत असतो.

अशा स्वाभाविक गोष्टींचीं कारणें सांगणें, अर्थातच कठीण असलें, तरी थोडेंफार शक्य आहे. माझ्या बाबतींत मात्र मला 'नेति नेति'च्या मार्गाचा अवलंब करूनच, मी कां लिहितों, हें सांगावें लागणार आहे.

पुष्कळ कवि म्हणूं शकतील कीं, आम्ही लोकांचें रंजन करण्यासाठीं कविता लिहितों. कवि हा लोकांचें रंजन करणारा प्रतिष्ठित तमाशेकार आहे, हें माधव ज्यूलिअनचें म्हणणें आहेच. इतर कवि म्हणतील कीं, आम्ही थकल्या भागल्या श्रांत जीवांची तहान, भावनांच्या सहानुभूतीनें शमविण्यासाठीं, कविता लिहितों. कुणी म्हणतील, आम्ही सामाजिक आणि राजकीय अन्यायाचें स्वरूप उघड करून, लोकजागृतीकरतां लिहितों. 'काव्यं यशसेऽर्थकृते '– इत्यादि काव्यलेखनाचीं प्रयोजनें प्रसिद्धच आहेत. त्याला आणखीं अशीं कितीतरी प्रयोजनें जोडतां येतील. पण मी मात्र यांतलें कोणतेंहि प्रयोजन माझें म्हणून सांगण्यास धजूं शकत नाहीं. मी कविता कां लिहिल्या, आतां कधींकाळीं कां लिहीत असतों; आणि लिहीत राहिलोंच, तर पुढें कां लिहीन, हे प्रश्न मी स्वतःला विचारूं लागलों, तर अंधुकपणें थोडीशीं वेगळींच कारणें दिसूं लागतात.

मला लहानपणापासूनच कविता वाचण्याची, पाठ करण्याची आणि स्वतःशीं गुणगुणण्याची हौस होती, एवढें मात्र चांगलें आठवतें. त्यावेळीं टिळक, 'बी,' गोविंदाग्रज ह्यांच्या व मनोरंजनादि नियतकालिकांतून येणाऱ्या इतर कवींच्या कविता मी आवडीनें वाचायचा. आपण कांहीं लिहावें, असें उगीच वाटावें, त्या वेळीं पोरखेळ म्हणून कांहीं कविता लिहिल्या. त्या अनुकरणात्मक नव्हत्या, पण त्यांत भावार्थहि नव्हता. कॉलेजमध्यें जाण्याआधीं केशवसुतांच्या कविता वाचल्या. कॉलेजच्या पहिल्या वर्षी केशव-

सुतांच्या कवितांचा मनावर फार परिणाम झाला. वाटूं लागलें कीं, कविता लिहायला कांहीं निराळेंच अंगीं असावें लागतें. त्या विचारामुळें म्हणा, अगर लहर म्हणून म्हणा, पूर्वीच्या कविता नाहींशा केल्या. त्यांची आठवणहि विसरून गेलों. लिहिण्यापेक्षां कविता वाचणेंच बरें, ह्या विचारानें लिहिणें सोडून दिलें.

त्यानंतर एकदोन वर्षांनीं जेव्हां पुनः लिहायला सुरुवात केली, तेव्हां, मी कां लिहितों, हें माझें मलाच कळत नव्हतें ! भावनांच्या संवादानें, क्षोभानें किंवा कांहीं नवीन जाणिवेनें म्हणा, मी माझ्याशींच गुणगुणायला लागलों. आजसुद्धां मी तेव्हां कां लिहायला लागलों, हें सूचकतेचा आणि ध्वनीचा आधार घेऊनच मला सांगावें लागेल.

“ हृदयाच्या अंधारांत लावियेली फुलवात
तुवां आपुलिये हातीं उजळली दिव्य ज्योति
मूर्तिमधूनी प्रचीति अमूर्ताची होय चित्तीं
फुटे शब्द निःशब्दाला हृदयींच्या जिव्हाळ्याला
हृदयाच्या मन्दिरांत लावियेली फुलवात ”

ह्या ओळींत मला वाटतें, मी कां लिहितों, ह्याचें रहस्य सूचकतनें आलें आहे.

भावनांना हलविणाऱ्या गोष्टी जेव्हां घडतात, तेव्हां संवेदनाक्षम हृदयावर त्या आघात करतात. त्या आघातांनीं जो कल्लोळ

उठतो, तो शब्दांत व्यक्त होण्यासाठीं धडपडत असतो. शब्दांत व्यक्त झाल्यामुळें, त्या क्षणापुरता तरी हृदयावरचा भार हलका झाल्यासारखा वाटतो. भावनांच्या कल्लोळाला शब्दांनीं व्यक्त करून, हृदयाचा भार कमी करण्यासाठींच, मी आतांपर्यंत लिहिलें. अजूनहि कधींकाळीं त्याच कारणासाठीं लिहीत असतों.

पण भावनांच्या कल्लोळांतून काव्य निर्माण होतेंच असेंहि नाहीं.

"भावनांनीं हें हृदय भरुनि आलें
किती त्यांचें नयनांत अश्रु झाले
मूक कांहीं हृदयांत विरुनि गेल्या
किती थोड्या हे भावगीत झाल्या"

असा निदान माझा तरी अनुभव आहे.

अत्युत्कट 'भावनांचा सहजोद्गार' हें भावगीताचें कारण आणि स्वरूप आहे, हें पुष्कळ अंशीं खरें आहे. शिवाय काव्याची मूळ चालनाहि भावगीतात्मकच असते. भावगीतें लिहीत असतांच, मी एक दीर्घकाव्य लिहायला घेतलें होतें. त्या काव्याचें नांव 'प्रतिभा.' त्यासाठीं एका नवीन मात्रिक मुक्तछंदाची योजनाहि केली होती. ही १९२३-२४ ची गोष्ट. त्यावेळीं मुक्तछंदाचें नांवहि निघालें नव्हतें. त्या दीर्घकाव्याचा विषय कवि - प्रतिभेचा उद्गम आणि विकास ह्या स्वरूपाचा होता. तें काव्य मीं सातआठशें ओळी लिहून, तसेंच सोडून दिलें. तो मुक्तछंदहि रूढ करूं शकलों नाहीं. पण तेव्हांपासूनच माझ्या मनानें घेतलें होतें कीं, दीर्घ-

काव्याची रचनाहि भावगीताच्या विस्ताराच्या स्वरूपाची असावयास पाहिजे. जो अत्युत्कट अनुभव सहजोद्‌गारानें भावगीताच्या स्वरूपांत प्रकट होतो, तोच अनुभव त्याच भावगीताचा दीर्घ काव्यांत विस्तार करूं शकेल. उदाहरणार्थ, कालिदासाचा ' मेघदूत '. अत्युत्कट अनुभव प्रियाविरहाचा; कल्लोळ तिच्याशीं संवादाचा; मूळ प्रवृत्ति भावगीतात्मक; पण नुसतें लहानसें भावगीत न लिहितां, कालिदासानें त्याचें अतिरम्य असें दीर्घ काव्य बनविलें.

भावगीताच्या वृत्तीच्या विस्तारानें दीर्घकाव्य लिहावें, ही माझी आवडती कल्पना असल्यामुळें, त्याच वृत्तीनें मला माझें पहिलें दीर्घकाव्य ' प्रेम आणि जीवन ' लिहावयास प्रवृत्त केलें. प्रेमांत संकटें आल्यामुळें, एकमेकांवर निस्सीम प्रेम करणाऱ्या कॉलेजांतील एका विद्यार्थी आणि विद्यार्थिनीनें एकत्र आत्महत्या केली. त्या प्रसंगानें माझ्या मनांत अतिशय मोठा भावनाकल्लोळ उत्पन्न केला. ' हेंच प्रेमाचें रहस्य काय ? ' ' प्रेम इतकें दुबळें आहे ? ' ' साऱ्या प्रेमकाव्यांतून अखेर हीच निष्पत्ति ? ' ' कांहीं तरी चुकतें आहे कुठेंतरी ! '

त्या प्रसंगानें माझें मन हळहळलें. हळहळींतून वैचारिक अस्वस्थता आली. ती शब्दांत व्यक्त करण्याच्या धडपडींतून तें दीर्घकाव्य निर्माण झालें. निर्माण होतांना, त्यास साजेसा नवा छंदहि घेऊन आलें. तो पांच आणि सहा अक्षरी चरणकांच्या स्वैर जुळणीचा मुक्तछंद होता. तोच आतां रूढ होऊन, लोकप्रियहि झाला आहे.

नगर वाचनालय, सातारा.



हें दीर्घकाव्य लिहिल्यानंतर त्यासंबंधीं आतां विचार करतांना असें वाटतें:— आपल्या स्वतःच्या भावनाकल्लोळाला शब्दांत व्यक्त करून, मनावरचा दाब कमी करणें, हें जरी तें काव्य लिहिण्याचें मुख्य कारण होतें, तरी एकाद्या सामाजिक घटनेची आपल्या मनावर झालेली क्रिया-प्रतिक्रिया व्यक्त करून, तिचा काव्यास झेपेल इतका आपल्या आत्मप्रत्ययानें तात्त्विक विचार करावा, ही एक इच्छाहि माझ्या मनांत होती. ह्या काव्यांत प्रेम ही जीवनाची शक्ति कशी आहे, जीवनांत आनंद कसा आहे, जीवनानंद किती प्रभावी आहे, ह्याचें काव्यात्म दिग्दर्शन करून शेवटीं,

" प्रणयी जीवांनों, गेल्यावर जीव
ऐकवितों तुम्हां निष्फळ बोल
कारण आहेत अनुभवाचे
माझ्या प्रतीतीचे,
कारण नाहीं मी प्रति - शाहीर
प्रेमाचें रडगाणें गाणारा
शाहीर आहे मी तेजस्वी गाणें
गाणारा, प्रीतीच्या आशावादाचा. "

असा समारोप केला आहे.

नगर वाचनालय सातारा
आ४७४८
दा. नं. ........
से.नं. ...१२८.
२६, भवानी पेठ

' प्रेम आणि जीवन ' हें काव्य काव्याविषयींच्या ज्या मानसिक भूमिकेमुळें लिहिलें गेलें, तीमुळेंच ' भग्नमूर्ति ' हें दीर्घकाव्यहि लिहिलें गेलें. विषय कितीहि निराळा असेना, मला वाटतें,

मला शिल्पांतल्या सौंदर्याची कांहीं विशेष संवेदनाक्षमता आहे. उत्तम शिल्पाचें दर्शन माझ्या अंगावर रोमांच उभा करतें. कालिदासानें गौरविलेल्या रामगिरीवर – रामटेक येथें–जेव्हां मी त्रिविक्रम वामनाची अति सुंदर पण छिन्नविछिन्न मूर्ति पाहिली, तेव्हां माझ्या भावनांचा कल्लोळ उडाला. सौंदर्यप्रतीति, दुःख, उद्वेग, उपहास, त्वेष ह्या भावनांच्या मंथनांतूनच, नव्या आकांक्षा आणि आशा वर आल्या. संस्कृतिनाशाचें रहस्य किंचित् कळलेसें वाटलें. मूळची स्फूर्ति जरी मूर्तीचा नाश पाहून झालेल्या शोकाची होती, तरी तिचा विकास होत जाऊन दीर्घकाव्य झालें आणि —

“ प्रखर उन्हाळा आतां आहे जरी
तापली तयांत धरणीमाय
उलून जाय
दिसे रुक्ष आणि रखरखीत
जीवन-निर्झर सारीकडचे
आटून गेले
पेटतां वणवे
ऊन वाऱ्यानें सारी हिरवळ
वाळून गेली, सुकले वृक्ष
असा आहे जरी आज उन्हाळा
तरी पावसाळा दूर कां आहे ? ”

असा आशावाद सांगावासा वाटला.

एका निर्वासित चिनी मुलाचें चित्र ' निर्वासित चिनी मुलास' हें दीर्घकाव्य लिहिण्याचें निमित्त कारण झालें. पण दुसऱ्या जागतिक युद्धानें निर्माण केलेल्या परिस्थितीनें आणि त्याच्या कारणपरंपरेच्या जाणिवेनें मनांत जो क्षोभ झाला होता, त्यानेंच मला तें काव्य लिहावयास लाविलें. आतां ह्यापुढें मी कां लिहीत आहें, असें जर कोणीं मला विचारलें, तर थोड्याशा आत्मविश्वासानें मी म्हणूं शकेन कीं, माझें मन जीर्ण जगाच्या अमानुष अर्थव्यवस्थेच्या संस्कृतीला विटलें आहे व तीविषयीं माझ्या मनांत द्वेष भरला आहे. नव्या जगाची मला ओढ लागली आहे. मी इतर कार्य काय करूं शकणार ? पण —

" पण माझ्या ह्या साऱ्या कविता
पुऱ्या, अपुऱ्या आणि अधुऱ्या
कांहीं एक दोन शब्दच आणि
उद्‌गार चिन्हें
आहे त्यांत माझें हृदय तसें
जिवंत आणिक धडधडत,
नाचत फिरत, गिरक्या घेत,
आंदोळत आणि हिंदकाळत
स्फुंदत स्पंदत
विकासत नित्य
आहेत हे दुवे
माझ्या भावनांचे, भावजीवनाचे.

एकेक आहे तो जिवंत क्षण
ऊन रक्तानें अनुभवलेला
आणि त्यांतल्या निराशांनींहि
दाखविल्या मला आहेत दिशा
उजळलेल्या
अजून न माझा रोमांच त्यांतील
ओसरलेला
तीच आहे माझी आजीव सेवा
जीवनाची आणि मानवतेची. ”

# मी कां लिहितों ?

दा नं..........
स नं..........
३६ — १०

श्री. य. गो. जोशी.

महाराष्ट्राच्या यशवंत कथाकारांत श्री. य. गो. जोशी यांची गणना होते. त्यांच्या कथांतून, प्रा. फडक्यांच्या लिखाणांतून आढळणारा, मदालसांच्या कज्जलरेखांकित कटाक्षांचा उन्माद ओसंडत नसला किंवा श्री. खांडेकरांच्या वाङ्मयांतल्या ध्येयवादी तरुणांच्या रक्ताश्रूंचें ज्वलन त्यांत धगधगत नसलें, तरी त्यांच्या गोष्टींत जो अकृत्रिम जिव्हाळा सर्वत्र झुळझुळतांना दिसतो, त्यामुळें त्यांच्या साहित्याला एक प्रकारचें संजीवक सौहार्द प्राप्त झालें आहे, याची साक्ष प्रत्येक सामान्य वाचक देईल. भाषेंतला जिव्हाळा व कथनांतला प्रामाणिकपणा यामुळें,त्यांच्या 'कोथिंबिरीच्या काडींत' साध्या जीवनांतले आशय बोलके झाले आहेत व परसांतल्या 'शेवग्याच्या शेंगांना' अमृताची माधुरी लाभली आहे.

"होय, माझ्या लेखनांत विशिष्ट ध्येयवाद नाहीं. त्याप्रमाणें पत्करलेल्या ध्येयवादाची सर्कसहि नाहीं. मी फक्त पाहतों आणि लिहितों", असें य. गो. म्हणतात.

हें 'पाहण्याचें' सामर्थ्य व 'दृष्यां'ची प्रेरणा यांची गोष्ट येथें त्यांनीं स्वतःच सांगितली असल्यामुळें ती किती आकर्षक उतरली असेल, हें सांगण्याचें कारणच उरत नाहीं. पावसाचें हें वर्णनच पहाना —

"पावसाच्या सरी झाडावर पडूं लागतांच, गाईच्या आचळांना वासरानें तोंड लावावें त्याप्रमाणें झाडाचीं पानें पावसाचें स्वागत करूं लागलीं —"

— आणि असा पाऊस कोणाला वेड लावणार नाहीं ?

परवां बोलतां बोलतां मला कोणीतरी विचारलें ' कां हो, तुम्ही कां लिहितां ? '

विचारणाऱ्या माणसाची मी लिहूं नये, अशी इच्छा खास नव्हती. उलट ' अलीकडे तुम्ही फारसें लिहीत नाहीं ' याबद्दलहि तो तक्रार करी. त्या माणसानें परवांच कुठेंतरी माझा एक लेख वाचला. तो त्याला आवडलाहि. आणि त्यानें कांहींतरी जिज्ञासेनेंच मला विचारलें. ' कां हो, तुम्ही कां लिहितां ? '

लहान मुलें जशीं मोठ्या माणसांना विचारतात, ' कां हो, पाऊस कां पडतो ? संध्याकाळीं सूर्य विश्रांतीकरितां कोठें जातो ? सूर्य मावळल्यानंतरच चंद्र उदयाला कां येतो ? सूर्यचंद्राचे आप-आपसांत कांहीं वैमनस्य आहे कां ? दोघे एकदम कां प्रकाशत नाहींत ? यापूर्वी तरी कधीं सूर्य आणि चंद्र खेळीमेळीनें आकाशांत दिसले होते कां ? किंवा यापुढें तरी ते कधीं तसें दिसतील कां ?'

अशाच स्वरूपाचा ' कां हो, तुम्ही कां लिहितां ? ' असा माझ्या मित्रानें मला प्रश्न केला होता. त्यावर मी कांहींतरी उत्तर देणार तोंच माझ्याकडे दोनचार माणसें आलीं आणि तो प्रश्न त्यावेळीं अनुत्तरितच राहिला.

पण माझ्या मनांत मात्र तो प्रश्न तसाच घोळत राहिला. या प्रश्नाचा मी आतांपर्यंत कधीं उभ्या आयुष्यांत विचार केला नव्हता.

मी लिहीत होतों. माझें लिहिणें छापलें जात होतें, पण ' मी कां लिहितों ' याचा मी कधींच विचार केला नव्हता !

नगर वाचनालय, सातारा.



पण ' मी कां लिहितों ? या प्रश्नाचें मी माझ्या मनांतल्या मनांत उत्तर शोधीत होतों. व्यवहाराच्या नादांत तो प्रश्न माझ्या मनांत घोळत राहिला. पण त्याचें उत्तर मला सुचलें नाहीं !

एखाद्या वेळीं असें होतें. एखाद्या गृहस्थाचें आडनांव आपल्याला आठवत नाहीं. आपण म्हणतों, ' याचं आडनांव अगदीं माझ्या डोळ्यांसमोर आहे हो- ' पण तें डोळ्यांसमोर असणारें नांव कांहीं आपल्याला वाचून सांगता येत नाहीं. तसेंच मला वाटे, ' मी कां लिहितों ' याचें उत्तर अगदीं माझ्या डोळ्यांसमोर आहे. पण तें एकदम सांगायला मला सुचेना.

अशांत एक दिवस काय झालें — उन्हाळ्याचे दिवस होते. दुपारीं दोन तीनचा सुमार होता. ऊन्ह चांगलें तापलें होतें. अंगांतून घामाच्या धारा निघत होत्या.

तोंच आकाशांत एकदम ढग जमा झाले. ऊन्ह हळूहळूं दिसेनासें झालें. पेटलेला दिवा नजरेला त्रास देऊं लागला कीं, आपण त्यावर एखाद्या पांढऱ्या कागदाचें आच्छादन घालतों. म्हणजे त्या दिव्याच्या उजेडाची जी स्थिति होते, ती त्यावेळीं ढग आड आल्यामुळें उन्हाची झाली होती.

अशांत कांहीं वेळ गेला. भराभर पावसाचे थेंब जमिनीवर पडूं लागले. पाहतां पाहतां पावसाच्या थेंबाच्या सरी झाल्या. घरें, दारें, झाडें, रस्ते पावसांनीं भिजून निघालीं.

पावसाचा हा खेळ अर्धापाऊण तासच चालला. पुन्हा लगेंच आकाश स्वच्छ झालें. ऊन्ह तळपूं लागलें. पण भिजलेल्या रस्त्यावर आणि घरांवर त्या उन्हाची शोभा कांहीं अवर्णनीय दिसूं लागली ! सर्व रस्ते पाण्यानें धुवून निघाले होते. पाण्याचे बारीक मोठे ओहोळ रस्त्यांतून धावूं लागले होते.

घरांत मुलें खेळत होतीं. पाऊस पडण्याच्या अगोदर जें उन्ह पडलें होतें, त्या उन्हांत त्या मुलांचा कसला तरी खेळ चालला होता. पाऊस पडूं लागतांच, त्यांनीं तो आपला चालूं खेळ थांबविला आणि सर्व मुलें पावसाच्या सरींकडे पाहूं लागलीं आणि एकीकडे तोंडानें बडबडत होतीं, ' येरेऽयेरे पावसा '.

आतां रस्त्यांत ठिकठिकाणीं पाणी सांचलें होतें. पाऊस थांबला होता. मुलांनीं घाइघाईनें घरांतील वर्तमानपत्रांचे कागद घेतले. ते कागद फाडून, मुलांनीं त्याच्या छोट्या मोठ्या नावा आणि होड्या केल्या. आणि रस्त्यावरच्या त्या सांचलेल्या पाण्यांत मुलांनीं त्या नावा, होड्या टाकून दिल्या.

मला वाटलें — मुलांचा रस्त्यावरच्या सांचलेल्या पाण्यांत नांवा, होड्या टाकण्याचा खेळ — आणि आम्हां लेखकांचा लिहिण्याचा खेळ एकच नव्हे कां ?

कित्येक वेळेला आपण केवळ गमतीनें आणि लहरीनें लिहीत असतों.

नंतर मला आठवलें, पाऊस पडण्यापूर्वीं माझ्या नजरेसमोर पांचदहा उंचच उंच झाडें होतीं. आज पाऊस पडला होता, तो या वर्षीचा पहिलाच पाऊस होता. त्यापूर्वीं झाडें धुळीनें माखलेलीं, निस्तेज दिसत होतीं.

पण पावसाच्या सरी झाडांवर पडूं लागतांच, गाईच्या आचळांना वासरानें तोंड लावावें, त्याप्रमाणें झाडांचीं पानें पावसाचें स्वागत करूं लागलीं. स्वतः आनंदानें थैमान घालूं लागलीं. मला वाटलें आपल्याहि मनावर कांहींतरी आणि कधींतरी असाच कल्पनांचा पाऊस पडतो. आणि पावसानें तरारलेल्या झाडाप्रमाणें आपण आनंदानें लिहूं लागतों.

मग मनांत विचार आला कीं, पाणी सांचलें म्हणून त्यांत कागदाची होडी टाकणें – त्यापेक्षां आपल्याला पाऊस होता आलें तर ? आपल्याला वारा होता आलें तर ? म्हणजे आहे त्या परिस्थितीशीं खेळण्यापेक्षां – आपल्याला हवी तशी परिस्थिति बदलण्याचें सामर्थ्य – आपल्याला व्हायला पाहिजे !

या सर्व काव्यमय कल्पना झाल्या – पण प्रत्यक्ष मी कां लिहायला लागलों किंवा लिहितों, याचा विचार करायला लागलें तर अगदीं गद्य उत्तरें द्यावीं लागतील !

लहानपणीं मुलांना जसे कांहीं नाद लागतात, तसा मला लेखनवाचनाचा नाद लहानपणीं लागला. कांहीं वर्षांनीं तो नाद इतका वाढला कीं, एखाद्या दिवशीं जेवण मिळालें नाहीं तर आपण

ज्याप्रमाणें बेचैन होऊं, त्याप्रमाणें लेखनवाचन ही माझ्या जीवनाची भूक ठरली.

पण कांहीं दिवसांनीं वाचनापासून माझें समाधान होईना. आरशांतलें एखाद्याचें प्रतिबिंब पाहून, त्या प्रतिबिंबावर खूष होऊन, आपण त्या प्रतिबिंबाचें मूळ स्वरूप पाहण्याकरितां मागें वळावें आणि कांहीं कारणानें भयंकर निराशा आपल्या पदरांत पडावी, त्याप्रमाणें आपलें मराठी सामाजिक वाङ्मय वाचून — समाजाकडे पहावें तों आपल्या वाङ्मय-आरशांतलीं चित्रें — आणि प्रत्यक्ष समाजचित्रें यांत किती तरी तफावत दिसूं लागली ! 'साहेब-मडम' यांच्या चित्रांना गंध आणि कुंकू लावून, देशीं चित्रें म्हणून विकण्याचा अट्टाहासच मराठी वाङ्मयांत चाललेला मला दिसला.

आणि मग मला वाटलें, आपण आपलीं खरीं चित्रें लिहावींत म्हणून मी माझ्या भोंवतालच्या आणि प्रत्यक्ष पाहिलेल्या समाजाचीं चित्रें लिहूं लागलों. तेंच माझें आकर्षण ठरलें.

लांब लांबची एखादी ऐतिहासिक इमारत किंवा एखादें प्रेक्षणीय स्थळ पहायला मनुष्य जितक्या उत्सुकतेनें जातो, तितक्याच औत्सुक्यानें मी एखादा 'माणूस' पाहण्याचा प्रयत्न करतों. आणि त्या पाहिलेल्या मनुष्याचें प्रतिबिंब शक्य तितक्या प्रामाणिकपणानें वाङ्मयांत रेखाटण्याचा मी प्रयत्न करतों.

अशीं प्रत्यक्षांत पाहिलेलीं चित्रें आणि कथा लिहिण्यांत मला आनंद वाटतो. हा आनंद माझ्या भोंवतालीं मला जेव्हां भेटतो तेव्हां कधीं कधीं मी तो ताबडतोब लिहून मोकळा होतों.

कित्येक वेळेला असे प्रसंग आणि कथा मी मनांत सांचवून ठेवतों. आणि कित्येक वेळेला मित्रमंडळींत अशा कथा मी अत्यंत आवडीनें आणि हौशीनें सांगतों. अशा गोष्टी किंवा चित्रें लिहितांना जितका मला आनंद होतो तितकाच अशा गोष्टी सांगतांनाहि होतो.

अशा गोष्टी माझ्या मनांत सांचल्या म्हणजे त्या विस्मरणानें नाहींशा होऊं नयेत म्हणून ' दिवाळी अंकांकरितां ' लेखांची मागणी आली कीं, मी भराभर लिहून पाठवितों.

अलीकडे दिवाळी अंकाशिवाय मी फारसा कधीं लिहीतच नाहीं. आणि माझ्या संपादक मित्रांनींहि मला सध्यां ' दिवाळी अंकाचा लेखक ' ठरवून टाकलें आहे.

स्वतःचा ' जीविताचा व्यवसाय ' मी लेखनावेगळा ठरला असल्यामुळें — नेहमीं लिहिणें मला जमत नाहीं. त्यावेळीं मी पाहात असतों. मनांत कथाप्रसंग आणि चित्रें सांचवीत असतों. आल्यागेल्यांना त्या कथा आणि ते प्रसंग सांगत असतों. आणि त्यांतही मला लेखनाइतकाच आनंद आणि समाधान भेटते !

त्यामुळें माझ्या लेखनांत विशिष्ट असा ध्येयवाद किंवा तत्त्वज्ञान नाहीं. सर्वांत मला आकर्षक वाटते ' साधी माणुसकी '.

होय, माझ्या लेखनांत विशिष्ट ध्येयवाद नाहीं. त्याप्रमाणें पत्करलेल्या ध्येयवादाची सर्कसहि नाहीं. मी फक्त पाहतों आणि लिहीतों.

लहान मुलें पावसाच्या सांचलेल्या पाण्यांत कागदाच्या होड्या करून जितक्या तल्लीनतेनें टाकतात तितक्याच तल्लीनतेनें मी माझी कथाचित्रें लिहीत असतों. त्यांत माणुसकी सांपडेल. प्रामाणिकपणा सांपडेल. ‘ मी ’ सांपडेन.

तारेवरची सर्कस करतांना सर्कस करणारा माणूस स्वतःचा तोल सांभाळण्याकरितां हातांत काठी धरतो. त्याप्रमाणें आपलें वैयक्तिक जीवन आणि आपलें लेखन हीं एकमेकांस सावरणारीं किंवा पूरक असावीत असें मला वाटतें आणि तीं तशीं जोंपर्यंत आहेत - तोंपर्यंतच मी लिहीत राहीन !

माझ्या जीवनाचे, विचारांचे आणि आपलेपणाचें प्रतिबिंब जोंपर्यंत माझ्या समजुतीप्रमाणें माझ्या लेखनांत उमटत राहील तोंपर्यंतच मला लिहिण्यांत आनंद वाटेल आणि तो आनंद अनुभविण्याकरितांच मी लिहितों !

नगर वाचनालय
ता.
सातारा.

# मी कां लिहितों ? ११

श्री. पु. य. देशपांडे.

आरंभीं, ‘ बंधनाच्या पलीकडे ’ ‘ सुकलेलें फूल ’ व ‘ सदाफुली ’ या कादंबऱ्यांचें कलाकुशल वैदर्भीय ललितलेखक म्हणून श्री. पु. य. देशपांडे महाराष्ट्रीय वाचकांना परिचित झाले. पुढें साहित्य व समाज या वादांत, तत्कालीन सामाजिक गरजांप्रमाणें साहित्य निर्माण होतें, म्हणून साहित्य हें सामाजिक जीवनाचें प्रतिबिंब आहे, या विधानाचें खंडन करून, व्यक्तिविकास व वर्गविरोधजन्य प्रचलित व प्रतिष्ठित सामाजिक जाणिवा यांच्या अन्योन्य संघर्षांतून कला - साहित्य जन्मास येतें, असा सिद्धांत त्यांनीं मांडला आणि साहित्याचे साम्यवादी टीकाकार असा लौकिक मिळविला; आणि आज गांधीवादी मानवतावादाचे प्रभावी पुरस्कर्ते म्हणून त्यांची प्रसिद्धि आहे.

‘ आधुनिक मराठी साहित्य हें आधुनिक भारतीय सामाजिक संघर्षाचें एक अविभाज्य अंग आहे ’ या दृष्टीनें ते मराठी सारस्वताकडे पाहतात व ‘ आधुनिक वाङ्मयांत व्यक्तित्त्वविकास हेंच सर्वश्रेष्ठ जीवनमूल्य ’ आहे असें ते मानतात.

परंतु स्वतःसंबंधीं बोलतांना, श्री. देशपांडे सांगतात, लेखन हा माझ्या जीवनांतील एक अपघात आहे - हें कसें ?

जें लिहावेंसें वाटलें, तें वेळोंवेळीं लिहून मी केव्हांच मोकळा झालों. आतां, त्या लिहिण्याविषयीं पुन्हां लिहावयाचें तरी काय ? मीं जें लिहिलें, तें कसें लिहिलें ? कां लिहिलें ?

किती विचित्र प्रश्न ! यापूर्वी पुष्कळांनीं मला हे प्रश्न विचारले होते. पण त्यांना मीं अधर उडवून दिलें होतें ! पण आतां दोन मित्रांच्या कात्रींत माझी मान अडकल्यामुळें ती सहीसलामत सोडवून घेण्यासाठीं मला या प्रश्नांचीं सुचतील तशीं उत्तरें देणें भाग पडत आहे. या उत्तरांच्या योग्यायोग्यतेबद्दल अथवा खरेखोटेपणाबद्दल मी अर्थात् जबाबदार नाहीं. कारण अनिर्बंध स्वयंस्फूर्तीपेक्षां निर्बंधमय जबरदस्तीच हा लेख लिहिण्याला कारणीभूत झालेली आहे.

माझ्या हातून कसलेंहि लेखन घडेल याची, वयाच्या चोविसाव्या वर्षापर्यंत कल्पनासुद्धां माझ्या मनाला शिवली नव्हती. कॉलेजमध्यें गेल्यापासून तों कॉलेजमधील शिक्षणक्रम जवळजवळ पुरा होईपर्यंत असामान्य कर्तृत्वासाठीं राजकारण व द्रव्यार्जनासाठीं वकिली हीं दोनच क्षेत्रें भावी आयुष्याबाबत माझ्या मनांत तरंगत होतीं. काव्य कथा, कादंबऱ्या, नाट्य व इतर प्रकारचें साहित्यलेखन हें सर्व मला, अगदीं खरें सांगावयाचें म्हणजे, कमी प्रतीचें वाटे ! कलात्मक साहित्यांत रंगणारे व जगांतील नामांकित लेखकांच्या प्रतिभाविला-साची महति गाणारे कांहीं मित्र मला लाभले होते. पण मला या मित्रांचें, अथवा त्यांच्या ' आदर्श ' पुरुषांचें, महत्त्व मुळींच पटेना.

ललित कला व ललित वाङ्मय ही जरा खालच्या पातळीचीच गोष्ट आहे, अशी माझी त्या वेळीं स्वाभाविकपणेंच ठाम समजूत होऊन बसली होती. या माझ्या समजुतीला माझे वाङ्मयप्रेमी व कलाप्रेमी मित्र डिवचूं लागतांच मी कधीं कधीं जरा उसळूनच उत्तर देई, 'जगांत दोन प्रकारचीं माणसें असतात; स्वतः कर्तृत्व करणारीं व दुसऱ्यांच्या कर्तृत्वाचीं गाणीं गाणारीं; महत्त्वाकांक्षाच बाळगावयाची झाल्यास पहिल्या वर्गाचाच पुरुष होण्याची महत्त्वाकांक्षा मी बाळगीन. आम्ही कर्तृत्व करूं. तुम्ही लोक मग त्याची काव्य-कथा - कादंबऱ्यांतून खुशाल गाणीं गा ......!'

अचाट, असामान्य कर्तृत्वाकडे माझें मन जसें स्वाभाविकपणें आकर्षिलें जाई, तसेंच, किंबहुना त्याहिपेक्षां अधिक आवेगानें कधीं कधीं तें ब्रह्मज्ञानाकडे, सर्वसंगपरित्यागाकडेहि आकर्षिलें जाई! ईश्वरभक्तीचें बाळकडूच मला मिळालें होतें म्हटलें तरी चालेल. उमरावतीच्या देवीला - विशेषतः नवरात्रांत - मी वयाच्या सोळाव्या वर्षापर्यंत घातलेल्या प्रदक्षिणांची बेरीज केली, तर ती सहज एक लक्षावर जाईल! पण पंधराव्या - सोळाव्या वर्षापासूनच माझ्या भक्तिभावांत ब्रह्मनिर्वाणाची लालसा मिसळूं लागली. गौतमबुद्धाच्या चरित्राचें आकर्षण केव्हांपासून सुरू झालें, हें मला नक्की सांगतां येणार नाहीं. पण तें अद्यापहि थोड्या बहुत प्रमाणांत कायम आहे. त्याच सुमारास रामकृष्ण परमहंस, स्वामी विवेकानन्द व विशेषतः स्वामी रामतीर्थ यांच्या वाङ्मयानें मला वेड लावलें. अभ्यासासाठीं

म्हणून मी पहाटें चार वाजतां उठत असें; पण शाळेचा अभ्यास बाजूला सारून रामतीर्थांचीं पुस्तकें वाचण्यांत मी तासन्तास रंगून जात असें ! 'सर्वसंगपरित्याग व ब्रह्मज्ञान ही एक प्रचंड शक्ति आहे; ती शक्ति जर आत्मसात करतां आली, तर आपल्याला विश्व जिंकतां येईल' – अशी गूढ श्रद्धा माझ्या अंत:करणाच्या कणाकणांत त्या वेळीं रुजून बसली होती !

ईश्वरभक्ति, बुद्धचरित्र व सर्वसंगपरित्यागाचें दिव्यत्व दिग्दर्शित करणारा वेदांत यांच्या संस्कारांतूनच असामान्य कर्तृत्वाचे भव्य आभास मला प्रतीत होऊं लागलें होते. आणि, मग एकाएकी माझ्या सर्व जीवदेहाला व्यापून टाकणारें एक नवेंच आकर्षण माझ्या जीवाला इतक्या प्रचंड आवेगानें ओढूं लागलें कीं, त्या आवेगाच्या प्रवाहांत माझें सर्वस्वच वाहून गेलें, असें म्हटलें तरी चालेल. सर्व कल्पना, सर्व विचार, सर्व ध्येयें आमूलाग्र हादरून गेलीं ! परमेश्वर, गौतमबुद्ध, ब्रह्मज्ञान व ब्रह्मनिर्वाण या सर्वांच्या साकल्ययुक्त आकर्षणापेक्षां अनंतपटीनें अधिक सामर्थ्यशाली व अधिक अर्थपूर्ण असें नवें आकर्षण माझ्या जीवनाला एका निराळ्याच दिशेनें खेचून नेऊं लागलें. जीवनाचें एक नवेंच दर्शन मला घडूं लागलें. जुन्या कल्पना, जुने विचार, असामान्य कर्तृत्वाचीं जुनीं ध्येयें व ब्रह्मनिर्वाणीची वैश्विक शक्ति-हीं सर्व-सर्व हजारों वर्षांचीं अशीं जुनीं जुनीं, निर्जीव व नि:सत्व अशीं तत्त्वें वाटूं लागलीं ! भूतकाल व त्यांतील सर्व घडामोडी, घटना, प्रमेयें व तत्त्वें नवजीवनदर्शनाच्या

प्रभेपुढें फिकी-फिकी वाटूं लागली ! मृतप्राय भूतकाळांतून चैतन्य-मय वर्तमानांत, अखंड, अनंत क्षणांत माझ्या जीवानें प्रवेश केल्या-सारखें मला वाटूं लागलें.

अशींच कांहींशी अवस्था प्राप्त झाल्यानंतर संत तुकाराम उद्गारले असावेत:—

" तुका म्हणे आतां । उरलों उपकारापुरता "

तुकारामाच्या जागीं मी असतों, तर मी उद्गारलों असतों,

" तुका म्हणे आतां । उरलों आविष्कारापुरता "

असामान्य कर्तृत्व, उदात्त ध्येय, निर्वाण, ब्रह्मपद इत्यादि शब्दांना माझ्या कोषांत आतां अर्थच उरलेला नाहीं. सहजप्रेरणेनें होणारा कृतिरूप अथवा शब्दरूप आविष्कार एवढाच माझ्या दृष्टीनें मानवी जीवनाला, निदान माझ्या जीवनाला, अर्थ उरलेला आहे. बाकी सारें-सारें मला अर्थशून्य होऊन बसलें आहे !

हें ज्ञान कीं अज्ञान, ही प्रगति कीं अधोगति, ही क्रांति कीं प्रतिक्रांति — हें ज्यानें त्यानें आपापल्या दृष्टिकोनानुसार ठरवावें. मला हीं सर्व वर्णनें अर्थशून्य नसलीं, तरी अव्याप्त अशीं वाटतात. मी अनुभविलेल्या अवस्थेचें वर्णन करण्यास सारी शब्दसृष्टि अपुरीच पडते. शब्दांचा संकेतरूप, प्रतीकरूप उपयोग केला, तरच यथार्थतेचे कांहीं ध्वनि त्यांत उमटूं शकतात.

एका नव्या आकर्षणाचा वर वर्णिलेला अपघात जर माझ्या आयुष्यांत घडून आला नसता, तर लेखनांतूनहि जीवनाविष्कार होऊं शकतो, याची मला कधीं जाणीवच झाली नसती. या अपघातामुळें लेखन हा माझ्या बाबतींत एक स्वाभाविक, सहजप्रेरित असा जीवनाविष्कार होऊन बसलेला आहे. याचा अर्थ ज्यांच्या ध्यानांत येईल त्यांना, ' तुम्ही लेखन कसें करूं लागलांत ? कां करूं लागलांत ?' असे प्रश्न मला विचित्र कां वाटतात, याचा सहज अर्थबोध होऊं शकेल. ' तुम्ही श्वसन कसें करूं लागतांत ? कां करूं लागलांत ?' असें जर मी तुम्हाला विचारलें, तर तुम्हाला तें जितकें विचित्र व चमत्कारिक वाटेल, तितकेंच मलाहि माझ्या लेखनाबाबत विचारण्यांत येणारे प्रश्न चमत्कारिक वाटतात.

अपघात कोणत्याहि पूर्वनियोजित कार्यकारणपरंपरेनें घडून येत नसतो. अशा रीतीनें जें घडून येतें, त्याला आपण अपघात म्हणत नाहीं. माझें सर्वच लेखन अपघातात्मक आहे. लेखनाला प्रवृत्त करणाऱ्या घटना नित्य घडतच असतात. पण जें लिहिलें जातें, तें प्रेरक घटनांनीं निर्माण केलेल्या विचारांहून व कल्पनातरंगांहून किती तरी निराळें असतें. माझें जवळ जवळ सर्वच लिखाण हें अखंड अपघातासारखें आहे. या लेखाचेंच उदाहरण घेऊन मी सांगतों कीं, हा लेख लिहायला बसलों, तेव्हां यांत जें लिहिलें गेलें आहे, त्याची अस्फुटदेखील कल्पना माझ्या मनांत नीटशी उभी राहिली नव्हती. आपल्या लेखनाबाबत 'आत्मकथनपर' असें कांहीं तरी आपल्याला मित्रांच्या आग्रहास्तव लिहिलेंच पाहिजे,

नगर वाचनालय सातारा
संगणकीकरण

एवढीच ओढ माझ्या मनाला लागलेली होती. पण या लेखांत जें लिहिलें गेलें आहे, तें पूर्णपणें अपघातात्मकच आहे !

लेख अथवा पुस्तकाचीं प्रकरणें लिहून झाल्यानंतर मी त्यांत मुळींच फेरफार करीत नाहीं, असें नाहीं. कित्येकदां मी जें लिहिलें, तें फाडूनहि टाकलें आहे. परंतु एकदां जें लिहिलें गेलें, व जें राहूं द्यावें अथवा प्रकाशित करावें, असें मी ठरविलें, त्यांत मी फारच थोडे फेरफार केलेले आहेत. अनेक पुस्तकांच्या व लेखांच्या स्थूल कल्पना व योजना माझ्या मनांत नित्य तरंगत असतात. त्यांना मूर्तरूप दिलें जात नाहीं, याबद्दल मी स्वतःला दोषहि देत असतों. पण जें आपल्या हातून कधीं घडेल, याची कल्पनाहि मनाला शिवलेली नव्हती व जें केवळ एका अपघातामुळेंच आपल्या हातून घडूं लागलें, तें आतां पूर्वसंकल्पित योजनेनुसार मोठ्या प्रमाणांत व पद्धतशीरपणें घडविणारे आपण कोण ? असा प्रश्न मनांत येतांच लेखनविषयक माझ्या सर्व योजना पत्त्यांच्या बंगल्याप्रमाणें ढासळून पडतात. अपघातांच्या पकडींतून माझें मन विमुक्त करणें, अथवा अपघातांच्या अखंड विमुक्तपणांतून मनाला पूर्वनिश्चित योजनांच्या बंधनांत जखडून टाकणें, मला अद्यापहि अशक्य होत आहे !

जें केवळ आत्माविष्कारात्मक असतें, त्याबाबत कलात्मक — कलाशून्य, नैतिक - अनैतिक, पुरोगामी प्रतिगामी, क्रांतिकारक — प्रतिक्रांतिकारक, सारांश चांगलें अथवा वाईट, सुंदर अथवा असुंदर, अशीं विशेषणें वापरून, त्याचें महत्त्वमापन करणें, हें मूलतःच

सदोष व चुकीचें आहे. आत्माविष्कार फक्त यथार्थ व अयथार्थ या दोनच स्वरूपांचा असूं शकतो. संपूर्ण यथार्थता शब्दांच्या अथवा इतर कोणत्याहि माध्यमांतून प्रकट होऊं शकते किंवा नाहीं, हा प्रश्न वादाचा विषय कदाचित् होऊं शकेल. 'कदाचित्' असें म्हणण्याचें कारण आत्मप्रकटीकरणासाठीं जें माध्यम निवडलें जातें, तें सहजप्रेरणेनेंच निवडलें जातें. शब्द, स्वर, रंग, शिल्प इत्यादि माध्यमें व्यक्तीच्या आत्मप्रकटीकरणासाठीं त्या त्या व्यक्तीच्या सहज-प्रेरणेनेंच उदयास आलेलीं आहेत. प्रत्येक माध्यमाला अंगभूत मर्यादा आहेत. पण आत्मप्रकटीकरणासाठीं अथवा आत्माविष्कारा-साठीं व्यक्ति सहजप्रेरणेनें, जेव्हां एखादें माध्यम निवडते, तेव्हां त्याचा अर्थच असा होतो कीं, आपला आत्माविष्कार त्या विशिष्ट माध्यमांतूनच यथार्थपणें होऊं शकेल, असें त्या व्यक्तीला — अगदीं स्वाभाविकपणेंच वाटत असतें.

असें जरी असलें, तरी प्रत्येक आत्माविष्कार संपूर्णपणें यथार्थ नसतो, हें यथार्थ आत्माविष्कारासाठीं तळमळणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला जाणवत असलेंच पाहिजे, असें मला वाटतें. निदान मला तरी हें फारच तीव्रतेनें जाणवत आहे. यथार्थ आत्माविष्काराची अंतिम सीमा मला अजून गाठतां आलेली नाहीं, याची मला पूर्ण जाणीव आहे. म्हणूनच अधिकाधिक यथार्थ आत्माविष्कारासाठीं माझें मन अखंड तळमळत असतें. ही तळमळ मनांत आहे, म्हणूनच अधिका-धिक यथार्थ आत्माविष्करण माझ्या हातून केव्हां ना केव्हां तरी घडेल, अशी आशा मला नित्य वाटत असते.

माझें साहित्य चांगलें कीं वाईट, सुंदर कीं असुंदर, कलात्मक कीं कलाशून्य, हें प्रश्न माझ्या मनाला यत्किंचित्‌हि विचलित करीत नाहींत. माझें सर्व साहित्य वाईट, असुंदर व कलाशून्य आहे, असा टीकाकारांनीं व रसिकांनीं एकमतानें निर्णय दिला, तरी त्याचा मला यत्किंचित्‌हि विषाद वाटणार नाहीं! पण तें अयथार्थ व अप्रामाणिक आहे, असें जर कोणीं म्हटलें, तर मात्र माझ्या मनाला बऱ्याच वेदना होतील.

माझें साहित्य यथार्थ आत्मदर्शनाच्या व वस्तुदर्शनाच्या दृष्टीनें अद्याप अपूर्ण व अपरिपक्व आहे, याची मला जाणीव आहे. इतर दृष्टींनींहि तें बरेंच सदोष आहे. पण जें जें मीं लिहिलें आहे, तें सर्व पूर्णपणें प्रामाणिक आहे, एवढाच माझा दावा आहे. यथार्थ आत्मदर्शनाचा व वस्तुदर्शनाचा प्रयत्न, अधिकाधिक उत्कट, निर्दोष व प्रभावशाली प्रयत्न, याशिवाय दुसरा कोणताहि हेतु माझ्या लेखनाला प्रेरक झालेला नाहीं.

# मी कां लिहितों ?

श्री. दिवाकरकृष्ण केळकर.

आपल्या प्रांताचे एक विख्यात व कलावंत आधुनिक लेखक म्हणून सारा मराठवाडा श्री. दिवाकरकृष्णांकडे अभिमानानें पाहतो. वर्तमानपत्र – मासिकांतून आज जरी त्यांचें नांव वेळीं अवेळीं लोकांपुढें येत नसलें, तरी आधुनिक लघुकथेचे एक यशस्वी ' शिल्पकार ' व शैलीकार या नात्यानें मराठी कथावाङ्मयात त्यांनीं स्पृहणीय यश मिळविलें आहे. लघुकथेला आजचें कलापूर्ण व आकर्षक स्वरूप प्राप्त करून देण्यासाठीं ज्या पुरोगामी लेखकांचे प्रयत्न व श्रम कारणीभूत झाले आहेत, त्यांत दिवाकरकृष्णांची गणना होते.

मनोवेधक व रसाळ भाषा, सुंदर व मार्मिक स्वभावलेखन व करुण-गूढ वातावरणनिर्मिति हे त्यांच्या लेखनाचे मनोहर विशेष आहेत.

" अयि विद्युत् प्रमदानाम् त्वमपिच दुःखं न जानासि किम् " हा त्यांच्या लघुकथेंतल्या एका पात्रानें विचारलेला मृच्छकटिक नाटकांतला प्रश्न, श्रावणी ढगाप्रमाणें, त्यांच्या संपूर्ण कथावाङ्मयावर पसरल्यासारखा दिसतो; आणि वाटतें, जगांतल्या दुःखाकडे पाहून, ' बाई मानवते, तुला – देखील आमचें दुःख समजत नाहीं कां ? ' असाच करुण प्रश्न त्यांची कथा मानवतेला विचारीत आहे !

अनेक नामवंत साहित्यिकांचीं ' तुम्ही कां लिहितां ? ' या प्रश्नाचीं वेगवेगळीं उत्तरें या नभोवाणीवरून यापूर्वीं आपण ऐकलीं असतीलच. ही या ध्वनिकेन्द्राची कल्पना अभिनव आणि अभिनंदनीय आहे, यांत संशय नाहीं. साहित्याच्या क्षेत्रांत प्रत्येक लेखकाची मनोभूमिका स्वतःची अगदीं स्वतंत्र असल्यामुळें लेखकाचा साहित्याकडे आणि समाजाकडे पाहण्याचा दृष्टीकोन जसा असेल, तसें उत्तर त्याच्याकडून दिलें जाईल, हें स्वाभाविक आहे. पैशासाठीं लिहितों, कीर्तीसाठीं लिहितों, स्वतःच्या समाधानासाठीं लिहितों — अशीं अनेक कारणें सांगितलीं जाऊं शकतील.

सकृद्दर्शनीं हा प्रश्न अगदीं सोपा, साधा असा दिसला, तरी त्याचें समर्पक आणि प्रामाणिक असें उत्तर देणें तितकें सोपें आहे, असें मात्र मला वाटत नाहीं. ' विवाह ' या विषयावर लेखन करण्याची जगांतील कांहीं थोर व्यक्तींना काऊंट केसरलिंग यांनीं जेव्हां विनंति केली, तेव्हां बर्नार्ड शॉ यांनीं ती नाकारली; आणि कळविलें कीं, " पत्नीच्या हयातींत याविषयीं खरेपणानें मी कांहींहि लिहू शकणार नाहीं; आणि अप्रामाणिक वाङ्मयनिर्मिति करण्याची माझी इच्छा नाहीं ! ' हें त्याचें उत्तर विक्षिप्तपणाचें नव्हतें, असें आज या प्रसंगानें माझ्या प्रत्ययास येत आहे. व्यवसायांत असणाऱ्या माणसाला आपलें व्यवसायांतील रहस्य सांगा, असें म्हणण्यासारखेंच हें आहे !

आजवर ज्यांनीं या प्रश्नाचीं उत्तरें या नभोवाणीवरून दिलीं, ते सर्व मान्यवर आहेत. अर्थात् त्यांच्या वचनांना प्रामाण्यहि आहेच.

पण मला या प्रश्नाचें उत्तर देणें कसें कठीण आहे, हेंहि सांगितलें पाहिजेच.

'स्वतःच्या समाधानासाठीं मी लिहितों; त्यांत मला पैशाची किंवा कीर्तीची अपेक्षा नाहीं' असे मी प्रामाणिकपणें म्हणूं शकत नाहीं. आपल्या लिहिण्यानें दुसऱ्याचा मानसिक आनंद वाढवावयाचा हा हेतु नाहीं, तर लिहावयाचेंच कशाला? वाङ्मयनिर्मितीपेक्षा मग योगसाधन जास्त चांगलें! आपल्या लेखनानें दुसऱ्याला बरें वाटावें, त्यानें तें सौख्य व्यक्त करून दाखवावें; यांतच लेखकाचा खरा आनंद. त्यामागें आपोआप पैसा आणि कीर्ति येतच. पैसा आणि कीर्ति यांच्यामागें आपणाला धावण्याची गरज नाहीं, अशी माझी दृढमूल समजूत असल्यामुळें पैशासाठीं किंवा कीर्तीसाठीं म्हणून लेखन करण्याची कल्पना कधींहि माझ्या मनाला शिवली नाहीं. 'आपलें लिखाण दुसऱ्यांनीं वाचून त्याचा रसास्वाद घ्यावा, अशी अपेक्षा मी धरीत नाहीं' असें म्हणणें म्हणजे वेळेचा आणि शक्तीचा अपव्यय करतों, असें सांगण्यासारखें आहे! –आध्यात्मिक लोक मात्र याला अपवाद आहेत. कारण ते काय वाटेल तें करूं शकतील!– आणि खरोखरच जर कुणी असें अट्टाहासानें सांगत असेल, तर त्याचें लेखन इतरांनीं पसंत केलें नाहीं, इतरांना त्यांत आनंद नाहीं, असें समजावयाला काय हरकत आहे?

निव्वळ पैशासाठीं लिहितों, असें खरेपणानें म्हणूं शकणारे भाग्यशाली लेखक या महाराष्ट्रांत अनेक आहेत. ते तसें म्हणतीलच,

असें नाहीं. केवळ पैशासाठीं ते आपलें लेखन चालवूं शकतात, याचा अर्थच हा कीं, त्यांच्या लिहिण्यांत चमक आहे. ते वाचकांना इतका आनंद देऊं शकतात कीं, त्याच्या मोबदल्यांत भरपूर पैसे देणें वाचकांना जड वाटूं नये ! हें लेखन किती प्रमाणांत उपकारक होईल, याचा विचार करण्याची गरज नाहीं. कदाचित् तें अप-कारकहि असूं शकेल. पण वाचकांना तें प्रिय होत असलेंच पाहिजे.

आणि, केवळ कीर्तीसाठीं लिहितों, असें म्हणणें जरासें धाष्ट्यार्चें नाहीं कां ? एखाद्या लेखनानें कीर्ति मिळावी, पैसा नाहीं मिळाला तरी चालेल, अशी अपेक्षा करणें याचा अर्थ हाच कीं, त्यासाठीं भरपूर पैसा खर्च करावा, इतकी आसक्ति अशा वाङ्मया-बद्दल वाचकाला वाटणें अपेक्षित नाहीं. अशा लेखनावर वाचकांनीं लोभून पडूं नये, किंवा त्याचा अनादरहि करूं नये, नुसती कीर्तीची बिदागी लेखकाच्या पदरांत टाकावी ! असें लेखन हें अर्थातच वाचकांच्या समजाच्या बाहेर असलें पाहिजे. जें आपल्याला कळलेंच नाहीं, त्याबद्दलच कुणीहि अशी स्थितप्रज्ञवृत्ति धारण करूं शकेल ! मग अशा वाङ्मयाचा समाजाला उपयोग तरी काय ? वाचकाला रसास्वादाचा आनंद नाहीं. लेखकाला दुसऱ्याला सुख दिल्याचें समाधान नाहीं. लाभ काय, तर कोरडी कीर्ति !

लेखक होणें, विशेषतः लघुकथा लिहिणें यासारखें सोपें काम दुसरें नाहीं, अशी सर्वसाधारण समजूत दिसून येते. पण माझा

स्वतःचा अनुभव, यासारखें कठीण दुसरें कांहीं नाहीं, असाच आहे ! आपलें लिखाण छापून येतें एवढी चेतना ज्यांना पुरते, पाहतां पाहतां जे भराभर वाङ्मय निर्माण करूं शकतात, त्यांचा मला हेवा वाटतों ! 'स्नॅपशॉट' घ्यावेत तशा वेगानें शब्दचित्रें निर्माण झालेलीं पाहून कौतुक वाटतें ! मला स्वतःला मात्र लेखनासाठीं एखादी कल्पना मिळाली तरी रसानुकूल भावनांची भरती यावयाला कालावधि लागतो. भावनांना उपकारक स्वभावविशेष लवकर सांपडत नाहींत; आणि, त्यांच्या चित्रणाला समर्पक शब्दसंपत्ति जुळून यावयाला मनस्वी दिरंगाई होते ! आणि हें सर्व लाभल्यानंतरहि स्वतःच्याच पसंतीचें शिक्कामोर्तब मिळवणें राहतेंच ! आणि, लोक मात्र सारखें विचारतात 'तुम्ही कां लिहीत नाहीं ? कोणतीं साधनें अनुकूल नाहींत ? कां तुमच्या प्रतिभेनेंच रुसवा धरला आहे ?' न लिहिण्याबद्दल इतका बदनाम झालेला साहित्यसेवक कदाचित् नसेलहि ?

पण या दोन्ही प्रश्नांचें माझें उत्तर एकच आहे. वाचकांना आनंद होईल, निश्चित आनंद होईल, अगदी आंतल्याआंत गुदगुल्या होतील — अशी स्वतःची पूर्ण खात्री होईपर्यंत मी लेखन करीत नाहीं. असा बाणा बाळगणें हें गैरसोईचें, नुकसानीचें, धारिष्टाचें, जबाबदारीचें आणि कांहींसें अविचाराचें आहे, याची मला पुरेपूर जाणीव आहे. यासाठीं समाजाचें अभ्यसन हवें, लोकांच्या मनःप्रवृत्तींचें ज्ञान हवें, प्रतिदिनीं बदलणाऱ्या परिस्थितींचें निरीक्षण हवें, नवीनतेसाठीं संशोधन हवें; आणि, वाचकांशीं समरस

होणारें पण लेण्यासारखें मऊ आणि बलवान, लवचीक आणि कणखर असें पोलादी मन हवें, हेंहि समजतें. हें एकदा कळलें म्हणजे लेखनासारखें कठीण काम दुसरें नाहीं, असें कां वाटतें, याचा सहज उलगडा होईल.

१८ मार्च १९४८

कोणतीहि गोष्ट खरेपणानें सांगितली, म्हणजे त्यावर विश्वास बसतोच, असें नाहीं. सत्य हें कधीं नावडतें, कधीं अनपेक्षित आणि कधीं असाधारण असूं शकतें. वाल्मीकीला क्रौंचवधाचा प्रसंग पाहून, जशी काव्यस्फूर्ति झाली, तशी शेजारचा एखादा सुख-दुःखाचा प्रसंग पाहून, मला स्फूर्ति होते, मन अस्वस्थ होतें, शरीर अविश्रांत होतें, पांढऱ्यावर काळें केल्याशिवाय अगदीं राहवत नाहीं आणि 'अविदितगतयामा' अशा रात्री वाङ्मयनिर्मिति करतात, असें जर मी सांगितलें, तर तें खरें वाटेल; आणि कदाचित् बरेंहि वाटेल. पण मला तसें सांगतां येत नाहीं, याला नाइलाज आहे !

या विषयाकडे पाहण्याची माझी दृष्टि इतरांहून भिन्न असेल, म्हणूनहि कदाचित् असें होत असेल. एखादी लघुकथा किंवा कांदबरी म्हणजे नुसता रंजनाचा विषय नव्हे, नुसतें शब्दचित्र नव्हें, नुसतें जागरण तर नव्हेंच नव्हें, अशी माझी समजूत असल्यामुळें फक्त कलाकृति तेवढ्या निर्माण कराव्यात, उगीच लिहीत सुटूं नये, असा माझा स्वभाव झाला आहे. आपला 'कॅमेरा' सुंदर असला आणि आपले 'स्नॅपशॉट' सुबक येऊं लागले, कीं भराभर फोटो घेण्याची प्रवृत्ति होणें अगदीं साहजिक आहे. सुंदर

नगर वाचनालय, सातारा.

विषयांचें फोटो घेतले म्हणजे ते सुंदर दिसतात. त्यांत विशेष असें काय आहे ? साहजिकपणें लोकांना आवडतील अशा गोष्टीं हुबेहूब शब्दांनीं चित्रित करणें यांत लेखकाचें कांहीं जर कौशल्य असेल, तर तें फोटोग्राफीचें आहे; नकलेचें आहे; चित्रकाराच्या अस्सल कलाकृतींत त्याहून विशेष असें कांहीं तरी हवें. लेखकाच्या वाङ्मयनिर्मितींतहि असेंच कांहींतरी विशेष-विधात्याच्या सृष्टींत दिसून येणाऱ्या सौंदर्याहूनहि अतिशयित असें अलौकिक सौंदर्य-प्रतीत झालें पाहिजे. ती त्याची इतरांना दिपविणारी कविमनाची प्रतिसृष्टि पाहिजे. तरच तिला 'सारस्वत', कलाकृति, असें म्हणतां येईल. नारायणऋषीला फजीत करण्यासाठीं रंभा – मेनकादि रूपवतींना विधात्यानें पाठविलें असतां, निसर्गांतील सर्वोत्कृष्ट सौंदर्यालाहि लाजविणारें, त्या महान् प्रतिभावान् आद्य कलावंतानें, आपल्या मांडीच्या चित्रफलकावर गंधानें जें सुंदर रूपनिधान निर्माण केलें, तें विधात्याला त्यापूर्वीं कधींहि करतां आलें नव्हतें. तिलाच 'उर्वशी' असें नांव देऊन आपल्या स्त्रीसौंदर्याचें 'मॉडेल' म्हणून विधात्यानें मान्य केलें. म्हणच आहे, 'जें न देखे रवि तें देखे कवि !' सौंदर्य आणि आनंद या बाबतींत कवीची कलाकृति म्हणजे सृष्टिकर्त्याच्याहि पुढचें पाऊल पाहिजे, असा संकेत मनाशीं बाळगून आपल्या स्वल्पशा सामर्थ्याची पराकाष्ठा करणें, हें मी आपलें वाङ्मयविषयक कार्य मानतों. मग तें इतरांच्या बुद्धीला कसेंहि भासो ! समाज आपलें कौतुक करावयाला तयार आहे, एवढ्यासाठीं या भूमिकेवरून खालीं कोसळण्याची माझी तयारी नाहीं! आणि, आपल्या

वाङ्‌मयकृतीनें इतरांना आनंद होतो, असें कळणें, यासारखें दुसरें समाधान नाहीं. पण नुसतें सुख इतर लोक एकमेकांना सहज देऊं शकतात. आपल्या वाङ्‌मयामुळें होणारें सुख हें इतरांहून विशेष, केवळ आपलें स्वतःचें खास असें असावें, हें आपल्या कलाकृतीचें उद्दिष्ट मी मनांत बाळगलें आहे. ‘ मी कां लिहितों ’ या प्रश्नाचें हें माझें उत्तर आपणाला पटेल आणि रुचेल, अशी मला आशा आहेच. निदान आपलें लक्ष त्याकडे सहानुभूतीनें, आपलेपणानें आणि प्रेमळपणानें वेधलें, म्हणजे झालें.

# मी कां लिहितें ? १३

कुसुमावतीबाई देशपांडे

" उन्हांत पोळलेल्या, वणव्यांत होरपळलेल्या पोटांत आग सांठविलेल्या --

ह्या मोळीची शेकोटी पेटवून ठेविली, तर काळरात्रीच्या गडद अंधारांत उजेडाची सोबत राहील; दिवसाच्या प्रकाशाची आठवण नाहींशी होणार नाहीं.

तेवढा तरी उपयोग होईल का या मोळीचा ? ह्या शेकोटीच्या ज्वाळांत जीवननृत्याचीं चित्रें अंधुकपणें तरी दिसत राहतील कां ?"

असा प्रश्न कुसुमावतीबाईंनीं आपल्या ' मोळी ' या नव्या कथा-संग्रहाच्या मुखोद्गारांत विचारला आहे. जीवनासंबंधीची ही आर्त जाणीव, थरथरणाऱ्या दीपकळीप्रमाणें, त्यांच्या साऱ्या लिखाणांतून तेवत आहे असें वाटतें. काव्य-कथेचे मार्मिक व स्वतंत्र दृष्टीचे टीकाकार व लघुकथेचे व ललित-निबंधाच्या कलावंत लेखिका म्हणून, त्यांना जें वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्राप्त झालें आहे, त्याचें बीज, या जाणिवेंत तर नसेल ? त्यांच्या काव्यमय व कलापूर्ण प्रतिभेला मूलगामी व वास्तववादी दृष्टीची जोड मिळालेली आहे. त्यांचें कोणतेंही लिखाण घ्या, तें जीवन-जिज्ञासेनें भरलेलें आहे आणि त्यांत निवेदनासाठीं धडपडणारें मन सारखें येरझारा घालीत आहे, असा भास होतो. त्या म्हणतात,

" अनंत क्लेशांनीं जर्जर होऊन तडे गेलेली भूमि शेकोटीभोंवतीं आहे, तिचीं उघडीं नागडीं भुकेलीं मुलें तिथें अंग टाकून, पडलीं आहेत — ह्या शेकोटीनें त्यांना ऊब कशी येईल ? "

ह्या कांकडेल्या, कापणाऱ्या भुकेल्या मानवतेकरितां शेकोटी पेटविण्यासाठीं 'मोळी' घेऊन येणाऱ्या कलावंताची कला ' क्षण जीवित्वाच्या शापांतून ' जीवनाला मुक्त करूं शकेल असा त्यांना विश्वास वाटतो.

— आणि कलावंताच्या या जाणिवेचें व अबोध विश्वासाचें सुंदर विश्लेषण म्हणजेच हा लेख होय.

नगर वाचनालय, सातारा
नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


खरें पाहिलें असतां 'मी कां लिहितें', असा विचार पडण्याइतकें मीं कांहीं लिहिलेंच नाहीं ! पंचवीस–तीस लघुकथा, चारपांच टीकात्मक लेख एवढें आजकालच्या साहित्यिक मागणीच्या व सुलभ छपाईच्या दिवसांत कोणीहि सहज लिहून टाकील. व एवढ्या लिखाणानें कांहीं वाङ्मयीन कार्यसिद्धि झाली, असें तर कोणाला वाटणार नाहींच, पण उलटपक्षीं त्याचा कुणाला त्रासही वाटणार नाहीं; त्रास वाटण्याइतकें त्याकडे कोणाचें लक्षच वेधलें जाणार नाहीं. मग हा प्रश्न उद्भवतोच कुठे ?

पण हा प्रश्न वाचकांच्या दृष्टीनें नाहीं तरी स्वतःच्या जाणिवेखातर तरी प्रत्येक हौशी लेखकानेंदेखील स्वतःला विचारण्यासारखा आहे. बहुतेक लेखक तो विचारीत असतीलहि. निदान अस्पष्टपणें तरी त्यांच्या मनांत हीं प्रश्नोत्तरें उद्भवत असतीलच. व मला वाटतें, या प्रश्नाला ज्या विशिष्ट तऱ्हेचें उत्तर त्यांच्या मनाकडून दिलें जातें, त्याप्रमाणें त्यांच्या लेखनाचे गुणधर्महि निश्चित होत असावेत.

माझें स्वतःचें उत्तर मला कांहीं लेखनविषयक आठवणींत सांपडेल. 'मृगाचा पाऊस' ही माझी पहिली लघुकथा. मृग लागून दोन तीन दिवस झाले होते. रोज वादळ होई. पावसाच्या प्रतीक्षेनें मन भरून येई व पुनः वादळ निवळून जाई. शेवटीं एक दिवस पाऊस आला. प्रसन्नतेचे पूर वाहूं लागले. तोंवर कधींच जाणवलें नव्हतें, इतकें नवजीवन सळसळूं लागल्यासारखें वाटूं लागलें. निसर्गाची अदम्य जीवनशक्ति व निसर्गाचें सौंदर्य–

रोमांचकारी, वेडावून टाकणारें सौंदर्य–याची जणूं नव्यानें प्रतीति झाली. पण या रोमांचकारी क्षणींच दीनदुबळ्या मानवाचे कोण हाल ! ना आसरा ना निवारा ! असलाहि आसरा तरी आवश्यक गोष्टींसाठीं तो सोडून पावसाशीं झगडणें प्राप्त. त्यांतून मानवानेंच निर्मिलेला जो दरिद्रनारायणाचा वर्ग त्याची तर अवस्था वर्णायलाच नको. आपल्या जिवाची व आपल्या जवळच्यांची कशीबशी जपणूक करण्यांत त्यांची सारी शक्ति वेचली जाते. ‘ छाया प्रकाश ’ या माझ्या शब्दचित्रांत याच विचाराची दुसरी एक बाजू आली आहे. निसर्गाचा जोम, त्याची भव्यता एकीकडे व हा हीन दीन मानव एकीकडे. हा विरोध कुणाहि विचारी माणसाला जाणवण्या-सारखाच आहे कुणाच्याहि मनांत त्यानें उत्कट सहकंपा निर्माण होईल. इतक्या अफाट दैवी संपत्तीचा वारसदार होऊनहि साधारण मनुष्य किती अकिंचन राहिला आहे व म्हणूनच निसर्गाच्या या अगाध सौंदर्यसागरांत राहूनहि किती कोरडा राहिला आहे, याची जाणीव मन हालवून सोडणारी आहे.

कधीं काळींच साधारण माणसाचें मन व्यवहारापासून मोकळें होऊन निसर्गाच्या प्रांगणांत निर्भरपणें रमूं शकतें व अशावेळीं त्याला जाणीव होते कीं, खरोखरी मानव हाहि एक निसर्गाचाच घटक. निसर्गांतील आनंदाचे झरे त्याच्याच मालकीचे, त्याच्या-पासून नवजीवन प्राप्त करून घेऊन तो द्विगुणित उत्साहानें व वाढत्या समाजानें आपले व्यवहारिक लढे लढूं शकतो. ‘ गवताचें पातें, या लघुकथेंतील सदाशिवरावांना हीच प्रतीति आली.

बाकी, मानवी मनाचें चैतन्य व जोम राखावयाला निसर्गाच्या सौंदर्याची किंवा उदात्ततेची आवश्यकताच आहे, असें मात्र नाहीं. कधीं कधीं कुठें तरी कोनाकोपऱ्यांत अज्ञातपणें जीवन व्यतीत करणाऱ्या एखाद्या साध्या व्यक्तीच्या अंतःकरणांत आपल्याला अशा चैतन्याचे व जोमाचे अखंड झरे दिसून येतात. त्या झऱ्यांनीं त्यांच्या भोंवतालचें जीवन कैक वर्षें फुलत ठेवलेलें असतें. व्यवहार-कटुतेनें किंवा स्वार्थानें ते गढुळलेले जात नाहींत. या व्यक्तींची मानवता अखंड असते व त्यांच्या दिलदारपणानें व सत्वनिष्ठेनें त्यांच्याशीं क्षणकालहि ज्यांचा संबंध येतो त्यांचा मानवजातीवरील विश्वास दुणावतो. माझ्या 'माउली' या कथेंतील 'सरस्वती' किंवा 'जाईबाई' किंवा 'लहानी' त्यांच्याबद्दल मला असेंच वाटतें.

उच्चतम कलाकृति निर्माण करण्याचें सामर्थ्य या जाणिवेंत आहे, असें मला वाटतें. पण तसें आपल्या हातून जरी न झालें, तरी या जाणिवेला जी काय अभिव्यक्ति आपल्याकडून मिळेल तीमुळें आपल्याला नवे डोळे, नवे कान मिळाल्यासारखें वाटतें, एवढें मात्र खास. जीवनसंशोधनाची एक नवीन वृत्ति निर्माण होते. निसर्गाच्या राज्यांतील पावसाच्या एकेक थेंबाचें, गवताच्या एकेक पात्याचें साभिप्राय सौंदर्य डोळ्यांत भरूं लागते, तर मानवी जीवनांतील रोजच्याच दृश्यांत नवीन आशय जाणवूं लागतो. भरल्या बाजारांत रस्त्यावर पडलेलें उष्टें टरबुजाचें साल अधाशी-पणानें खाणारें भिकाऱ्याचें पोर पाहून, त्याच्या उभ्या जीवनाचा चित्रपट डोळ्यासमोर उभा राहतो. व जातांयेतांहि कानावर

आदळणारे कुत्सित स्वर, भांडखोर वाक्यें, जुलमी शब्द, जोडून जुळवून, त्यांच्यामागील घटनांचें परीक्षण करण्यांत मन कुशल होतें. परिस्थितीच्या विविध कणांचें विश्लेषण करणारें व त्यांच्या विराट स्वरूपाचें दर्शन घडवणारें एक सूक्ष्मदर्शक यंत्रच जणूं आपल्या हातीं लागतें व त्या दर्शनाच्या आधारावर, आपल्या अनुभूतींतून, जीवनाची नवी विरचना करण्याची आकांक्षा आपल्या मनांत स्फुरण पावते. भावनांचें क्षितिज विस्तारतें व विचाराला धार येते. लेखनाचा इतर कांहीं उपयोग असो, वा नसो, प्रामाणिक लेखनाचा—प्रतीतींतून उद्भवलेल्या लेखनाचा—स्वतः लेखकावर मात्र निःसंशय परिणाम होतो. जीवन समजून घेण्याचा तो एक उत्तम मार्ग आहे, तसाच भावनांच्या विनयनाचा. प्रामाणिक लेखन म्हणजे आत्मसंस्करण आहे; एक प्रकारची साधना आहे. उत्कटपणें जगण्याचा व जीवनाचा आनंद द्विगुणित करण्याचा तो मार्ग आहे.

आपल्याला कांहीं जाणवलें, कांहीं सांपडलें, सांपडल्यासारखें वाटलेंहि, तरी तें दुसऱ्याला सांगावेसें वाटणें हा मनुष्यधर्मच आहे. 'संविभक्त दुःख' 'सह्यवेदन' होतें, हें कालीदासाच्या काळापासूनच आपल्याला माहीत आहे. पण निव्वळ दुःख सुसह्य करण्याच्या सुजाण हेतूमुळेंच नव्हे, तर सर्व अनुभवांतच वाटेकरी हवे असण्याच्या मानसिक धर्मामुळें आपलें जीवनविषयक संशोधन, अनुभवांचे पडताळे, दुसऱ्यापुढें सादर करण्याची इच्छा होते. शिळोप्याच्या गप्पागोष्टींपासून उच्चतम कलाकृतीपर्यंत सर्व मानवी

व्यवहारांत अनुभवनिवेदनाची ही प्रवृत्ति दिसून येते. अर्थात् प्रत्येकाची तऱ्हा वेगळी असते. कोणी वेगवेगळ्या नांवांच्या नायकनायिकांच्या जीवनकथा लिहूनहि प्रत्येकाच्या द्वारें स्वतःचीच कथा निवेदन करतात; स्वतःच्या भावना परावर्तित करतात; स्वतःच्याच अंतर्जीवनाच्या जाळ्यांत गुरफटून राहतात; तर कोणी प्रथमपुरुषी एकवचनी लिखाण लिहूनहि भोंवतालच्या जीवनाचें दर्शन घडवतात. अशा वृत्तिवैचित्र्यामुळें व पद्धतीच्या प्रकारामुळें साहित्यांत व जीवनांतहि वेगवेगळ्या मूल्यश्रेणी निर्माण होतात व त्यामध्यें संघर्ष उद्भवतो. लेखनाच्या थोड्या फार अनुभवानंतरही हा मूल्यामूल्यांचा संघर्ष जाणवूं लागतो. कांहीं मूल्यें आपण चट्‌दिशीं उचलून धरतों; अंतःकरणप्रवृत्तीमुळेंच त्यांचा स्वीकार करतों. कांहींचा निषेध करतों. विचारपूर्वक, पद्धतशीरपणें त्यांचा पाडाव करण्याचा प्रयत्न करतों. आपल्याला जें पटलें तें दुसऱ्यांना पटवण्याची पराकाष्ठा करणें, यांत तर मानवी संस्कृतीच्या विकासाचें मूळ आहे. या कार्यासाठीं जेव्हां वाङ्मयाचा उपयोग केला जातो, तेव्हां तें कार्य शुद्ध बुद्धीच्या द्वारां व भावनांच्या उदात्तीकरणाच्या मार्गानें केलें जातें व म्हणूनच त्या कार्याचा परिणाम चिरस्थायी होण्याचा संभव असतो.

संभव असतो, असेंच म्हणणें सुज्ञपणाचें. कारण मानवी जीवन हें दिवसानुदिवस इतकें गुंतागुंतीचें होत चाललें आहे व त्यावर इतक्या अनेपक्षित व प्रभावी शक्तींचा परिणाम प्रत्यहीं होत आहे

कीं, अमुक एका दिशेनें प्रयत्न केल्यास त्याचा निश्चितपणें विवक्षित-परिणाम होईल किंवा होतो, असें प्रतिपादन करणें शहाणपणाचें होणार नाहीं. वर्षानुवर्षे निःसंदिग्धपणें प्रचाराच्या सर्व आधुनिक साधनांच्या सहाय्यानें जी मनोभूमिका तयार करण्याचें कार्य केलें जातें तिच्यांतूनहि अनेक वेळां वेगळेंच फळ निर्माण झालेलें दिसतें. मग कलावंताकडून कांहींशा अभावितपणेंच निर्मिल्या जाणाऱ्या व रसिकांच्या मनावर नकळत व अप्रत्यक्षपणेंच परिणाम करणाऱ्या कलाकृतींचा निश्चित परिणाम काय होतो, हें अजमावण्याचा प्रयत्न करणें किती व्यर्थ होय? व जिथें एकंदर कलाकृतींबद्दलच ही स्थिति तिथें कोण्या एका व्यक्तीच्या चारदोन कृतींची काय खिजगणति? आपल्या खटाटोपाच्या वास्तव मूल्याची जाणीव ठेवायला हें सारें लक्ष्यांत बाळगलेलें चांगलेंच. परंतु आपल्या प्रयत्नांचें हें परमाणुस्वरूप मनावर बिंबलेलें असलें तरीहि जीवनजिज्ञासेनें भारलेलें व अनुभवाच्या निवेदनासाठीं धडपडणारें मन स्वस्थ बसत नाहीं, हें मात्र खरें. खडकाआडूनहि मान वर काढणाऱ्या लहानशा बीजाच्या अंकुराचाच धर्म हा. त्या अंकुराचें रोपटें, वेल, झाड होणारच. व तें रसप्रसन्न झालें कीं, त्याला फुलोरा येणारच. कविवर्य 'बी' यांनीं एका रूपकाच्या सहाय्यानें काव्यनिर्मितीची उपपत्ति लावली आहे. ते म्हणतात, वेल रसप्रसन्न झाली कीं, तिला फुलोरा येणारच. त्या फुलोऱ्याच्या भरवशावर ती संहारकालाच्या ज्वालांचीहि दिक्कत बाळगीत नाहीं. त्या फुलोरांत ती आत्मप्रतिमाच निर्मून ठेवते; स्वतःला एक परीनें ती अमर करते व कालाच्या

प्रभावाला सहजपणें झुगारून देते. क्षणजीवित्वाच्या शापांतून ती स्वतःला मुक्त करते. कलाकृतींच्या निर्मितीच्या वेळीं अमरत्वाची आस कितीशा सुजाणपणें कलावंताच्या मनांत वसत असते, कोण जाणें ! पण त्याला निर्मितीचा निर्भर, निर्हेतुक आनंद लाभतो, एवढें मात्र निश्चित.

सातारा.

# मी कां लिहितों ? १४

श्री. अनंत काणेकर.

कवि, लघुकथालेखक व टीकाकार या नात्यानें श्री. अनंत काणेकरांनीं मराठी साहित्यांत असाधारण यश मिळविलें असलें तरी, यशस्वी लघुनिबंधकार म्हणूनच त्यांचें स्थान मराठी वाङ्मयांत अढळ राहील. प्रा. फडक्यांनीं या नव्या वाङ्मयप्रकाराला जन्म दिला, पण त्याचा पूर्ण विकास श्री. काणेकरांच्या कृतींतच आढळतो. आपल्या रंगसंगतीच्या उन्मादांत हंसणाऱ्या फुलदाणींतील पुष्पगुच्छाप्रमाणें प्रा. फडक्यांचें निबंध कलापूर्ण भासतात, तर धगधगत्या उन्हांत व कोसळत्या सरींत, सारख्याच जीवननिर्भरतेनें उमलणाऱ्या कळ्यांप्रमाणें काणेकरांचे निबंध रसरशीत व जिवंत वाटतात.

याचें कारण त्यांच्या लेखनविषयक दृष्टिकोनांत सांपडेल काय ? काळ म्हणजे मृत्यु नव्हे, जीवन; माणसाच्या विकासकालाचें – त्या अवधीचें मोजमाप, असें ते एके ठिकाणीं म्हणतात. त्यांना माणसांचें जग हवें आहे; दगडाधोंड्यांचें नको. ते म्हणतात ' ज्यांच्यावर मी प्रेम करूं शकतों, किंवा मी ज्यांचा द्वेष करूं शकतों, अशीं कां होईनात, पण हाडामांसाचीं, गरम रक्ताचीं माणसें ज्यांत आहेत; ज्यांत एकमेकांचे रसरशीत हात हातांत घेऊं शकतों; एकमेकांचे काळेगोरे चेहरे पाहून, दुःखी किंवा सुखी होऊं शकतों आणि जिथें माणसांच्या ऊष्ण श्वासांनीं गरम झालेल्या वातावरणांत श्वासोच्छ्वास करूं शकतों, असें जग मला हवें आहे ! '

या जगांच्या ' प्रगतीच्या किल्ली ' संबंधीं बोलतांना, ते सहज प्रश्न करतात. ' पेटलेल्या खाईवर देहाचा पूल करून शिवाजीला पुढें जाऊं देणाऱ्या स्वामिनिष्ठ मावळ्यांनीं तें वीरकृत्य काय कीर्तीच्या आशेनें केलें ? ' आणि पुढे स्वतःच सांगतात, ' कांहींतरी चांगलें करण्याची अनावर इच्छा — निर्मितीचा नाद, हेंच त्याचें खरें कारण. '

निर्मितीचा हा नाद व माणसांचें जग यांच्या समन्वयांत उद्यांच्या नव लेखनाचीं स्वप्नें तर काणेकर पाहत नसतील ?

वयाचीं तीस-चाळीस वर्षें उलटेपर्यंत आरसा नांवाची वस्तु कधीं पाहिलेलीच नाहीं, अशा एखाद्या माणसानं पहिल्यांदांच आरशांत आपलं प्रतिबिंब पहावं आणि 'हाच कां तो मी ?' म्हणून एकदम दचकावं तशी थोडीशी स्थिति, औरंगाबाद रेडिओ-स्टेशनच्या चालकांनीं 'मी कां लिहितों ?' या विषयावर बोला म्हणून मला सांगितलं, तेव्हां माझी झाली. गेलीं पंधरा-वीस वर्षें मी लिहितों आहे, आणि 'मी कां लिहितों ?' हा प्रश्न केव्हांच मी स्वतःला विचारायला हवा होता. पण जगांतल्या इतर सर्व प्रश्नांची उठाठेव करतां करतां स्वतःच्या या लहानशा प्रश्नाची, काळपरवां हा प्रश्न विचारला जाईपर्यंत, मला दादहि नव्हती. असं होतं खरं केव्हां केव्हां. अन्तर्मुख होऊन, या प्रश्नाचं उत्तर मनांतल्या मनांत शोधून काढण्याचा मी प्रयत्न करूं लागलों. तेव्हां कांहीं प्राचीन, त्याप्रमाणेंच कांहीं अर्वाचीन थोर साहित्यिकांनीं या प्रश्नाची केव्हां गंभीरपणें, तर केव्हां थट्टेनें, उत्तरं देण्याचे जे प्रयत्न केले आहेत, त्यांची सहाजिकच मला आठवण झाली. 'काव्य तुम्ही कां लिहितां ?' या प्रश्नाचं उत्तर एका प्रख्यात प्राचीन टीकाकारानं 'काव्यं यशसे अर्थकृते' असं अगदीं प्रांजल-पणानं देऊन टाकलं आहे. तो म्हणतो, 'कीर्ति आणि पैसा मिळविण्याकरितां काव्य लिहिलं जातं !' म्हणजे प्रसिद्धी आणि पैसा मिळविण्याची हाव काव्यनिर्मितीच्या मुळाशीं असावी, असं हा साहित्यशास्त्रकार ध्वनित करतो. एक थोर अर्वाचीन मराठी लेखक, डॉ. केतकर, यांनींहि 'आपण कां लिहितों ?' या प्रश्नाचं

उत्तर असंच कांहींतरी मजेदार दिलं होतं. कुणीतरी त्यांना विचारलं, ' तुम्ही कादंबऱ्या कशा लिहायला लागलां ? ' ते म्हणाले, ' मी ' विद्यासेवक ' नांवाचं मासिक काढीत होतों, तुम्हांला माहीत आहे. तें मासिक कंपोज करणारा कम्पॉझिटर उरलेलीं पानं भरायला कांहींतरी मजकूर पाहिजे, म्हणून माझ्या दाराशीं येऊन बसला. माझ्याकडे मजकूर तर कांहींच नव्हता. तेव्हां एक कादंबरी लिहायचं ठरविलं आणि एक प्रकरण लिहून दिलं. पुढं ती पुरी करणं भागच पडलं ! ' डॉ. केतकरांचं म्हणणं असं कीं, तो कम्पॉझिटर त्यांच्या कादंबरीलेखनाला कारणीभूत झाला !

दुसरे एक चांगले आधुनिक कादंबरीकार ' मी पोटाकरितां लेखन करतों, ' असं पुष्कळ वेळां वैतागानं सांगत असतात. त्या प्राचीन टीकाकाराप्रमाणंच आपलं लेखन ' अर्थकृते ' असतं, असं त्याचं मत आहे. या सर्व उत्तरांत थोडाफार तथ्यांश असेल, नाहीं असं नाहीं. पण हीं सर्व उत्तरं थट्टेनं, वैतागाच्या भरांत किंवा पृच्छकाला तडकाफडकी उडवून देण्याकरितां दिलेलीं आहेत, हें उघड आहे. काव्य करणाराला—अर्थात् चांगलं काव्य करणाराला— ' यश ' आणि ' अर्थ ' मिळत असेल, पण म्हणून तो ' यशा '-करितां आणि ' अर्था 'करितां लिहितों, असं म्हणतां येणार नाहीं. ' विद्यासेवका 'चीं पानं भरून काढण्याकरितां आणि तो कम्पॉझिटर धरणं धरून बसला म्हणून डॉ. केतकरांनीं कादंबरी लिहावयाला घेतली असेल, पण त्यापूर्वींहि त्यांनीं विद्वत्तापूर्ण निबंध आणि कांहीं कविता लिहिल्या होत्या. ते निबंध किंवा त्या कविता लिहितांना

त्यांना कोणत्याच मासिकाचीं पानं भरून काढायचीं नव्हतीं किंवा कोणी कम्पॉझिटरहि त्यांच्या दाराशीं धरणं धरून बसला नव्हता.

केवळ पोटाकरितां, पैशाकरितां किंवा प्रसिद्धीकरितां कांहींतरी खरडून देणारे कांहीं लेखक असतील; पण ज्यांच्या लिखाणांत कांहींतरी तथ्य आहे, कांहींतरी ज्यांना खरडायचं नाहीं, ते लेखक सर्वसामान्यपणें पैसा आणि प्रसिद्धी यापेक्षां उच्च अशा दुसऱ्या कांहीं कारणामुळें लिहितात, हें उघड आहे. महाराष्ट्रांत तर केवळ लेखनावर चरितार्थ चालणं जवळ जवळ अशक्यच असल्यामुळें, ' मी पोटाकरितां लिहितों ' असं म्हणण्याची सोयच उरली नाहीं. पोटाला चिमटा घेऊनच बहुतेक चांगले लेखक लेखन करीत असतात. एका दृष्टीनं जें दुर्दैव आहे, तें दुसऱ्या दृष्टीनं महाराष्ट्राचं सुदैव झालं आहे, असं म्हटलं पाहिजे.

या सर्व गोष्टी डोळ्यापुढं ठेऊन, माझ्या स्वतःचा जेव्हां मी विचार करतों, तेव्हां मी कां लिहितों, या प्रश्नाच्या उत्तराचं स्वरूप थोडेंफार स्पष्ट होऊं लागतं. आतां मला थोडेंफार यश मिळालं आहे आणि लेखनावर थोडाबहुत पैसाहि मिळतो. पण या प्रश्नाचं खरंखुरं उत्तर शोधून काढायचं असेल, तर पंचवीस-सव्वीस वर्षांपूर्वीं मी कविता लिहायला सुरुवात केली, तेव्हांची परिस्थिति डोळ्यापुढें उभी केली पाहिजे. या परिस्थितीचं वर्णन दोनतीन वर्षंपूर्वीं, एका मासिकासाठीं लिहिलेल्या खास लेखांत, मी पुढीलप्रमाणं केलं आहेः—

'...... माझ्या लेखनाच्या सुरुवातीला मला लेखनाकडे प्रवृत्त करणारी अशी कोणतीच परिस्थिति माझ्या सभोंवार नव्हती. माझ्या सहाध्यायांपैकीं किंवा कुटुंबियांपैकीं कुणाचाच लेखनाकडे कल नव्हता. वाचनाचा मला फार नाद होता. हातीं येईल तें पुस्तक मी अधाशीपणानं वाचीत असें. सुचलेल्या चालीवर कांहीं तरी गुणगुणण्याची मला संवय होती. केव्हां केव्हां त्या पंक्ति मी कागदावर लिहूनहि ठेवीं, पण त्या कुणालाहि दाखविण्याचा मला धीर होत नसे. कारण लोक चेष्टा करतील, अशी भीति वाटे. १९१७-१८ च्या सुमारास लिहिलेल्या माझ्या पहिल्या कवितेच्या पहिल्या दोन ओळी मला अजूनहि आठवतात.

हे स्वदेशा, मायदेशा, किती वर्णूं थोरवी,
तुझें जुनें तें वैभव जेव्हां सर्व जगा भुलवी

अशी सुरुवात करून पुढें हिमालय, ताजमहाल वगैरे भारताच्या प्राचीन वैभवाच्या गोष्टींची ठराविक जंत्री मी त्या कवितेंत दिली होती.

'चिकित्सक समूह' या नांवाच्या शाळेंत मी त्यावेळीं शिकत होतों. १९२० सालीं लोकमान्य टिळक वारले, तेव्हां भावनेच्या आवेशांत पन्नास-पाउणशें ओळींची एक कविता मीं लिहिली. मला वाटतं, तेव्हां मी इंग्रजी पांचवींत होतों. त्या कवितेची चाल, कुठल्याहि पोरसवदा कवीच्या सहाय्याला वाटेल तेव्हां धावून येणारी 'चन्द्रकान्त राजाची कन्या,' ही होती. मोठा धीर करून मी ती कविता शिक्षकांना दाखविली. त्यांना ती आवडली.

सायक्लोस्टाइलवर छापून लोकमान्यांच्या निधनानिमित्त शाळेंत झालेल्या दुःखवट्याच्या सभेंत ती वाटली गेली. ......'

या पहिल्या वहिल्या कविता मी लिहिल्या, तेव्हांची परिस्थिति ही अशी होती. पैसा प्रसिद्धी, पोट आणि लेखन यांचा कांहीं परस्पर संबंध आहे किंवा असतो याची त्या वयांत मला कल्पनाहि नव्हती. त्या कविता अगदीं सामान्य आणि टाकाऊ होत्या, यांत शंका नाहीं. पण तो प्रश्नच नाहीं. प्रश्न असा आहे कीं, मी त्या कां लीहिल्या? मला लिहावसं वाटलं, लिहिल्याशिवाय राहवलं नाहीं—म्हणून मी त्या लिहिल्या, हें उघड आहे. माझ्या भारतदेशासंबंधीं खूपखूप प्रेमाची भावना माझ्या पोर मनांत निर्माण झाली आणि ती व्यक्त केल्याशिवाय माझ्याच्यानं राहवलं नाहीं. जमेल तशा पोरकट भाषेंत माझी ती भावना मीं व्यक्त केली. त्यांत नाविन्य किंवा मौलिकता कांहींच नव्हती. पण ती व्यक्त केल्यावर, मला बरं वाटलं. माझी कविता वाचून, त्या भावनेंत आणखी कुणीं सहभागी झालें असतें, तर मला आणखी बरं वाटलं असतं. 'स्निग्धजनसंविभक्तं हि दुःखं सह्यवेदनं भवति,' असं कालिदासानं म्हटलं आहे. त्याच चालीवर पुढं असंहि म्हणतां येईल कीं, 'स्निग्धजनसंविभक्तं हि सुखं शतगुणितं भवति.' लेखकाला आत्मप्रगटीकरणांत आनंद होतोच. त्यांत वाचक स्नेही वगैरे सहभागी झाले कीं, तो आनंद अधिकच दुणावतो.

इतर पुष्कळ कारणं असतील, अंशतः ती खरींहि असतील, पण सर्वसामान्यपणें लेखकाला कांहीं सांगावसं वाटतं आणि तें

सांगण्यांत त्याला आनंद होतो, म्हणूनच तो लिहितो, हेंच मुख्य कारण. म्हणूनच यश किंवा पैसा मिळण्यापूर्वीं लिहिलेल्या लिखाणाच्या मागली परिस्थिति, या कारणावर अधिक स्पष्ट प्रकाश पाडूं शकते. ' चांदरात ' या माझ्या पहिल्या पुस्तकाच्या दुसऱ्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत पुढीलप्रमाणें मीं लिहिलें आहे; " ...... या कविता ज्या वयांत आणि ज्या काळांत मीं लिहिल्या, त्यावेळीं साहित्यक्षेत्रांत मी कुणीच नव्हतों ......... मनाला वाटलं तेंच आणि तेव्हांच मीं लिहिलं. तें प्रसिद्ध होईल, असं मला वाटत नव्हतंच. पण तें प्रसिद्ध करण्याच्या लायकीचं आहे किंवा नाहीं, याचीहि मला शंका होती. अर्थात् पैशासाठीं किंवा प्रकाशकाच्या आग्रहामुळें लिहिलेलं लिखाण वाईट असतं, असं माझं मुळींच म्हणणं नाहीं. पुष्कळ वेळां चांगल्या कल्पना किंवा चांगल्या वाङ्मयकृति आपल्या मनांत घोळत असतात. पण आळसानं आपण त्या लिहिण्याचं पुढं ढकलीत असतों. असं कांहींतरी,— पैशाच्या अडचणीचं किंवा प्रकाशकाच्या आग्रहाचं निमित्त झालं, म्हणजे आपण तें लिहून काढतों. जगांतल्या कितीतरी उत्कृष्ट वाङ्मयकृति अशा तऱ्हेनें निर्माण झाल्या आहेत ......... "

पैसा किंवा कीर्ति लेखकाला मिळाली तर हवीच असते, पण तें मुख्य कारण खास नव्हे.

# मी कां लिहितों ? १६

**श्री. प्रभाकर पाध्ये.**

‘ शारीरिक श्रम करतांना कामगारांना गाणीं, म्हणावींशीं वाटतात ना, तसे वृत्तव्यवसायाचे कष्ट उपसतांना मला सुचलेलीं हीं गाणीं आहेत’, असें श्री. प्रभाकर पाध्ये आपल्या लघुकथांचें वर्णन करतात; आणि खरेंच, त्यांच्या ‘ व्याधाची चांदणी ’ व ‘ कृष्णकमळीची वेल ’ या लघुकथासंग्रहांत ‘ श्रम हलके करणारी गाण्याची शक्ति ’ आहे, अशीच कुणीहि वाचक कबूली देईल.

तेजस्वी पत्रपंडित, कुशाग्रबुद्धीचे टीकाकार आणि कलाकुशल लघुकथालेखक म्हणून थोड्याच काळांत, मराठी वाङ्मयांत, त्यांनीं प्रभावी स्थान संपादन केलें आहे.

‘ मानवतेच्या विशाल क्षितिजावर कलापुष्पाचें तोंड नेहमीं प्रगतीच्या किरणाकडेच वळलेलें असतें, ’ अशी श्री. पाध्यांची श्रद्धा आहे आणि ‘ मनुष्याच्या अनुभवांत अगर प्रत्ययांत नवी भर टाकून त्याच्या जाणिवांचें क्षितिज विशाल करणें हें कलेचें कार्य आहे ’ असें ते आग्रहानें प्रतिपादितात.

परंतु त्यांच्या ह्या तर्कनिष्ठ कलामीमांसेपेक्षां, या विषयावरील त्यांच्या अनुभवाचे बोल ऐकणें अधिक हृद्य वाटेल नाहीं कां ?

‘ गुल्मोहरांच्या डंवरलेल्या झाडांचें अग्निपुष्पांचें प्रसाधन ’ व ‘ सिंधुसागराच्या फेनपुष्पांचें सौंदर्य ’ त्यांच्या चित्तवृत्तींना तरंगित व समुत्कंठित करतात. या ‘ आर्त व अस्वस्थ ’ मनोवृत्तीच्या आविष्करणांत लेखकाची प्रतिभा कसला साद घुमवीत असेल बरें ?

'मी कां लिहितों ?' या प्रश्नाचें उत्तर देणें मला जरा कठिण आहे. माझ्या एका मित्रानें आपल्या एका काव्यसंग्रहाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत हा प्रश्न उपस्थित करून, 'कोंबडी अंडें कां घालतें ?' या प्रतिप्रश्नानें त्याचें उत्तर दिलें आहे. म्हणजे कोंबडीचें अंडें घालणें जसें नैसर्गिक असतें तशी काव्यनिर्मिति ही एक नैसर्गिक क्रिया आहे असें त्याचें म्हणणें आहे. कोंबडीचें अंडें घालणें किती नैसर्गिक असतें हें आपण जरा लक्षांत घ्या, म्हणजे माझ्या या मित्राच्या उत्तराची खरी मौज आपल्या ध्यानांत येईल. कोंबडी अंडें घालण्यास समर्थ होण्यापूर्वी तिचा आपल्या प्रियकराशीं कांहीं आवश्यक व्यवहार झालेला असला पाहिजे अशी साधारणपणें आपली समजूत असेल. परंतु कोंबड्या पुष्कळदां असा कांहीं व्यवहार न होतांहि अंडें घालतात, असा अनुभव आहे. त्यांच्या शरीरांतल्या कॅल्शिअमसारख्या कांहीं पदार्थांची ती स्वाभाविक प्रक्रिया आहे, असा शास्त्रज्ञांचा यावर खुलासा आहे. काव्य-निर्मितीचेंहि असेंच दिसतें. काव्य लिहिण्याची प्रेरणा होण्यापूर्वीं कवीला कांहीं तरी प्रतीती आली पाहिजे, कांहीं विशेष अनुभवानें त्याचें सारें व्यक्तित्व भारून गेलें पाहिजे, असें काव्यशास्त्रज्ञ सांगतात. परंतु या नियमाला धाब्यावर बसवून आपलें बरेंच काव्य जन्माला येत असतें याचा पुरावा नियतकालिकें नेहमींच देत नसतात काय ? या कवींच्या शरीरांतच अशी कांहीं काव्यद्रव्यें असावींत कीं, त्यांच्या काव्यरूप आविष्काराला प्रतीतीची गरजच भासत नसावी ! हे खरे हाडाचे कवि !

... ... ..., ....


मी स्वतः कवि नाहीं, किंबहुना सांगायला थोडा अभिमान वाटतो कीं, जन्माला येऊन मी कवितेच्या चार ओळीहि खरडलेल्या नाहींत. शाळेंत असतांना बागेंतलीं सारीं गुलाबाचीं फुलें आणि कॉलेजांत असतांना साऱ्या कॉलेज – कुमारिका या दृष्टीनें मला अगदीं निरुपयोगी ठरल्या ! मी हाडाचा कवि तर नाहींच, पण हाडाचा लेखक तरी आहे कां ? इतर लेखक आपण किती लवकर लिहायला लागलों हें सांगूं शकतात तर मी किती उशीरां लिहायला सुरवात केली हें सांगूं शकतों. हस्तलिखित मासिकांच्या प्रपंचानें माझे कधीं हात दुखले नाहींत आणि शाळा – कॉलेजांच्या मासिकांना माझ्या लिखाणाचा कधीं उपद्रव झाला नाहीं. याला दोनच अपवाद आहेत. एका लेखांत माझ्या एका दिवंगत स्नेह्याला अश्रूंची अंजलि होती आणि दुसऱ्यांत परीक्षेची पूर्वतयारी होती. या लिखाणामुळें लेखक होण्याच्या कांक्षेचा स्पर्शहि माझ्या मनाला कधीं झाला नाहीं. त्यावेळीं वाङ्मयापेक्षां मार्क्सवादाकडे आणि लेखनापेक्षां सार्वजनिक घडामोडींकडे माझें अधिक लक्ष होतें. मॅट्रिक होईपर्यंत मेघदूताखेरीज एकाहि ललितकृतीशीं माझा फारसा संबंध आला नव्हता – आणि मेघदूताच्या लालित्याची महति त्यानंतर किती तरी वर्षांनीं समजली ! कॉलेजांत प्रथमवर्षींच वाङ्मयाची विलक्षण गोडी प्रो. नारळकरांनीं लावली, परंतु ती अल्पकालीनच ठरली आणि मराठी वाङ्मयाचें वाचन तर बी.ए. झाल्यानंतरच ‘आजकालचा महाराष्ट्र’ या पुस्तकाच्या निमित्तानें सुरू झालें.

मग मी आज कां लिहितों ? आज तरी मी हाडाचा लेखक बनलों आहे का ? कोणाला ठाऊक ? पण मी प्रथम पत्रकार आहे. माझें बहुतेक लिखाण वृत्तपत्रांचे रकाने भरून काढण्यासाठीं होत असतें. वृत्तव्यवसाय हा असा दुष्ट दुराग्रही व्यवसाय आहे कीं, एकदा त्याच्या कचाट्यांत सांपडलांत कीं, तुम्ही हाडाचे लेखक आहांत किंवा नाहींत, तुम्हांला लेखनाची हौस आहे किंवा कसें याची फिकीर तो करीत नाहीं. कागद, पेन्सिल आणि कंपॉझिटरची नजर यांच्याशीं तुमची गांठ तो घालून देतो आणि तुमच्या लेखन-शक्तीची जी ओढाताण होते तिची गंमत तो पहात राहतो. माझें बहुतेक लेखन या पत्रव्यवसायाच्या निष्ठुर ओढीमुळें झालेलें आहे. मी व्यक्तिचित्रें लिहिलीं तीं वृत्तव्यवसायांत सार्वजनिक जीवनांतील घडामोडींबरोबर त्या घडामोडीशीं निबद्ध असलेल्या व्यक्तींचाहि प्रासंगिक परामर्श घ्यावा लागतो म्हणून. माझा 'पाकिस्तान' वरील प्रबंध हा राजकारणाच्या नैसर्गिक आवडीपेक्षां डॉ. आंबेडकरांच्या 'दि थाट्स् ऑन पाकिस्तान' या पुस्तकाचा जो वृत्तपत्रीय प्रपंच मला करावा लागला त्यांतून निर्माण झालेला आहे. 'कलेचीं क्षितिजें' या पुस्तकांतील बहुतेक सारें वाङ्मयविवेचन, साहित्यसम्मेलनाच्या अध्यक्षीय भाषणांचा परामर्श घेण्याच्या निमित्तानें झालेलें आहे. रोजचे अग्रलेख तर मला माझ्या इतर आन्हिकांप्रमाणेंच उरकावे लागतात ! एखादा दरवेशी दोरीचा फांस टाकून अस्वलाला पकडतो व नंतर त्याला हवें तसें नाचायला लावतो, त्याप्रमाणें वृत्तव्यवसायानें मला पकडलें आहे आणि आपल्या तऱ्हेवाईक तालावर तो मला नाचवीत आहे !

तेव्हां मी लिहितों याचें श्रेय अगर अपश्रेय जर कोणाला द्यावयाचें असेल तर ज्यांनीं मला वृत्तव्यवसायांत खेचलें त्यांच्याकडे तें सुपूर्द केलें पाहिजे. या सन्मित्रांचा मी येथें उल्लेख करीत नाहीं. परंतु त्यांच्यापैकीं कांहींच्या आग्रहामुळें मी जो पहिला लेख लिहिला त्याचें स्मरण मात्र मला होत आहे. गडकऱ्यांनीं कांहीं 'पहिल्या' गोष्टींचें मार्मिक वर्णन केलेलें आहे. त्यांत त्यांनीं पहिल्या लेखाचा उल्लेख करायला हवा होता. पहिल्या चुंबनाप्रमाणेंच पहिल्या लेखाचीहि धुंदी असते — आणि पुढें संसार नीरस आणि तापदायक झाल्यावर सुद्धां या पहिल्या चुंबनाचें स्मरण झालें कीं, एकीकडे विवेकबुद्धीला त्याच्या धुंदीचें आश्चर्य वाटत असूनहि त्या धुंदीची माया पुन्हा पसरत आहे असें वाटतें आणि त्या वेळच्या आनंदाचें दिव्य लक्षण – दिव्य भास असें केशवसुतांप्रमाणें हवें तर आपण म्हणूं या – पुनः अनुभवायला मिळतात, त्याचप्रमाणें लेखनाचें स्मरण झालें म्हणजे त्यावेळची धुंदी पुन्हा पसरूं लागते आणि वाङ्मयनिर्मितीच्या आनंदाचे कांहीं क्षण अनुभवायला मिळतात!

माझें लघुकथालेखन हें वृत्तव्यवसायाचें चेष्टित आहे असें मात्र मला म्हणतां यावयाचें नाहीं. अर्थात् मी लेखक बनलों नसतों तर मी कथालेखनहि केलें नसतें. मी लेखनाला सुरवात केल्यावर पांचसहा वर्षांनीं, म्हणजे वयाची तिशी उलटल्यावर, लघुकथालेखनास सुरवात केली. परंतु तो वृत्तव्यवसायाच्या कठोर कर्तव्याचा खात्रीनें भाग नव्हता. शारिरिक श्रम करतांना कामगारांना गाणीं

म्हणावीशीं वाटतात ना, तसें वृत्तव्यवसायाचे कष्ट उपसतांना मला सुचलेलीं हीं गाणीं आहेत, आणि ' गाण्यानें श्रम वाटतात हलके ' या न्यायानें वृत्तव्यवसायाचा कष्टमय प्रवास या कथालेखनानें मला थोडाबहुत सुसह्य झालेला आहे. माझें लघुकथालेखन हें माझ्यामध्यें अलीकडे जो बदल झाला आहे असें मला वाटतें त्याचें फल असावें. ज्या वेळीं कथा आणि काव्य यांच्याशीं मनोज्ञ क्रीडा करावयास हवी होती त्या तरुण वयांत मी मार्क्सवादाचे विसार्डी प्रयोग करीत होतों. मला आठवतें, मार्क्सच्या ' दास कॅपिटल ' चा पहिला भाग हातीं पडल्याबरोबर, गॉर्कीची निम्मीअधिक वाचून झालेली 'मदर' ही कादंबरी मी बाजूला ठेवली आणि मार्क्सच्या या विरोधविकास-वादी युक्ति–प्रयुक्तिवादानें ठासून भरलेल्या त्या ग्रंथाच्या पृष्ठांत मी निमग्न होऊन गेलों. मार्क्सवादाच्या आवडीमुळें आधुनिक औद्योगिक संस्कृतीचें मला तेव्हां विलक्षण आकर्षण होतें. ' रोबोमॅन ' आणि ' टेस्ट-ट्यूब बेबीज् ' यांच्या कल्पना माझें चित्त खेंचून घेत. परंतु अलीकडे मार्क्सवादावरचा माझा विश्वास उडाल्यामुळें म्हणा किंवा बेचाळीसच्या आंदोलनामुळें सुजला, सुफला, सस्यश्यामला, फुल्ल-कुसुमित, द्रुमदलशोभिनी अशा मातृभूमीची खरी ओळख पटल्या-मुळें म्हणा, औद्योगिक संस्कृतीची मला उबग आलेली आहे. मुंबईच्या कारखान्यांतील यंत्राचे चमत्कार माझें मन आतां मोहवीत नाहींत. रेल्वेच्या इंजिनांनें माझ्या कल्पनेला आतां चेतना मिळत नाहीं. बंदरांतील बोटी पाहून माझे विचार पूर्वीं दूरदेशीं भटकायला जात, तसे ते आतां क्वचितच जातात. बंदरावरच्या गुदामांत दिस-

णाऱ्या आधुनिक कारखान्यांच्या मालाच्या राशी मला विषण्णतेच्या राशी वाटतात. ट्रॅमच्या ठणठणाटानें बधीर झालेल्या माझ्या बुद्धीस, वरच्या तारांवर जीं विद्युत्पुष्पें फुलतात त्याचें सौंदर्य, तितकेंसें जाणवत नाहीं. यंत्र बंद पडून बस मध्येंच थांबते आणि क्वचित् धुमसूं लागतें तेव्हां आर्थिक अरिष्टांमुळें मधुनमधून खंडित होऊन युद्धें धुमसविणाऱ्या औद्योगिक संस्कृतीविषयींचें उदास विचार माझ्या मनांत घोळूं लागतात. गिरण्यांच्या चिमण्या मला अलीकडे मृत्यूचें थैमान घालणाऱ्या तोफांची आठवण करून देतात — आणि रेडिओवरचें श्रुतिसुभग संगीत ऐकतांना सुद्धां यांत्रिक संस्कृतीची खरखर मध्येंच ऐकूं येते ! मला आता निसर्गाचें विलक्षण आकर्षण वाटूं लागलें आहे. आमच्या मुंबईत आज गुलमोहराचीं डंवरलेलीं झाडें अग्निपुष्पांचें प्रसाधन करून उभीं आहेत. लहानपणापासून मी हीं झाडें पहात आहे, परंतु त्यांचें प्रमाथी सौंदर्य मला गेल्या तीनचार वर्षांतच जाणवलेलें आहे.

आज मुंबईच्या उद्यानांत आणि पदपथांवर निसर्गाचें केवढें वैभव फुललें आहे ! कॅशिआ, चंपा, बोगनविलिआ, चेरीब्लॉसम, गुलमोहर ! — जणुं पुष्पदेवतांचा वार्षिकोत्सव सुरू आहे. परंतु कृत्रिम उद्यानांतलें हें वैभव मला अंतरीचें समाधान देऊं शकत नाहीं. माझें मन आज माझ्या मायभूमीच्या स्वच्छंद निसर्गाशीं हृदयालाप करायला आतुर झालें आहे. माझें चित्त आज कोंकणच्या दऱ्याखोऱ्यांत धावत आहे. कोंकणच्या उत्संगावर निसर्गाचीं जीं नानाविध बालकें खेळत आहेत त्यांची क्रीडा मला पहायची आहे.

जंगलांतील पऱ्यांसाठीं पुष्पगुच्छ घेऊन उपस्थित झालेले रानकुडे आणि करवंदांचा गोड नैवेद्य घेऊन आलेल्या रानवेली यांच्या भेटीचीं दृश्यें मला पाहयचीं आहेत. वनराईतल्या झऱ्यांवर सायंस्नानें करतांना पांखरें जी गोड किलबिल करतात, ती मला ऐकायची आहे. सह्याद्रीला अर्घ्य देण्यासाठीं आलेला सिंधुसागर जें फेनपुष्पाचें सौंदर्य उधळीत आहे, तें मला कोंकणच्या कड्यांवरून पाहयचें आहे. चांदण्यानें फुललेल्या रात्रीं बैलांच्या गळ्यांतील घुंगुराच्या तालावर तरंगत तरंगत मला बैलगाडींतून प्रवास करायचा आहे. कोंकणच्या साध्याभोळ्या संस्कृतींत मानवी मनाचे जे नानाविध रंगसुगंध पसरले आहेत, त्यांचा आस्वाद मला घ्यावयाचा आहे. परंतु वृत्तव्यवसायानें मला मुंबईत जखडून ठेवलें आहे आणि माझ्या या आवडींचें रूपांतर कोंकणविषयींच्या माझ्या वेडांत झालें आहे. मला वाटतें, माझें हें वेड हीच माझ्या पुष्कळशा लघुकथांची प्रेरणा आहे. मी कवि असतों तर कवि माधवप्रमाणें कोंकणच्या जीवनावर आणि कोंकणच्या निसर्गवैभवावर कविता करीत सुटलों असतों. मला काव्य करतां येत नाहीं म्हणून मी लघुकथा लिहितों. माझ्या कांहीं कथा निव्वळ निसर्गदृश्यानें स्फुरलेल्या आहेत. दोन वर्षांपूर्वी कोंकणच्या एका घराच्या अंगणांत पांढऱ्या चाफ्यावर मीं कृष्णकमळीची वेल पाहिली आणि एका कथेची कल्पना, ढगामागची वीज क्षणमात्र एक नवीनच विश्व उजळून जाते तसें, माझें मन उजळून गेली. कोंकणच्या अशाच कांहीं दृश्यांनीं माझ्या इतर कांहीं कथांची प्रेरणा मिळालेली आहे. एकदां एका ओढ्याच्या उगमाचा शोध करीत करीत मी

हिंडत होतों, तो ८०।९० वर्षांचा एक वृद्ध म्हातारा त्या ओढ्याचें पाणी शेतांत वळवीत असलेला मला दिसला आणि त्या क्षणीं त्या ओढ्याचा नाहीं तरी ‘ स्वप्नाची समाप्ति ’ या माझ्या कथेचा उगम मला आढळला. माझ्या सर्वच कथा निसर्गप्रेमांतून स्फुरल्या असें मला म्हणायचें नाहीं. ‘ व्याधाची चांदणी ’ सारखी एकादी कथा स्वभावच्छटेच्या प्रतीतीनें स्फुरलेली आहे. परंतु या कथांचा निसर्गाशीं कसला ना कसला तरी संबंध जोडून दिल्याखेरीज कलानिर्मितीला जी एक मनाची आर्त आणि आर्द्र अवस्था व्हावी लागते, ती मुळीं माझी होतच नाहीं ! कृष्णकमळीच्या वेलीनें मला जशी कथेची स्फूर्ति मिळाली तशी एकाद्या झाडानें अगर वेलीनें अजूनहि मिळूं शकेल, असें मला वाटतें. उदाहरणार्थ, बोगनविलीआची वेल-जिचें बागेश्रीची वेल असें नांव मी ठेवलें आहे – मला आढळली किंवा उन्हाळांचा साजशृंगार करून उभा असलेला गुलमोहर नजरेस पडला कीं, माझें मन समुत्कंठित होतें आणि केव्हां तरी यांच्यावर मी कथा लिहीन, अशी आशा पालवूं लागते.

कोंकणचें चिंतन हा निसर्गप्रेमामुळें माझा जसा गूढ आनंदाचा विषय झालेला आहे. त्याप्रमाणें तेथील जीवनाच्या ऱ्हासामुळें तो विषादाचा विषयहि झालेला आहे. लहानपणीं मी ज्या खेड्यांत आनंदानें खेळलों, हंसलों, बागडलों तेथें आज पसरलेलें उजाड उदास वातावरण बघितलें म्हणजे जिवाची कालवाकालव होते. ज्या घरांत लहानपणीं मीं प्रसन्न जीवन नांदतांना पाहिलें तेथें आज पडक्या भिंतींच्या आधारानें भोंवाडें ( वारुळें ) माजलेलीं पाहिलीं

आणि त्यांत सरडे, विंचू, पाली, सर्प असल्या हिडीस प्राण्यांच्या रूपानें उध्वस्तता वावरतांना आढळली म्हणजे हृदयाला डंख बसतो. या डंखाच्या वेदना व्यक्त करणाऱ्या कथा मी केव्हां तरी लिहीन, असें वाटतें. कारण हीं उध्वस्त दृश्यें आठवलीं म्हणजे मनाचे सारे कोपरे विषादानें भरून जातात आणि वृत्ति विलक्षण आर्त होते.

स्मरणशक्ति ही काव्याचीच एक शक्ति आहे, अशा अर्थाचें स्टीफन स्पेंडरचें एक विधान मी नुकतेंच वाचलें. कल्पनाविलास हा स्मरणशक्तीचाच एक विशिष्ट उपयोग आहे, असेंहि ते म्हणतात. माझ्या कथांत कल्पनाविलास आहे, असें कित्येकजण म्हणतात, तें खरें असेल तर त्याचा अर्थ या विधानानें लागूं शकेल. माझी स्मरणशक्ति विलक्षण अवसानघातकी आहे. मनुष्याच्या नांवाच्या बाबतींत ती माझी नेहमीं फजिती करते. वाचलेल्या पुस्तकांतला आशय एक वेळ ध्यानांत राहिला तरी त्याचा तपशील मी हटकून विसरतों. परंतु लहानपणीं कोंकणांत घालविलेलें जीवन आठवलें कीं, त्यावेळीं पाहिलेलीं दृश्यें, अनुभवलेल्या भावना आणि फुलविलेलीं स्वप्नें माझ्या मनासमोर संपूर्ण स्वरूपांत उमलतात आणि एक नवीनच विश्व निर्माण होतें. एक गोष्ट खरी कीं, या विश्वांतील दृश्यांचें चित्रण करण्याऐवजीं त्यांत नुसतें रंगून जाण्यांत मला अधिक आनंद होतो. या विश्वांतील वास्तव्यांत, लेखनापेक्षां लेखनाचे बेतच अधिक होतात. बागेश्री आणि गुलमोहर, कोंकणच्या किनाऱ्यावरचीं फेनपुष्पें आणि उजाड चंद्रमौळी घरांतील उध्वस्तता यांच्या बाबतींत हाच अनुभव येणार नाहीं याची खात्री काय ?

नगर वाचनालय, सातारा
आ४१७८८
१६

# मी कां लिहितों ?

श्री. बा. सी. मर्ढेकर.

'कवितांच्या बाबतींत तर पांच रुपयाला एक कविता असा भाव आहे. आणि तोहि फक्त दिवाळीअंकापुरता. पण पांच असो कीं पन्नास असोत, रुपये म्हणजे रुपये. ......... तेव्हां मी जें जें लिहितों, तें तें या रुपयांकरितां लिहितों असं कबूल केलं, तर त्यांत फारसं वावगं नाहीं, एवढं तरी तुम्ही खास म्हणाल,' असं सांगून व उपरोधानें हंसून, श्री. बा. सी. मर्ढेकर खरं उत्तर द्यायची टाळाटाळी करीत आहेत, असं जरी लेखाच्या आरंभीं वाटलं तरी या लेखाच्या शेवटीं —

'मिळतिल कवनें मिळतिल दुर्मिळ तत्त्वांचे बोल,
दिव्य अश्रुंनों ! तुम्हांपुढें परि ते सगळे फोल'

असें उद्गारून, जेव्हां ते 'पापणीच्या ओल्या कडें'तून लेखणीकडे बघतात; आणि व्यक्तिसमूहाचें दीन पण कणखर जीवन, स्वतःचें वाचन, निरीक्षण व अनुभव या सर्वांचा प्रतिक्रियात्मक असा आशय जेव्हां त्यांच्या नजरेसमोर गोळा होतो, तेव्हां ते 'मी कां लिहितों' या प्रश्नासंबंधीं तन्मयतेनें बोलूं लागतात व त्यांच्यांतला खरा कलाकार व टीकाकार जागृत होतो; आणि मग सखोल भावना, त्याची सौंदर्यतत्त्वानुयायी संगति व वाङ्मयीन महात्मता यांचें विवेचन करणारे मराठीचे सर्जनशील टीकाकार मर्ढेकर आपल्या समोर उभे राहतात.

कवि व कादंबरीकार या नात्यानेंहि श्री. मर्ढेकर प्रथितयश आहेत. परंतु ललितकलेचीं माध्यमें व ध्येयें यांची चर्चा करून, सौंदर्यशास्त्राला त्यांनीं जें व्यापक व नवें रूप दिलें आहे व मराठीचे नवें साहित्यशास्त्र निर्माण करण्याची जी दिशा त्यांनीं दर्शविली आहे, त्यावरच त्यांची खरी कीर्ति-महात्मता अधिष्ठित आहे.

मी लिहितों. खरं आहे, मी लिहितों हें. पण मीं अजूनपर्यंत इतकं लिहिलेलं खास नाहीं कीं, शारदेच्या मंदिरांत 'मी कां लिहितों,' याचा जाब देण्याची माझ्यावर पाळी यावी. कुठल्याहि दैनिकाच्या किंवा साप्ताहिकाच्या रकान्यांतून नियमितपणानें तिरंदाजी करून, मी वाचकांना हैराण करून सोडलेलं नाहीं. एकाच वेळीं अनेक मासिकांतून माझीं काव्यसुमनं, किंवा श्री. लाडांच्या शब्दांत म्हणजे 'मुक्तकें', उधळून 'परमेश्वरा, मर्ढेकरांच्या कवितेंतून अम्हांला मुक्त कर' असा धांवा करण्याची पाळी मीं वाचकावर आणलेली नाहीं. दर सहा महिन्याला किंवा वर्षाला माझ्या कादंबरीचा पाळणा हलून, वाचकांच्या खिशाला उपद्रव झाला आहे, असंहि नाहीं. यापेक्षांहि पुढं जाऊन, मी असं म्हणेन कीं, परदेशीय लेखकांची उसनवारी करून, पण वाचकांच्या नजरेंतून सहज चुकेल, अशा रितीनें मूळ लेखकाचें नांव लिखाणाच्या शेवटीं फक्त बारीक टाइपांत देऊन, मीं माझ्या साहित्यसंसाराचा पसारा इतका ऐसपैस घातलेला नाहीं कीं, वाचकांच्या सारासारशक्तीला त्यामुळें शह बसावा. इतकंच काय, पण या ना त्या नवोदित लेखकाच्या प्रतिभाविकासाला, न विसंबतां नि न डगमगतां, हरघडी प्रस्तावनेची तीट लावून, मीं शारदेच्या पदरांत इतकें काजळ भरलेलं नाहीं कीं, आतां उजळमाथ्यानं तिच्या परिवारांत फिरकायची मला चोरी व्हावी ! याच्या उलट, जगाला आपल्याला कांहीं तरी शिकवायचं आहे, संदेश द्यावयाचा आहे, अशा प्रेषिताच्या थाटांत मी लिखाण केलेलं नाहीं, त्यामुळें 'मी कां लिहितों' तें सांगून, माझा

वाङ्मयीन पवित्रा चित्रित करण्याइतका अधिकारहि मी प्राप्त करून घेतलेला नाहीं. तेव्हां प्रस्तुतचा प्रश्न माझ्या बाबतींत अप्रस्तुतच नाहीं का ?

पण, तुम्ही म्हणाल, " अहो मर्ढेकर, तुम्हीं आजवर किती लिहिलं आणि कशा थाटांत लिहिलं, याचा प्रश्न नाहीं. आमरण ब्रह्मचारी असणाऱ्या चार्ल्स् लॅंबनें स्वप्नसृष्टींतल्या आपल्या संतानांचं काव्यमय वर्णन केलं आहे. त्याचा कित्ता गिरवून, 'आगामी प्रकाशना ' खालीं आपल्या पांच-पंधरा प्रतिभा-पिलांचं, तीं जन्मायच्या अगोदरच, ' कल्पनावैभव ! ' या मंत्रानें बारसं उरकून घेणाऱ्या प्रथितयश साहित्यिकांच्या कल्पनावैभवानें तुम्हीं आम्हांला दहशत बसविलेली नाहीं, ही एक गोष्टहि तुमच्या बाजूची आहे; पण तुम्ही कांहीं ना कांहीं तरी लिहितांच. त्यांतलं कांहीं आम्हांला आवडतं, कांहीं आवडत नाहीं; बरचसं आम्ही वाचीतहि नाहीं. पण हें जें तुम्ही लिहितां, तें कोणत्या उद्देशानें, कोणत्या हेतूनें ? कशामुळें तुम्ही हें लिहायला प्रवृत्त होतां, तें सांगा. "

आतां, लिखाण करण्यांत माझा उद्देश काय असतो, कशामुळें मी लिहायला प्रवृत्त होतों, असं कुणी मला विचारलं, म्हणजे खरोखरच मला मोठी पंचाइत पडते. कारण, हाडाचा मी सरळ आणि शक्य तोंवर सत्य बोलणारा मनुष्य आहे. तथापि मोह होतो खोटं बोलण्याचा. हृदयांत उचंबळून येणारा विचारभावनांचा संघर्ष वाङ्मयकृतींत उतरविल्याशिवाय स्वस्थ बसवत नाहीं. कल्प-

नेच्या विशाल भरारीनें अज्ञेयाच्या अंगणांतला पाचोळा वेंचून आणून, वाङ्मयवृक्षाच्या एका फांदीवर आपलं घरटं बांधलं नाहीं, तर चैतन्याची ऊब कुणाला आणि कशी मिळायची, ह्या विवंचनेनें गारठून जाऊन, रक्ताची शाई वा शाईचं रक्त करावं लागतं; अशा सारखं कांहीं तरी, मनाची नाहीं तरी जनाची लाज बाळगून, म्हटल्याखेरीज ललितकला या दृष्टीनें वाङ्मयाची अब्रू कशी राहील ? पण हा मोह आवरला पाहिजे. कारण, वस्तुस्थिति अशी आहे कीं, मी लिहितों तें पैसे मिळावे म्हणून. कारण जरा अरसिक दिसतं. पण तें सत्य आहे. आतां, मराठींत लेखकाला फारसे पैसे मिळत नाहींत, हें तुम्हांला ठाऊकच आहे. पण इंग्रजींतील १८००-२००० शब्दांच्या एका साध्या लेखावर पन्नास किंवा शंभर रुपये मिळविणाऱ्याला तितकीच रकम मराठी लिखाणानें 'आदा' करायला १००-१२५ पानांचं पुस्तक लिहावं लागतं, हें कदाचित् आपणांस माहीत नसेल. कवितांच्या बाबतींत तर, पांच रुपयांला एक कविता, असा भाव आहे, आणि तोहि फक्त दिवाळीअंकापुरता. पण पांच असोत कीं पंचवीस असोत, रुपये म्हणजे रुपये ! कल्पना करा, पांच रुपयांत अणखी आठ आणे मिळविले, म्हणजे चांगल्यापैकीं तयार शर्ट विकत घेतां येतो. किंवा पावाचा अर्धा लोफ, रोज एक याप्रमाणें, सबंध महिनाभर घेऊनहि, शेवटीं मुलांच्या लिमलेटकरितां आठ आणे शिल्लक टाकतां येतात ! तेव्हां, मी जें जें लिहितों, तें तें रुपयांकरितां लिहितों, असं कबूल केलं तर त्यांत फारसं वावगं नाहीं, एवढं तरी तुम्ही खास म्हणाल.

अर्थात्, पैशाशिवाय मी लिखाण केलेलंच नाहीं, असं नाहीं. पैसा मिळावा, हा हेतु असला तरी नेहमींच तो सफल होतो, असं नाहीं. चार वर्षांपूर्वीं प्रसिद्ध झालेल्या माझ्या एका पुस्तकाबद्दल मला अजून एक दब्बू पैसाहि मिळालेला नाहीं. पण असं जें लिखाण मी करतों, तें कीर्तीच्या आशेनें. यांत थोडा आत्मचरित्राचा भाग आहे, याबद्दल आपण क्षमा करावी. विद्यार्थीदशेंत असतांना, मी एक बऱ्यांपैकीं विद्यार्थी समजला जात असे. पण त्या मानानें परीक्षांत फारसं यश माझ्या पदरांत पडलं नाहीं. रंग-फलक घेऊन कुंचल्यानें कीर्ति हस्तगत करायची मनीषा; पण तो उद्योगहि अनेक कारणांनीं बाजूला ठेवावा लागला. पण आयुष्यांत मनुष्यानें कांहीं नांव करावं, निदान तसा प्रयत्न तरी करावा, अशी भोळी समजूत. तेव्हां राहतां राहिलं जें लेखन, त्याच्या आधारावर वर्तमान आणि भावी कालांत तरंगता आलं तर पाहावं, अशा आशेनें म्हणा, किंवा अहंकारानें म्हणा, मी लिखाण करतों. हा हेतु खरोखरच सफल व्हायचा, तर या ना त्या निमित्तानें, लहान वा मोठ्या टाइपांत, आपलं नांव सतत वाचकांच्या डोळ्यांसमोर ठेवलं पाहिजे. संपादक नाहीं तर वक्ता, या नात्यानें, कवि नाहीं तर लघुकथालेखक, निदान-पक्षीं टीकाकार म्हणून, जातां जातां दृष्टि पडली, तरी वाचकाला सहज आपल्या नावांत बसविलेल्या छापखानी खिळ्यांची ठेंच लागेल, एवढी खबरदारी घेणं जरूर आहे. पण तें न साधलं, तरी वाङ्मयाच्या इतिहासांतल्या परिशिष्टांतील सूचींत आपलं नांव बसवितां आलं तर बसवावं, ही खरोखर मनापासून इच्छा. डोळ्या-

देखत त्यांत यश आलं तर भाग्य समजायचं. नाहीं तर निदान भावी काळांत तें साफल्य आपल्याला लाभेल, या विचाराचं समाधान कांहीं कुणाला माझ्यापासून हिरावून घेतां येत नाहीं खास !

मी जें लिहितों तें मुळांतच मुळीं कां लिहितों याचं उत्तर हें असं आहे. आतां अशा तऱ्हेचं मी लिहितों तशा तऱ्हेचंच कां लिहितों, असं तुम्ही मला विचारलंत तर त्याचं उत्तर देणं मात्र जरा कठीण आहे. प्रयत्नच करायचा तर माझ्या एकंदर लिखाणाचे दोन भाग केले पाहिजेत. एक भाग ललित लिखाणाचा, म्हणजे कविता-कादंबरीचा. आणि दुसरा भाग टीका किंवा चर्चात्मक लिखाणाचा. यांपैकीं दुसऱ्या प्रकारचं — म्हणजे चर्चात्मक — लिखाण मी कां करितों, हें सांगणं तितकसं कठिण नाहीं. वाङ्मयाचा आस्वाद घेत असतांना, त्याचं परिशीलन करीत असतांना, वाङ्मयीन टीका शास्त्राचा, साहित्य शास्त्राचा आसरा मला अर्थातच घ्यावा लागला. पण अतापर्यंत या शास्त्राचं जें स्वरूप आहे, त्यानें समाधान होईना. कांहींतरी, कुठें तरी, अपुरं पडतं आहे, खटकतं आहे, असं वाटायचं. ललित वाङ्मय ही एक ललितकला आहे. तेव्हां म्हटलं, या एकाच कलेच्या मर्यादेंत न रहातां, इतरहि कांहीं ललित-कला आहेत, त्यांचा विचार करावा आणि बघावं, त्यांचा अभ्यासाचा वाङ्मयीन टीकाशास्त्रांत कांहीं उपयोग होतो कां. अशा रीतीनें सौंदर्यशास्त्राचा थोडाफार अभ्यास केला. स्वतःचे अनुभव, कांहीं इतरांचे अनुभव, आणि हा सौंदर्यशास्त्राचा थोडासा अभ्यास — ह्या सर्वांतून सौंदर्याबद्दल आणि कलांबद्दल एक विशिष्ट विचार —

सरणी माझ्या मनांत हळूं हळूं तयार होऊं लागली. ह्या विचार–सरणींत सत्य आणि सौंदर्य यांमधील फरकाला उठाव मिळाला, आणि हा फरकच त्या विचारसरणीचा मध्यबिंदु बनला. निरनिराळ्या ललितकलांच्या माध्यमानुरोधानें सौंदर्यशास्त्रांत सुसंगतपणा आणतां येतो, असं या विचारसरणींत दिसलं. आणि त्यामुळें ह्या विचार–सरणींत वाङ्मयाच्या टीकाशास्त्राला, Poetics ला, सौंदर्यशास्त्राचाच Aesthetics चाच एक भाग, असं स्थान प्राप्त झालं. माझ्या ह्या सौंदर्यशास्त्रीय, आणि अर्थात् त्यामुळें साहित्यशास्त्रीय, विचार–सरणींत कांहीं वाक्यें पूर्णविरामीं आहेत, तर कांहीं प्रश्नचिन्हांकित आहेत. त्यांपैकीं पूर्णविरामीं वाक्यांबद्दल विचारवंतांनीं साधकबाधक चर्चा करावी, आणि प्रश्नचिन्हांकित वाक्यांवर त्यांच्याकडून प्रकाश पडावा, ही इच्छा. म्हणून मी त्याबद्दल लिहितों. उद्देश हा कीं, बसल्या बसल्या दुसरं कांहीं नाहीं, तर निदान सौंदर्य आणि ललितवाङ्मय यांच्या स्वरूपाबद्दल कांहीं शिकतां आलं तर शिकावं. हो, उंटावरूनच हाकायचं तर शेळ्याऐवजीं मोर तरी हाकावे, म्हटलं !

आतां, लिखाणाच्या भरांत शिकण्याऐवजीं शिकविण्याचा प्रयत्न होतो, हें खरं आहे, पण माझी मूळ प्रवृत्ति मात्र शिकण्याची.

उरला भाग ललित लिखाणाचा – माझ्या कविता-कादंबरीचा. यांत माझ्या कांहीं अप्रकाशित इंग्रजी कविताहि आहेत. त्यांच्या संग्रहाकरितां मी एक छोटीशी प्रस्तावना लिहून ठेविली आहे. त्या प्रस्तावनेंत एक वाक्य आहे. त्याचा मथितार्थ असा कीं, मुंग्या

जशा अंडीं घालतात किंवा गाई जशा रवंथ करतात तसेंच कवि कविता लिहितात. त्याच प्रवृत्ति, तींच कारणें आणि तीच अपरिहार्यता. हीच गोष्ट माझ्या सर्व ललित (?) लिखाणाला लागूं आहे. प्रत्येक मनुष्याचं मन म्हणजे एक गुप्त बालेकिल्ला असतो. त्याच्या आंत विलक्षण गुंतागुंतीच्या घडामोडी अखंड चालूं असतात. त्याची तटबंदी अभेद्य आणि उत्तमपणें संरक्षित असते. पण या तटबंदीवर उडणाऱ्या चिटपाखरावरून तिच्या आंतील घडामोडींचा अंदाज केला तर निखालस दिशाभूल व्हायची. कारण, एखाद्या फॅन्सी ड्रेस बॉल् प्रमाणं ह्या तटबंदीच्या आंत विविधरंगी, विविधताली, विविधपोशाखी; बिनरंगी, बिनताली, बिनपोशाखी वा अर्धपोशाखी अशा बुडाच्या नि बिनबुडाच्या बाहुल्यांचे नाच सदैव चालूं असतात. आणि तें फॅन्सी ड्रेस बाल् इतकेच चमत्कृतिजनक असतात. प्रत्येक मनुष्याच्या मनांत जो हा टंबल् प्ले किंवा ढकलाढकलीचा खेळ दरक्षणीं चाललेला असतो, त्याचं कल्पनेनें निदान करणं, किंवा क्वचित् तटबंदींत एखादं भोकं दिसल्यास त्यांतून एक डोळा बंद करून आंत पहाणं, यांत फार मौज वाटते. ही अदृश्य सृष्टि सोडून दृश्य सृष्टीकडे बघितलं तर जगाच्या धबडग्यांत व्यक्तीचं जिणं किती क्षुद्र, तिचं महत्व कसं कस्पटासमान, तिचं अस्तित्व किती क्षणभंगुर नि तिचं ऐश्वर्य किती असहाय, आहे, असं दिसतं, नाहीं ? पण त्याहीपेक्षां जास्त मंत्रमुग्ध होतों मी तो व्यक्तिगटाच्या किंवा समुदायांच्या जीवनांतली स्थित्यंतरं पाहतांना ! कारण, त्या स्थित्यंतरांचा व्याप अफाट नि व्यवहार

आंधळा, अजब, अप्रतिहत! त्याच्या कळी शोधायला गेलं तर कांहींचा मागमूसहि लागत नाहीं. ज्यांचा लागतो, त्यांचे चाप कसे ओढले जातात नि कसे सुटतात, याची अटकळ खास अशी बसत नाहीं. पण व्यक्तींच्या किंवा व्यक्तिसमूहांच्या असल्या दीन, केविलवाण्या जीवनांतहि एक प्रकारचा पीळ, कणखरपणा असतो. निदान असावा, असं वाटतं. अशा रितीनें स्वतःचे अर्धे कच्चे अनुभव, आजूबाजूंचं मोडकंतोडकं निरीक्षण आणि थोडंसं भलं-बुरं वाचन, ह्या सगळ्यांचा मिळून मनांत कांहींतरी आशय जमा होतो; पापणीची कड किंचित् ओलसर झालीशी भासते; अन् वाटतं कीं, हा आशय शब्दांत लिहावा आणि मग मी स्वतःलाच विचारतों; " कां लिहितों मी हें ? "

" मिळेल वैभव, दिसतिल जगतीं रत्नांच्या राशी,
अश्रु दयामय मृत्युजगीं या मोल नसे त्यांसी
मिळतिल कवनें, मिळतिल दुर्मिळ तत्त्वांचे बोल,
दिव्य अश्रुनों! तुम्हांपुढें परि ते सगळे फोल

... ... ... ...

परजीवास्तव जेथ आंतडें कळवळुनी येई,
त्या हृदयाविण स्वर्ग दुजा या ब्रम्हांडीं नाहीं. "

— मग आठवतं : पैसा, रुपये – निदान किर्ति, नाहीं, चुकलों: किर्ति–निदान रुपये! उचला खालीं ठेवलेली लेखणी पुन्हां!

# मी कां लिहितों ? १७

**प्रा. श्री. के. क्षीरसागर.**

" साहित्याची परंपरा ही राजकारणाच्या परंपरेहूनहि श्रेष्ठ प्राचीन आणि सार्वभौम आहे. " असें प्रा. क्षीरसागर यांचें मत आहे; आणि " साहित्यबाह्य प्रचार आणि मोहिमा यांचें दास्य साहित्यानें करावें, हें मला अत्यंत लज्जास्पद वाटतें, " असें ते म्हणतात. साहित्याच्या, सौंदर्याच्या व सत्याच्या सनातन मूल्याविषयीं त्यांची अशी अढळ व अविकृत निष्ठा असल्यामुळें, त्यांनीं सध्यां वाङ्मयांत माजलेल्या निरनिराळ्या विचारसंप्रदायाचे ' बुरखे ' ओढून काढण्याची चळवळ हातांत घेतली व महाराष्ट्राचें ज्वलंत, विचारवंत व परंपराभंजक टीकाकार म्हणून ते प्रसिद्ध झाले. त्याबरोबरच बुरखे ओढण्याच्या या चळवळींतील धोकाहि त्यांना माहिती आहे. बुरखे ओढण्याची चळवळ हे या ढोंगवाल्यांचें अखेरचें ढोंग असतें, हेंहि ते जाणतात. म्हणून त्यांच्या लेखनांत आवेशाबरोबर कमालीचा प्रमाणिकपणा व निस्पृहता आढळते. परंतु " भंजनासाठीं भंजन " हा त्यांचा खाक्या नाहीं. त्यांची दृष्टि स्वतंत्र व मूलगामी आहे. ह्यामुळें त्यांच्या टीकेला मराठी वाङ्मयांत पथनिर्देशाची प्रकाशकळा लाभली आहे.

असें असूनहि ते म्हणतात कीं, " वाचन, विचार व संचार ( फिरणें ) हें माझे आवडते व्यवसाय आहेत, याखेरीज इतर गोष्टी मी जुलमानेंच करतों. म्हणजे आपण जुलमानें लेखणी उचलली आहे, असें ते सांगतात. हा जुलमाचा रामराम त्यांना कां करावा लागला ?

कारण, " सुंदर वस्तु म्हणजे केवळ चिरकालचा आनंद नसून चिरकालची जबाबदारी आहे, " असें या लेखकास वाटते; आणि ती कां व कशी याचें विवेचन, या सौंदर्यवादी नितिशास्त्रज्ञानें – सौंदर्याच्या या शिलेदारानें, या लेखांत केलें आहे.

'मी कां लिहितों ?' या प्रश्नाचें उत्तर देतांना जातिवन्त साहित्यिकाला एका पाश्चात्य साहित्यिकाचें " I write because I must " हें उत्तर आठवेल. कवि हेच मी खरेखुरे साहित्यिक समजतों. आणि त्यांच्या बाबतींत तरी वरील उत्तर संपूर्ण सत्य आहे. कवीला काव्य लिहिल्याखेरीज राहणें अशक्य असतें, म्हणूनच तो लिहितो; आणि याखेरीज अन्य कारणानें लिहिणारा खरा कवि नसतो, असें माझें निश्चित मत आहे.

पण मी कवि नाहीं. आणि त्या अर्थानें पाहतां मी खरा साहित्यिक नाहीं. माझी ही साहित्यिकाची व्याख्या ऐकून कित्येक गद्य लेखकांना कसेंसेंच वाटेल. पण केवळ पद्यमय लिहील तोच कवि अशी मात्र माझी व्याख्या नाहीं. माझ्या म्हणण्याचा अर्थ इतकाच स्फूर्तीनें, — अर्थात् लिहिल्याशिवाय जीवन 'अशक्य' म्हणून, लिहिणारांनाच मी अव्वल दर्जाचे साहित्यिक समजतों. व म्हणूनच मी त्या वर्गांत पडत नाहीं, हें मला कबूल केलें पाहिजे.

जर तसें शक्य असतें तर मी केवळ माझे आवडते ग्रंथकार वाचण्यांत जन्म घालविला असता आणि मग मला किरकोळ खुशालीचीं पत्रें आणि खाजगी जमाखर्च याखेरीज लेखणीच हातीं घ्यावी लागली नसती. आणि तरीहि मला जीवन अवघड वाटलें नसतें. वाचन, विचार आणि संचार ( फिरणें ) हे माझे आवडते व्यवसाय आहेत. याखेरीज इतर गोष्टी मी जुलमानें करतों. मग असें असून मी लेखनाच्या – आणि तेंहि विचारप्रधान गद्य-

लेखनाच्या ! — यातायातींत कां पडलों ? खरोखरच हा प्रश्न माझ्या वाचकांच्या दृष्टीनेंच नव्हे तर माझ्या स्वतःच्या दृष्टीनेंहि इतका जिव्हाळ्याचा आहे कीं, त्याचें उत्तर औरंगाबाद रेडिओवरून देण्याची संधि आली, याबद्दल मला फार आनंद वाटत आहे.

माझ्या आवडीसंबंधीं मी मघाशीं थोडें सांगितलेंच आहे; पण आणखीहि थोडें सांगितलें पाहिजे. माझ्या आवडी, आणि माझ्या " नावडी " हि, फार तीव्र असतात. इतक्या तीव्र असतात कीं एखादी गोष्ट आवडल्यावर मला स्वस्थ बसवत नाहीं. — आणि एखादी गोष्ट माझी नावडती झाली तर मग विचारावयासच नको ! मला एखादें पुस्तक, एखादें तत्त्व अगर एखादी व्यक्ति आवडल्यास मी तिचा पुरस्कर्ता, अभिमानी, पाईक – आणि खिदमतगार बनतों. मला हें अद्याप कळत नाहीं, कीं एखादी गोष्ट आवडल्यावर माझे कांहीं मित्र शांतपणें आणि खाजगी रीत्या तिचा आस्वाद गुपचुप घेऊन मोकळे कसें होतात !

मी मागें पुण्याच्या वाङ्मयशोभा मासिकांत ' रसिक मित्रांशीं मतभेद ' म्हणून एक लघुनिबंध लिहिला होता. त्यांत जुनी खुशालचंद व्यक्तिवादी रसिकता आणि नवी प्रचारवादी समाजवादी रसिकता यांतील तफावत दाखवून दिली होती. मला एखादी गोष्ट सुंदर, बहुमोल वा पूज्य वाटत आहे; आणि माझ्या भोंवतालच्या लोकांना ती भिकार आणि तिरस्करणीय वाटत आहे, तर काय मी दारें लावून त्या वस्तूचा आस्वाद घ्यायचा - आणि पूजा करावयाची ?

— आणि दुसऱ्यांनीं तिची निंदा, पायमल्ली केली तर निमूटपणें पाहायची ? नाहीं ! — सुंदर वस्तूचे गुण ओळखणें हा एक विलास नसून एक जबाबदारी आणि एक कर्तव्य आहे. जर ती खरीच सुंदर आणि बहुमोल असेल तर अज्ञ लोकांना तिचें सौंदर्य पटवून देणें—आणि अरसिकांपासून तिचें रक्षण करणें हें आपलें काम ठरतें.

"A thing of beauty is a joy for ever" असें एका इंग्रज कवीनें म्हटलें आहे. मी म्हणेन, "सुंदर वस्तु म्हणजे केवळ चिरकालचा आनंद नसून चिरकालची जबाबदारीहि आहे."

आणि माझ्या लेखनाचा आरंभ या स्वयंनिर्मित जबाबदारींत झाला ! माझे आवडते ग्रंथकार, माझ्या आवडत्या व्यक्ति, माझे आवडते विचार जर इतरांच्या आदराचा विषय झाले नाहींत तर ते मला एकट्याला प्रिय आणि पूज्य होऊन उपयोग काय ? मी माझ्या डोळ्यांनीं माझ्या पूज्य वस्तूंची पायमल्ली पहायची काय ? मी त्यांचें सौंदर्य आणि पावित्र्य जगाला पटवून देईन — व त्याकरितां जरूर तें कष्ट करीन — अवश्य असेल ती कला हस्तगत करीन.

अर्थात् माझ्या लिहिण्याचें क्षेत्र टीकावाङ्मय हें होणें अपरिहार्यच होतें. सौंदर्यदृष्टि, रसिकता ही जन्मजातच असते; पण जें जन्मजात दृष्टीला सुंदर दिसतें त्याचें सौंदर्य दुसऱ्यास पटविण्यास मात्र बराच खटाटोप करावा लागतो. आणि या खटाटोपालाच टीकावाङ्मय म्हणतात !

याचा अर्थ असा नव्हे कीं सुंदर वाङ्मयविचार अथवा व्यक्ति

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



यांचें सौंदर्य जगाला पटणें हें माझ्या लिहिण्यावर अवलंबून आहे ! मला असा भ्रम मुळींच नाहीं. सौंदर्य हें स्वयंप्रभ असतें. आणि जो जगन्नियंता सौंदर्य निर्माण करतो तो त्याच्या रक्षणाची आणि पूजनाची तरदूद करण्यास काय नाबर आहे ? — पण वाङ्मयांतील वा जीवनांतील सौंदर्याच्या पुरस्कारार्थ आणि सेवेखातर उभें असणें हा मी माझा धर्म समजतों; — स्वभाव समजतों. सौंदर्याला त्याची गरज असो वा नसो !

जगद्गुरू स्वामी विवेकानन्द म्हणतात कीं, जगाला सुधारण्याचा मनुष्याचा खटाटोप म्हणजे भ्रम होय; जगाला सुधारण्याच्या प्रयत्नांत माणूस स्वतःची मात्र सुधारणा करतो ! वाङ्मय आणि जीवन यांतील मूल्यांचें रक्षण आणि स्तवन करणाऱ्या मजसारख्या भ्रान्तिष्टांचेहि कदाचित् तसेंच असेल ! आपलीं पूजास्थानें दुसऱ्याला दाखविण्यांत ते अपेशी होतील; पण त्यामुळें तीं त्यांची त्यांना अधिक स्पष्ट कळतील !

आपल्या प्रिय वस्तू प्रिय जनांना प्रिय होतीलसें करणें; आणि अप्रिय — अर्थात् अरसिक आणि अश्रद्ध – जनांपासून त्यांचें रक्षण करणें याखेरीज माझ्या लेखनामागें हेतूच नाहीं असें मात्र नव्हे ! मी काहीं संत-महन्त नव्हे – मी एक साधासुधा, थोडाफार अजाण मनुष्य आहे. ( आणि मी स्वतःस ज्या सौंदर्यवादी संप्रदायाचा समजतों त्यांत तर अजाणपणा, बालवृत्ति ही एक जतन करण्याची चीज मानतात ! ) मग प्रसिद्धि, कीर्ति वगैरे गोष्टी मला प्रिय होणार नाहींत हें कसें शक्य आहे ?

... वाचनालय, ...



मग आतांपर्यंतच्या गगनचुंबी ध्येयवादाचा आणि या प्राकृत प्रवृत्तीचा — पोरकटपणाचा !— मेळ कसा घालायचा ? मित्रहो ! तुम्हांला मी एक दृष्टान्त देतों. समजा, एखाद्या रजपूत अगर मराठा शिलेदाराकडे त्याच्या धन्याच्या लेकीला — राजकन्येला सुरक्षित स्थळीं पोहोचविण्याचें काम आलें आहे. तिच्यासाठीं तो प्राण देण्यास तयार होईल; व त्या कामगिरीकरतांच तो घोड्यावर स्वार झालेला असेल. त्याचें जीवितकार्य तें असतें तरी राजधानींतून घोडा फेकतांना दुतर्फा हवेल्यांतून लुकलुकणाऱ्या नेत्रांची त्याला पर्वा नसेल असें कसें होईल ? त्याला त्याच्या कामगिरीचा अभिमान आहे. तशीच लोकांच्या कौतुकाचीहि भूक आहे.

या मूल्यरक्षकाच्या भूमिकेमुळें माझ्या लिहिण्यांत थोडा फाजील त्वेष येतो असें माझ्या कांहीं टीकाकारांचें म्हणणें आहे. माझ्या एका अत्यंत विवाद्य ठरलेल्या लिखाणासंबंधीं पुण्याचें सुप्रसिद्ध इतिहासपंडित प्रो. पोतदार यांनीं मला विचारलें — "काय हो क्षीरसागर, तुमचे विचार मलाहि मान्य आहेत; पण त्यांत इतक्या त्वेषाची गरज काय ?"

मी माझ्या प्रिय मूल्यांना आणि विचारप्रणालीला, आकाशांतील माझ्या सर्वसाक्षी मालकाची मुलगी समजतों — व स्वतःला मी तिचा खिदमतगार समजतों, हें मी त्या इतिहासपंडिताला कसें सांगू ? पण सांगण्याची वेळ आली म्हणून, मित्रहो ! आज तुम्हांला मी सांगतों !

माझ्या दुसऱ्या एका टीकाकारानें — अहमदाबाद येथील एका प्रोफेसरानें — तर मला कापाकापी करीत सुटलेला शिलेदार असेंच म्हटलें होतें. कापाकापी करणारा माझा रूपहीन हात त्या टीकाकाराला दिसला; पण जिच्या जिवासाठीं मला ही बेमुर्वत कापाकापी करावी लागते तिचें नख जर माझ्या टीकाकारांना दिसेल तर त्यांना माझा हातच काय पण माझी हत्याहि सुंदर दिसेल !

" मी कां लिहितो ? " याचा इतिहास हा असा आहे ! वाचनाच्या आणि चिंतनाच्या बगीच्यांतून मी मूल्यरक्षणाच्या रणांगणावर येऊन पोहोचलों; Lotus - eating अथवा " कमलभक्षण " सोडून, मला कमलरक्षण करण्याची पाळी आली; व म्हणून पुस्तक खालीं ठेवून लेखणी हातीं घ्यावी लागली.

I slept and dreamt that life was beauty
I woke and found that life was duty.

ज्या अश्रद्ध आणि प्रक्षुब्ध युगानें मला या खडतर खटाटोपांत आणून सोडलें, त्याचा मी दावेदारहि आहे आणि शुक्रगुजारहि आहे !

नमस्कार !

# मी कां लिहितें ? १८

सौ. कमलाबाई टिळक.

'१०५ डिग्री ताप अंगांत असून काकूंनीं चहा केला, पण तो धुरकटला म्हणून संतापानें पंतांनीं तो कपासकट रस्त्यावर भिरकाविला, हें काकू शेजारणीला सांगू लागल्या तर तें श्रेष्ठ साहित्य ठरणार नाहीं; पण'—

हा 'पण'च सौ. कमलाबाई टिळकांनीं पूर्ण केला आहे. सर्वसामान्य काकूंच्या या आंतरिक तळमळीला, त्यांनीं शारदेच्या हृदयांत प्रवेश मिळवून दिला आहे. 'महाजनांनीं चोखाळलेल्या दिव्य पथावरील नम्र-पादचारी', असें जरी त्या स्वतःला म्हणवीत असल्या तरी आपल्या अनुभव-समृद्ध लेखणीनें, 'निस्पृह व नितांत' प्रीतीनें नटलेल्या स्त्रीहृदयाचीं गूढें उकलण्यांत, त्या आघाडीवर राहिलेल्या आहेत. त्या वेळीं महाराष्ट्राच्या कानांवर 'कळ्यांचे निश्वास' पडले नव्हते किंवा हिंदोळ्यावरील पुरोगामी झोक्यानें मराठी मनें आंदोलितहि झालीं नव्हतीं ! आज त्यांचा शब्द 'दूरचा नाद' वाटत असला तरी त्यांच्या लिखाणांत मराठी लेखिकांच्या लेखनशक्तीची उषःप्रभा सांठली आहे, हें कोणालाहि नाकारतां येणार नाहीं.

लेखनमूल्याच्या त्यांच्या या चर्चेला म्हणूनच एक महत्व आहे.

औरंगाबाद नभोवाणीनें "मी कां लिहितें ?" तें मला विचारलें. या प्रश्नाचें उत्तर द्यायला कागदलेखणी सरसावून टेबलापाशीं बसलें—पण लेखणीची कागदाशीं गांठ कितीवेळ पडेचना; खरंच, एकवेळ लिहणं सोपं पण आपण कां लिहितों हें सांगणें मात्र फारच अवघड !

लेखकालाच काय, कुठल्याहि कलाकाराला, "तूं कलानिर्मिति कां करतोस" हा प्रश्न विचारून पहा. पथ्थर, धातु यांच्या कठीण थराशीं झगडून नवनीतकोमल भासणारीं ललितांगें मूर्तिकार कां घडवतो बरं ? क्षणाक्षणांना नवनवीन रूपें धारण करणारीं सृष्टीचीं अनंत बहुविध दिव्य स्वरूपें, टिचभर कुंचलीनें हातभर फडक्यावर रंगविण्याची जीवपाड मेहनत चित्रकार कशासाठीं घेत असेल ? चार भिंती व एक छप्पर एवढें साधन, शीतोष्ण निवारणाला पुरें असतांना, नाना रंगढंगाचीं शिल्पें शिल्पकार दगडमातींतून उभविण्याची यातायात कां करतो बरं ? तसंच पाहूं गेलं तर क्षीरसागरांतील शीतमृदु शेषशय्येवरील सुखनिद्रा उपभोगण्याचें सोडून सर्वशक्ति परमेश्वरानेंहि सुखदुःखमय गुण-दोषयुक्त मानवी दुनिया निर्मिण्याचें तरी कष्ट कशासाठीं घेतलें असतील बरं ?

स्थलकालाच्या कोंडींत अडकून पडलेल्या दुबळ्या मनुष्यबुद्धीला कशीं सोडवतां येणार हीं गूढें ? "को ऽहम् को ऽहम्" "कोण मी" "कोण मी" असा प्रश्न करीत जगांत प्रवेश करणाऱ्या मानवजीवाला एवढ्या एक प्रश्नाचें उत्तरसुद्धां जग सोडीपर्यंत सांपडत नाहीं. मग पावलोंपावलीं कूट प्रश्नानें भरलेल्या या बहुरूपी दुनियेंत बावरलेल्या जिवाला "अज्ञानें मी दयाळा किती

जरी चुकलों तत्क्षमा त्वां करावी " असें त्या विश्वकर्त्याला विनवण्याखेरीज दुसरें काय करतां येणार ?

पण परमेश्वरानेंच मनुष्याच्या ठिकाणीं ठेवलेली कुतुहलबुद्धि " नेति नेति " म्हणून त्याला स्वस्थ कुठें बसूं देते ? वृक्षाशीं धडका घेणाऱ्या अवखळ छागशिशुप्रमाणें आपल्या अल्पबुद्धीनें जगताच्या कोड्याशीं मनुष्य झटपटतच असतो.

कलाकार कलानिर्मिति कां करतो ? साहित्यिक साहित्यनिर्मिती कां करतो ? या प्रश्नाचीं हीं उत्तरें नाना काळच्या व नाना देशच्या टीकाकारांनीं देण्याचा प्रयत्न केला आहे.

मम्मटाचें " काव्य यशसे अर्थकृते " हें प्रसिद्ध वचन मला विचार करतां करतां सुचलें व त्याच्या अनुरोधानें, " मी कां लिहितें " याचें उत्तर सापडतें का हें मी बघूं लागलें.

खरंच कां अर्थप्राप्तीसाठीं, नांव मिळवण्यासाठीं कवि, लेखक लिहितात ? राजाच्या दरबारांत, विद्वानांच्या मेळाव्यांत, प्रासंगिक काव्यें रचणारे कवि पैशासाठीं, मानासाठीं लिहीत असतील कदाचित् ! पण या विसाव्या शतकांत मराठी साहित्यिकांना जी अर्थप्राप्ति होते ती पाहिली म्हणजे केवळ पैशासाठीं लेखणी शिणवण्याची यातायात कोणी करीलसें वाटत नाहीं. कीर्तीविषयीं म्हणाल तर सध्यांच्या काळांत साहित्यिकांना यशोगुलालापेक्षां चिखलफेक भोगण्याचा संभव जास्त. उकरून काढलेले, टांगून ठेवलेले, ओढून टाकलेले सध्यांच्या मराठी साहित्यांतील वाद पाहिले म्हणजे

"भीक नको पण कुत्रा आवर" "कीर्ति नको-अनुल्लेख पत्करला" असेंच लेखकाला म्हणण्याची वेळ यावयाची.

पैशासाठीं नव्हे, कीर्तीसाठीं नव्हे मग लेखक कशासाठीं लिहितो बरं ?

मी सहज खिडकीबाहेर नजर टाकली. बाहेरच आंब्याचें झाड होतें. मोहोरानें तें डवरून गेलें होतें. वाऱ्याची झुळूक आली. आंब्याचें पान न् पान लवलवलें. तांबूस पालवीमागें दडलेल्या कोकिळेच्या अंगोपांगांना टपोऱ्या मोहोराच्या गुदगुल्या झाल्या व आनंदभरानें तिनें साद दिली.

कुहुऽऽऽ कुहुऽऽऽ कुहुऽ

तो गोड स्वर ऐकून माझेंहि हृदय थरारलें. मनांत विचार आला, "कां बरें ओरडते ही कोकिळा ? ओरडण्यापासून तिला कांहीं लाभ आहे कां ? बरें प्रसिद्धिलोलुपतेनें ओरडते म्हणावें, तर संकोची इतकी कीं शोधशोधूनहि नजरेस पडावयाची नाहीं !"

मम्मटाचे शब्द मला पुन्हां आठवले.

"सद्यःपरनिर्वृतये".

पटलें नि कोडें सुटलें.

कोकिळा ज्या कारणानें कुऽहुऽ करीत सुटते, तेंच कारण लेखकाला लिहायला लावतें. नवचैतन्यानें नटलेल्या वनश्रीशीं अवखळपणें खेळणाऱ्या मारुताच्या स्पर्शानें, मोहोराच्या मादक सुगंधानें ती वेडावून जाते व तो आनंद तिच्या चिमुकल्या हृदयांत मावेनासा

झाल्यामुळें कुहुऽऽ कुहुऽऽ कुहु करून ती जगभर विखरून टाकते.

त्याचप्रमाणें लेखकहि आपली "परनिवृत्ति", आपला पराकोटीचा आनंद आपल्या लेखनद्वारें हजारों वाचकांना वाटतो. परमेश्वरानें निर्माण केलेल्या या "चमत्कृतिनिधान" जगतांत क्षणोक्षणीं विचारवंत मानवाचें मन विस्मयानें व आनंदानें भरून जातें. प्रयत्नशाली मानवानें खनिज, उद्भिज व प्राणिज सृष्टीचा सखोल अभ्यास करून तिला करतलमलवत् करून टाकलें आहे. पण मानवी मनाचें अगम्य कोडें मात्र अद्यापि मानवाला सुटलें नाहीं. उदात्ततम व नीचतम साऱ्या तऱ्हेचे नमुने मनुष्यसृष्टींत भरलेले आहेत. ते बघतां बघतां नाना स्वभावांतल्या बारीक खुब्या न्याहळतां न्याहळतां एक प्रकारचा चिदानंद होतो. त्या आनंदांत दुसऱ्यांना सहभागी केल्याशिवाय राहवतच नाहीं व म्हणून लेखक लिहितो. याच कारणानें मीं स्त्रीहृदयाच्या अद्भुत कोड्यावर कित्येक गोष्टी लिहिल्या आहेत. स्वतः दुसऱ्यांवर सत्ता गाजविण्याची व दुसऱ्यांकडून स्वतःवर सत्ता गाजवून घेण्याची दुहेरी हौस असलेलें प्रणयिनीचें हृदय, वात्सल्याच्या ओढीनें महुरलेलें मातृहृदय, भगिनी, पत्नि, माता या तिन्ही अवतारांत सारख्याच निस्पृह व नितांत प्रीतीनें नटलेलें स्त्रीहृदय — स्त्रीस्वभावाच्या या विविध गूढ छटा भोंवतालच्या जगांत शुभाशुभ स्वरूपांत मी पाहतें व स्वांतरीं पटलेली ही खूण इतर मार्मिक जाणत्यांना पटवून देण्यासाठीं ललित लेखनांत गोवतें. माझें लिखाण वाचून एखादें हृदय जरी सहसंवेदनेनें क्षणभर थरारलें तरी मला माझ्या लिहिण्याचें सार्थक झालेंसें वाटेल.

जी गोष्ट आनंदाची तीच दुःखाची. विभागल्यामुळें द्विगुणीत होतो म्हणून आनंद दुसऱ्याला सांगावासा वाटतो तर विभागल्यामुळें अर्धे व म्हणून सुसह्य होतें, म्हणून दुःखांत दुसऱ्यांना सहभागी करावेंसें वाटतें. कोठल्याहि दृश्यानें, प्रसंगानें, अनुभवानें हृदयांत खळबळ उडाली, मनाची तळमळ झाली कीं, तिला शब्दसृष्टींत वाट फोडून दिल्याशिवाय लेखकाला वा कुठल्याहि कलावंताला राहवतच नाहीं.

" मा निषाद प्रतीष्ठां त्वमगमः शाश्वतीः समाः । "

ही आद्यकाव्यांतली प्रथयपंक्ति वरील सिद्धांताचें उत्तम उदाहरण होय. आद्यकवि महात्मा वाल्मीकि यांच्या थोर हृदयांतील तळमळीचें रामायण झालें. माझ्यासारख्या सामान्य व्यक्तीच्या तळमळीची अंकलिपि होईल कदाचित् पण प्रकार तोच, यांत कांहीं शंका नाहीं.

आंतरिक तळमळ हा श्रेष्ठ वाङ्मयाचा आत्मा आहे. अर्थात् ही तळमळ नेहमींच वैयक्तिक स्वरूपाची नसते व नसावीहि. " १०५ डिग्री ताप अंगांत असून काकूंनीं चहा केला पण तो धुरकटला म्हणून संतापानें पंतांनीं तो कपासकट रस्त्यावर भिरकावला—" हें काकू शेजारणीला सांगूं लागल्या तर तें श्रेष्ठ साहित्य ठरणार नाहीं. पण एखाद्या शब्दसृष्टीच्या ईश्वरानें आपल्या वाग्विलासाच्या किमयेनें काकूंच्या जागीं अखिल स्त्रीजातीचा साक्षात्कार घडविला कीं, अक्षरवाङ्मय जन्माला येईल व तें मम्मट म्हणतो त्याप्रमाणें " शिवेतर क्षति " अमंगलाचा नाश करील.

श्रीसद्गुरु रामदास म्हणतात,--

"नसता कवींचा व्यापार। तरी कैचा असता जगोद्धार।"

अगदीं खरें आहे हें. जग मोठें विचित्र आहे. बिरबल म्हणतो त्याप्रमाणें आंधळ्यांनीं भरलेलें आहे; जगाची रीत, "चोराच्या उलट्या"– कायशा म्हणतात ना त्याप्रमाणें आहे; साप म्हणून सोज्वळपणें भुई धोपटण्याची आहे. आंधळ्या समाजाकडून निष्पापां-वर होत असलेला अन्याय पाहून लेखकाचें हृदय कळवळतें व आपल्या गुणकारी पण गार अशा ललितलेखनाचें अंजन समा-जाच्या डोळ्यांत घालून तो वस्तुस्थिति त्याच्यापुढें लख्ख उभी करतो.

माझ्या अल्पशक्तीप्रमाणें समाजांतील अन्यायांवर प्रखर प्रकाश टाकण्याचा मीं प्रयत्न केला आहे. बाईचें पाऊल वांकडें पडलेलें समाजाला दिसतें; पण पोटच्या पोरांना अन्नाला लावण्या-साठीं, सरळ मार्गावर पोंचवण्यासाठीं, आर्थिक विषमतेनें भरलेल्या या जगांत एखाद्या बाईला नाखुषीनें वांकडा मार्ग स्वीकारावा लागला असेल, हें जगाच्या ध्यानांत येत नाहीं. मला "सगुणा" गोष्ट लिहावीशी वाटली, ती याच सत्यावर प्रकाश पाडण्याकरितां नवऱ्याला सोडून एकट्या राहणाऱ्या बाईकडे समाज डोळे वटारून बघतो. पण नवरा रेससारख्या दुर्व्यसनाच्या आहारीं जाऊन संसार धुळीस मिळवूं लागला; पोटच्या पोरासाठीं पोटाशीं बाळगून ठेव-लेल्या स्त्रीधनाचा अपहार करूं लागला तर खऱ्या "पतिव्रता" स्त्रीला कठोरपणें त्याला मार्गांतून दूर करावें लागतें, हें मला दिसलें

तेंसे तें दुसऱ्यांना दिसावें व पटावें म्हणून मला " पतिव्रता " गोष्ट लिहाविशी वाटली. लहान मुलांवरसुद्धां अज्ञानानें किती वेळां अन्याय होतो ! पुस्तकें फाडल्याबद्दल अनेक लहानग्या मीरा, तिरसट वागणुकीबद्दल अनेक चिमणे सुरेश, वडिलांचा अवमान करण्याबद्दल कित्येक छोटे मधु, अपमान व दंड भोगीत आहेत ! माझ्या " मीराचीं चित्रें ", " सुरेशची मोतीराणी ", " अन्याय " या गोष्टी वाचून एखादी आई जरी मुलांच्या वर्तनाकडे समंजसपणें पाहूं लागली व एखादा बालजीव जरी सुखावला तरी माझ्या लिहिण्याची सप्रयोजकता मला पटून माझ्या मनाचें समाधान होईल.

एकंदरीनें काय, साहित्यनिर्मितीचा उगम " सद्यः परनिवृत्ति," पराकोटीचा आनंद किंवा " शिवेतरक्षती " ची आंतरिक तळमळ यांत आहे. सुप्रवृत्त व स्नेहशील लेखक आनंदी जीवांना आनंदविण्यासाठीं, संकटग्रस्तांना धीर देण्यासाठीं, चुकलेल्यांना मार्ग दाखविण्यासाठीं व दुःखितांना शांतविण्यासाठीं लिहितो; म्हणूनच सद्गुरु रामदासांनीं " कवि दे आधार सकळ सृष्टीशीं " असा लेखकांचा गौरव करून त्यांना ग्रंथारंभीं नमन केलें आहे.

महाजनांनीं चोखाळलेल्या या दिव्यपथावरील मी एक नम्र पादचारी आहे.

# मी कां लिहितें ? १८

सौ. संजीवनी मराठे.

" कशास न कळे हा जिव आतुर
कसली त्यातें लागे हुरहुर ? "

असा प्रश्न सौ. संजीवनी मराठे आपल्या काव्यांत विचारतात. संध्या-फुलांच्या रम्यारक्त पाकळ्यांवर हळुवारपणें पाय ठेवीत रमणाऱ्या संध्याराणीची धुंद नाजुक मनोवृत्ति संजीवनींना लाभली आहे. " नयनांत नीज सांठवून, " स्वप्नें शोधीत फिरणाऱ्या तरुण जिवांची अकृत्रिम हुरहुर त्यांच्या काव्यांत थरथरतांना दिसते. म्हणून स्वप्नांच्या मधुमासांत गाणाऱ्या या कोकिळेच्या निरागस प्रेमगीतांना एक न्यारी खुमारी आली आहे. आसक्ति व अनघता यांचा सुंदर संगम त्यांच्या गीतांत झाला आहे.

एके ठिकाणीं त्या म्हणतात, " माझ्या मनाला पुष्कळदां वाटतें कीं, जाऊं दे तें काव्यलेखन ! पण म्हणून मी काव्यलेखन बंद मात्र कधींच केलं नाहीं ".

कां ? —

याचीच उकल त्यांनीं या लेखांत केली आहे.

मी कविता कां व कशा लिहितें हें माझ्या अनेक स्नेही-मंडळींना गूढ आहे. एकदां माझ्या एका मैत्रिणीनें लिहिलें होतें कीं, संसाराच्या एवढ्या व्यापसंतापांत काव्यलेखनाची उठाठेव मी कां करीत बसतें, याचें तिला नवल वाटतें. मी तिला उत्तर लिहिलें कीं, " बाई ग, काव्याची ही उठाठेव मी काय किंवा इतर कवि काय, आपल्या मनाच्या समाधानाकरितां आम्ही करीत असतों. काव्य-लेखनाचा माझ्या डोक्याला त्रास होतो खरा, पण एखादें सुंदर काव्य पुरें लिहून प्रसिद्धीला पाठविलें कीं, माझ्या साऱ्या कष्टांच्या दाम-दुप्पटीएवढा आनंद मला मिळून जातो ".

" मनाचें समाधान " एवढ्या दोन शब्दांच्या किल्लीनें हें कुलूप उघडूं शकणार नाहीं. तुम्ही म्हणाल, " हें काय हो, हें मनाचें समाधान कोणकोणत्या रितींनीं मिळवितां तुम्ही ? "

प्रश्न बरोबर आहे. कलाविलासामुळें जें समाधान कलावंताला लाभतं त्याचीं अनेक कारणें आहेत. पहिलें कारण म्हणजे कला-विलासामुळें मनुष्याला आत्मप्रगटीकरणाची संधि मिळते. जगांत मुक्या प्राण्यांपासून मनुष्यापर्यंत सर्व जीव आत्मप्रगटीकरणाकरितां धडपडत असतात. कुत्र्याला आनंद झाला कीं तें शेपूट हलवतें, उड्या मारतें, मांजर आनंद झालेला दाखविण्यासाठीं ' गुर्रगुर ' असा आवाज करीत तुमच्या अंगाला अंग घासूं पहातें, लहान मूल आनंद होतांच टाळ्या वाजवूं लागतें ! मोठीं मनुष्यें आपलें दुःख किंवा आनंद शब्दांनीं व हावभावांनीं तत्काळ प्रगट करूं पहातात.

... वाचनालय, ...



माझेंच पहाना, मी एकदां सुंदर चित्रपट पाहिला कीं, मी तात्काळ भेटेल त्या व्यक्तीला माझें मत प्रगट करून तो चित्रपट पाहून येण्याची गळ घालतें. आनंद दर्शवण्याच्या भरांत नाचतदेखील सुटतें. असो !

ही जी आत्मप्रगटीकरणाची तळमळ मनाला लागते ही कां लागत असावी बरें ? मला वाटतें कीं, मन असलेल्या प्रत्येक प्राण्याला सहानुभूतीची आवश्यकता असते. आपल्याला दुःख झालें तें दुसऱ्याला समजावें व त्यानें तें हलकें करण्याचा यत्न करावा या घटनेंत आपल्याला सुख वाटतें. माझें मन खिन्न झालें कीं, मी ——

कशास न कळे हा जिव आतुर
कसली त्यातें लागे तळमळ ?

असें लिहून ठेवतें. एखादा वाचक तें वाचतांच 'काय बरें कारण असेल ही कवयित्री उदास होण्याचें ?' असें म्हणेल. झालें, त्याची सहानुभूति मला मिळाली. माझा लेखनहेतु सफल झाला. दुसऱ्या कोणीं अशी सहानुभूति दाखवली, आपल्या अंतर्जीवनांत सहानुभूतीनें प्रवेश केला कीं, आपल्याला एक प्रकारचा आत्मविश्वास वाटूं लागतो. माझें एखादें प्रणयगीत चार रसिक वाचकांस आवडल्याचें समजतांच मला आनंद होतो. मी एकतरी सुंदर भावगीत लिहूं शकतें, असा मला विश्वास वाटूं लागतो. असल्या आत्मविश्वासाखेरीज कोणतेंहि कार्य नीट पार पडूं शकत नाहीं. आत्मविश्वास असलेला कलावंत आपले विचार निर्भयपणें रसिकांपुढें मांडतो व

त्यांतील तडफेमुळें त्याची कलाकृति अधिक तेजस्वी व परिणामकारक ठरत असते. " आम्ही कोण म्हणून काय पुसतां ? आम्ही असूं लाडके देवाचे - " या ओळी केशवसुतांच्या आत्मविश्वासानेंच त्यांना लिहावयास लाविल्या.

काव्यनिर्मितीच्या पोटीं अनेक वेळीं एक प्रकारच्या विशिष्ट आनंदाची आशा कलावंतानें धरलेली असते. या आनंदाला आपण पुनःप्रत्ययाचा आनंद म्हणूं या.

मीं कोणावर तरी प्रेम केलेलें असतें व त्या प्रेमाचें वर्णन मी जेव्हां जेव्हां काव्यांत करूं पहातें तेव्हां तेव्हां माझ्या प्रेमाच्या गतस्मृति उचंबळून येऊन फिरून एकवार माझें मन आनंदीत करून जातात. एखाद्या बालकाकरितां निद्रागीत लिहूं लागलें कीं, माझेंच लहान बाळ पाळण्यांत खेळत आहे, असें दृश्य माझ्या डोळ्यांपुढें नाचूं लागतें. त्या वेळीं जो आनंद मला अनुभविण्यास मिळतो त्यालाच मी पुनःप्रत्ययाचा आनंद म्हणतें. मनुष्याजवळ कल्पनाशक्ति व भावसुलभता जितकी जास्त तितक्या जास्त प्रमाणांत हा पुनःप्रत्ययाचा आनंद त्यास लाभूं शकतो.

माझ्या मनालादेखील पुष्कळदां वाटतें कीं, जाऊं दे तें काव्यलेखन ! पण म्हणून मीं काव्यलेखन बंद मात्र कधींच केलें नाहीं. मला असें वाटतें कीं, निसर्गानें प्रत्येकाला कसली ना कसली तरी शक्ति दिलेली असते आणि तिचा उपयोग त्यानें प्राणि-

मात्राच्या सेवेसाठीं करावा असें त्यास वाटत असतें. चित्रकारानें चित्रें काढावीं, गायकानें गायन करावें, लेखकानें लेखन लिहावें, बुद्धिवंतानें समाजव्यवस्था निर्माण करावी, हें सर्व त्यांनीं आपल्या संगतींतील जगाचें हित करण्याकरितां करावें. सुंदर चित्रें पाहून मनाला आल्हाद वाटतो, मनोरंजक कादंबरी वाचून जीवनाचीं कोडीं उलगडूं शकतात, श्रुतिमधूर गायन ऐकतांच शरीर व मनाच्या व्याधि क्षणमात्र नाहींशा वाटतात, हा कांहीं कलेपासून कमी फायदा होत नाहीं! कथालेखकानें एखाद्या करुण कथेनें एखाद्या विषयाकडे जगाचें लक्ष वेधावें व ती कथा अधिक परिणामकारक व्हावी म्हणून एखाद्या चित्रकारानें तिच्यावर रेखाचित्र काढून द्यावें; कवींनीं स्फूर्तिदायक रणगीतें लिहावीं व तीं गात गात सैनिकांनीं मैलचे मैल अंतर झपाझप कापावें, — या कल्पना किती उदात्त वाटतात! त्यामुळें जगांत सर्वत्र सहकार्य नांदूं शकतें. प्रत्येक गोष्टीचा जास्तींत जास्त विकास होऊं शकतो!

प्रत्येक कलावंतानें जगांतील या सहकार्यास हातभार लावला पाहिजे. आपल्या कलाकृतीनें एखाद्यास स्फूर्ति मिळावी, एखाद्याचें मन आल्हादित व्हावें, जगांत एखाद्या तरी सुंदर गोष्टीची भर पडून जग अधिक सुंदर व्हावें, असें प्रत्येकाला वाटावें. मला असेंच वाटतें आणि त्या वाटण्यामुळेंच माझें काव्यलेखन सतत चालूं रहाणें शक्य होतें. कलानिर्मिति ही मनाच्या समाधानासाठीं होते हें मी आतांपर्यंत आपणाला अनेक उदाहरणें देऊन समजावून दिलें आहे. हें मनाचें समाधान जसें आत्मप्रगटीकरण झाल्यानें,

स्वानुभवाचा पुनःप्रत्यय मिळाल्यानें किंवा रसिकांकडून सहानुभूति लाभल्यानें मिळतें. तसेंच तें आणखी एका महत्वाच्या कारणानेंहि लाभत असतें. मनुष्य जन्मल्यापासून कांहीं सहजप्रवृत्ति त्याच्यांत वास करीत असतात. त्यांमध्यें घटनाप्रवृत्ति फार महत्वाची असते. कांहींतरी घडवायचें, पाडायचें, पुन्हां घडवायचें, असें मनुष्य सारखें करीत असतो, आणि हें करीत असतांना त्याला मनस्वी आनंद होत असतो. या आनंदाला आपण निर्मितीचा आनंद असें म्हणूं. अगदीं बालवयापासून मनुष्य ही प्रवृत्ति प्रामुख्यानें व्यक्त करीत असतो. ठोकळ्यावर ठोकळा रचून त्याचा मनोरा करावयाचा व तें पाहून आनंदानें टाळया पिटावयाच्या हें दृष्य प्रत्येक घरांतील मुलाकडून आपण पाहूं शकतों. वाळूचे किल्ले बांधणें, खडूनें कल्पनेंतील हत्ती, घोडे रेखाटणें, मातीचीं चूलबोळकीं घडविणें, ह्या सर्व गोष्टी मुलें हा निर्मितीचा आनंद लुटण्याकरितांच करीत असतात. मनुष्याला क्रियाप्रवण बनविण्याकरितां या प्रवृत्तीचा फार चांगला उपयोग होतो. चित्रकार कुंचल्यानें आपली कल्पनासृष्टि प्रत्यक्षांत आणीत असतो, गायक स्वरांचीं विश्वें निर्मूं पाहातो, कवि व लेखक शब्दसृष्टीचे ईश्वर बनूं शकतात. आपलीं स्वप्नें सत्यांत आणूं पाहाण्याच्या या खटाटोपालाच कलानिर्मिति म्हणतां येईल व या निर्मितीपासून होणारा आनंद 'ब्रम्हानंद सहोदर' मानतां येईल. कोणतीहि उत्कृष्ट कलाकृति पार पाडल्यावर मनाला लाभणाऱ्या या असीम आनंदासाठीं कलावंताचें मन सारखें आसावलेलें असतें. विश्वाच्या असंख्य घडामोडींवर विचार करून

त्यांतील गुणदोष आपल्या मताप्रमाणें निवडून काढून आपली प्रतिसृष्टि घडावयाची हें प्रतिभावंताचें आवडतें कार्य असतें व तें तो आपल्या मनाच्या समाधानाकरितां आमरण करीत राहतो. मी अशी मोठी कलावंत नाहीं खासच. पण माझें मन मात्र खचित कलावंताचें आहे. वर वर्णिलेल्या सर्व प्रकारच्या समाधानाचा त्याला अतोनात हव्यास आहे आणि तो पुरा करण्याच्या वेड्या आशेनेंच आजवर मी माझी साधीसुधी साहित्यसेवा करीत आलें आहें.

# मी कां लिहितों ? १०

## श्री. कुसुमाग्रज
### ( श्री. वि. वा. शिरवाडकर )

चाळिशीच्या अलीकडील पहिल्या पांच मराठी ललितलेखकांत कवि कुसुमाग्रजांची गणना होते. त्यांच्या प्रतिभेचा आविष्कार यौवनासारखा दुर्दम्य व मादक आहे.

मानवतेवरील अन्यायाविरुद्ध आपल्या प्रतिभेचें शस्त्र करून लढणारा ध्येयवादी कवि व साहित्यिक असें श्री. वि. स. खांडेकरांनीं कुसुमाग्रजांचें वर्णन केलें आहे, तर श्री. प्रभाकर पाध्ये यांनीं नवकवीतेचा अग्रदूत असें त्यांना संबोधिलें आहे.

" जी गोष्ट तुम्हांला अन्याय्य व दुष्ट वाटेल तिच्या संहारासाठीं अवघ्या जीवनाचें शस्त्र करा ", असे उद्गार त्यांनीं ' वैष्णव ' कादंबरींतील मालोजी महाराज या पात्राच्या तोंडीं घातले आहेत; आणि सामर्थ्याचें व सौंदर्याचें हेंच आवाहन व आकर्षण त्यांच्या ' विशाखा ', ' समिधा ' व ' दुसरा पेशवा ' या पुस्तकांतून प्रत्ययास येतें.

प्राचीन व अर्वाचीन अशा बहुतेक कवि-लेखकांनीं प्रतिभा ही गूढ दैविशक्ति आहे, असें कल्पिलें आहे; तर कांहीं आधुनिकांनीं तिला वेडाचा ' झटका ' असेंच नाव दिलें आहे. परंतु कवि कुसुमाग्रज साहित्याच्या या सृजनशील प्रतिभेचें, व तिचें एक वाहन जी काव्यकला तिचे, ' सामान्य साधनाचा असामान्य उपयोग ' असें वर्णन करतात. कां ?

... वाचनालय ...



काहीं प्रश्न विचारायला सोपे परंतु उत्तर द्यायला फार कठीण असे असतात. 'तूं का लिहितोस ?' हा लेखकाला विचारण्यांत येणारा प्रश्नहि त्याला विचारांत आणि संकटांत टाकणारा आहे.

कोणत्याहि घटनेला दोन प्रकारचीं कारणें असतात. काहीं नैमित्तिक असतात, काहीं मूलगामी असतात. विजेचा दिवा लागला जाणं या गोष्टीचं नैमित्तिक अथवा नजीकचं कारण, भिंतीवरील कळ खालीं दाबणं हें होय. परंतु त्याचं मूलगामी कारण याहून वेगळं आहे. यासाठीं विद्युतशास्त्रांत आपणाला प्रवेश करावा लागेल. नजीकचीं कारणं चटकन समजून येण्यासारखीं असतात.

'मी का लिहितों ?' याचें उत्तर या दृष्टीनें देणें फारच सुलभ आहे. कोठल्यातरी संपादकाचं पत्र येतं म्हणून मी लिहितों; निदान अर्धवट लिहिलेलं असेल तें पुरं करतों; मला पैशाची आवश्यकता असते म्हणूनहि मी लिहितों; मला कीर्ति लाभावी म्हणूनहि कदाचित् मी लिहीत असेन. हीं सारीं कारणं सर्वांच्या बाबतींत कमी अधिक प्रमाणांत खरीं असतात, आणि तरीहि हीं काहीं खरीं कारणं नव्हेत. जेव्हां कोठल्याहि संपादकाचं मला पत्र येत नव्हतं, किंबहुना मी पाठविलेला मजकूर परत पाठविण्यापुरतांच त्यांचा माझा संबंध येत होता, तेव्हांहि मी लिहीत होतों. पैसा अथवा कीर्ति यापैकीं काहींहि मिळण्याची अपेक्षा अथवा शक्यता निर्माण होण्यापूर्वींच अनेक थोर साहित्यिकांनीं जगाच्या वाङ्मयांत महत्वाची भर घातलेली आहे. तेव्हां 'मी का लिहितों ?' या प्रश्नाचें उत्तर

देण्यासाठीं हीं नजीकचीं कारणं ओलांडून जरा पलीकडे जावं लागेल. निदान जाण्याचा प्रयत्न करावा लागेल.

'नाना चातुर्याच्या मूर्ति । कीं हे साक्षात् बृहस्पति ।' असें रामदास स्वामींनीं कवींचें म्हणजेच साहित्यकारांचें वर्णन केलें आहे. सनातन काळापासून या चातुर्याच्या मूर्ति अनेक गहन प्रश्नांचीं उत्तरें देण्याचा प्रयत्न करीत आहेत. अनेक जीवनविषयक समस्यांची पूर्तता करूं पहात आहेत. परंतु 'मी कां लिहितों ?' हा प्रश्न या क्षेत्रांतील नामांकित बृहस्पतींनाहि कांहींसा निरुत्तर करणारा आहे. निदान त्याचें स्वतःला आणि इतरांना पटेल असें प्रामाणिक आणि निश्चित उत्तर देणें सर्वच साहित्यिकांना आजवर कठीण गेलें आहे. याचें एक कारण स्पष्ट आहे. इतरांच्या मनोवृत्तींचें विश्लेषण करणारा साहित्यिक स्वतःचें मनोविश्लेषण करण्यास समर्थ असतोच असें नाहीं. किंबहुना कांहीं पूर्वग्रहांचें अथवा दुराग्रहांचें पटल त्याच्या मनावर असल्यानें असें करण्यास तो असमर्थच असणें अधिक संभवनीय. हा कठीण प्रसंग टाळण्यासाठींच मला वाटतं, स्फूर्तीची अथवा ईश्वरी प्रसादाची एक अमोघ क्लृप्ति पूर्वकाळच्या कवींनीं शोधून काढली. झाडाला फळें येतात, झऱ्याला पाणी येतें, आकाशांत ग्रहनक्षत्रें उगवतात, त्याचप्रमाणें कवीला कविता येतात, असा समज या काळांत पसरून देण्यांत आला. स्फूर्ति अथवा ईश्वरी प्रसाद म्हटल्यावर कारणमिमांसेची जबाबदारी शिल्लकच राहात नाहीं. गुलाबाला विशिष्ट रंगाचीं, आकाराचीं आणि सुगंधाचींच फुलें कां येतात आणि तशीं तीं

दुसऱ्या ऐखाद्या रुक्ष रोपट्याला कां येत नाहींत याचें कारण कोण सांगूं शकणार? ही केवळ ईश्वरी योजना आहे. ईश्वरी प्रसादाच्या या समजुतीनें दुहेरी फायदा झाला. आपण कां लिहितों हें सांगण्याची अथवा त्यासंबंधीं कांहीं विधिनिषेध बाळगण्याची कवींना आवश्यकता उरली नाहीं. त्याप्रमाणें मानवी सृष्टींत देवाचे अधिक लाडके म्हणून श्रेष्ठ, निदान विशिष्ट, स्थान त्यांना संपादन करतां आलें. पूर्वींच्याच कवींनीं नव्हे तर कांहीं आधुनिक कवींनींहि अशाच प्रकारचा आशय व्यक्त केल्याचें आपल्याला आढळून येतें.

या ईश्वरी प्रसादाच्या अथवा स्फूर्तीच्या कल्पनेंत कांहीं सत्यांग आहे काय? कीं कवि इतर कल्पना करतात त्याप्रमाण हाहि त्यांचा एक कल्पनाविलास आहे? खरोखर कवि हे देवाचे लाडके असतात कां? काळोख्या रात्रीं वीज लखलखावी आणि सारें आसमंत क्षणभर प्रकाशांत न्हाऊन निघावें, त्याप्रमाणें एरव्हीं सामान्य आणि क्षुद्र असलेल्या माणसांत स्फूर्तीचा संचार होतो आणि त्याच्या हातावर अथवा हृदयावर काव्याचें अलौकिक दान पडतें, हें खरं आहे कां? मोठ्या कवींच्या पंक्तींत बसण्याची माझी महत्वाकांक्षा नाहीं. पण 'मी कां लिहितों?' या शीर्षकांत 'मी' या एकाक्षरी शब्दाला कांहींसें महत्व असल्यानें, माझा अनुभव म्हणून मी सांगतों कीं, या स्फूर्तीच्या कल्पनेंत फारसें तथ्य नाहीं तर सभोंवारच्या जीवनांतूनच त्याच्या अंतःकरणांत ती प्रवेश करते. कवीच्या संस्कारशील मनावर सभोंवारच्या संसाराचे जे ठसे उमटतात, तेच तो विशिष्ट पद्धतीनें प्रगट करतो. मी संसार म्हणतों तेव्हां मानवी व्यवहारच मला

अभिप्रेत आहे असें नाहीं. भोंवतालच्या मानवींच नव्हे तर मानवेतर सृष्टींतहि ज्या घडामोडी होतात, जे देखावे दिसतात, त्यांतील संवादी घटनांविषयीं अनुकूल आणि विसंवादी घटनांविषयीं प्रतिकूल विचार अथवा भावना कवि आपल्या काव्यांत नमूद करून ठेवतो. सारंगीच्या मुख्य तारा छेडल्या म्हणजे तिच्या इतर दुसऱ्या तारांना कंप येऊन त्या नादमय होतात. संसार आणि कवि यांच्यांतील संबंध अशाच प्रकारचा आहे.

काव्याची उभारणी जीवनावर असली तरी कवि कां लिहितो या प्रश्नाचें उत्तर तेवढेंच लक्षांत घेतल्यानें मिळूं शकत नाहीं. कवींच्याच जीवनाचा समुद्र उसळत असतो असें नाहीं. सर्वच लोक जीवन जगत असतात, त्यांच्या भल्याबुऱ्या प्रतिक्रिया त्यांच्या मनावर होत असतात. मग कवींना त्या व्यक्त कराव्याशा कां वाटतात ? याचें उत्तर असें कीं, हें या बाबतींत खरोखरच अपवाद नसतात. जें आपल्याला वाटतें तें व्यक्त करणें, कोणाला तरी सांगणें, ही माणसाची एक स्वभावसिद्ध प्रवृत्ति आहे. या प्रवृत्तीचा व्यवहार कोणत्याना कोणत्या स्वरूपांत सर्वत्र आणि सर्वकाळ चालू असतो. कवि हा आपल्याला सांगावयाचें तें विशिष्ट रीतीनें सांगत असतो, आपल्याला वाटतें तें विशिष्ट रीतीनें व्यक्त करीत असतो, हेंच त्याचें वैशिष्ट्य होय. प्रखर भावना अथवा संस्कारक्षमत्व या गोष्टी कवीपुरत्याच मर्यादित नाहींत. त्या इतरांजवळहि तितक्याच किंबहुना अधिक प्रमाणांतहि आढळून येऊं शकतील, पण कवि हा आपल्या भावनांचें, आपल्या निष्ठांचे, आपल्या व्यक्तित्वाचें एक लहानसें परंतु अभेद्य असें घरकुल करून त्यामध्यें राहात असतो,

१२८ आ. नं. ९८

जगत असतो. या तटबंदीमुळें जें एरव्हींच्या व्यवहारांत असत्य अथवा क्षुल्लक वाटतें तें त्याच्या हिशेबीं सत्य अथवा महत्वाचें ठरतें. या त्याच्या प्रवृत्तीमुळें त्याला एक प्रकारचा 'आपलेपणाहि' येतो. प्रत्यक्ष व्यवहारांत आपले समानधर्मी त्याला सांपडत नाहींत. आणि सांपडले तरी त्याला वाटतें तें सांगण्याचें सामर्थ्य व्यावहारिक भाषेंत असत नाहीं. "They talk to themselves loud and the world overhears them" हें 'कँडिडा'तील कवीनें कवीचें केलेलें वर्णन या दृष्टीनें खरेंच आहे. व्यावहारिक रीति आत्म-विष्कारासाठीं असमर्थ ठरल्यानेंच कवीला विशिष्ट रीतींचा आश्रय घ्यावा लागतो.

समोंवारच्या जीवनांतून काव्य आपलें जीवन शोधीत असतां किंबहुना तें सर्वस्वीं त्यावरच अवलंबून असतां, ईश्वरी प्रसादाची अथवा स्फूर्तीची कल्पना अवास्तव ठरल्याशिवाय कशी राहील? प्रतिभा अथवा कल्पनाशक्ति ही जन्मसिद्ध असूं शकेल पण केवळ स्वतःच्या बळावरच ती काव्यरूपानें प्रगट होऊं शकणार नाहीं. कोणत्याहि जड पदार्थाप्रमाणें तिला कसला तरी आधार, कसला तरी आश्रय जरूर असतो.

'क्रांतीचा जयजयकार' ही कविता वृत्तपत्रांतील बातम्या वाचून मला लिहाविशी वाटली. तींत व्यक्त झालेल्या भावना पूर्वी अंतःकरणांत जरूर होत्या.पण त्या भावनेला तुरुंगांत घडलेल्या त्या विशिष्ट घटनेचा आधार मिळाला आणि नंतर ती पद्यरूपानें

नगर वाचनालय, सातारा.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

प्रगट होऊं शकली. शिवाय माणसाची भावना तरी स्वयंभू कोठें असते ? त्याच्या मनावर जे प्रत्यक्ष अप्रत्यक्ष संस्कार सारखे होत असतात त्या संस्कारांचाच परिणाम त्याच्या विशिष्ट भावनांत, विशिष्ट मनोवृत्तीमध्यें होत असतो. या भावना, ही मनोवृत्ति त्याला प्रगट करावीशी वाटते, सौंदर्यपूर्ण रीतीनें प्रगट करावीशी वाटते आणि म्हणून तो काव्य लिहितो. म्हणून ' मी कां लिहितों ' या फार गहन प्रश्नाचें फार साधें उत्तर ' मला लिहावेंसें वाटतें म्हणून मी लिहितों ' हें आहे. लिहावेसें वाटणें याच गोष्टीला स्फूर्ति अथवा ईश्वरी प्रसाद असें नांव द्यायचें असेल तर गोष्ट वेगळी, तसें तें देऊन कवि आणि काव्य यांच्याभोंवतीं अलौकिकत्वाची प्रभावळ उभी करण्याची आवश्यकता आहे, असें मात्र मला वाटत नाहीं.

दुसरा एक प्रश्न या ठिकाणीं उपस्थित होऊं शकतो. वृक्ष आपल्या मुळयांच्या द्वारां भोंवतालच्या जमिनींतून जीवनसत्व ओढून घेतो. त्याप्रमाणें कवि आपल्या वेढणाऱ्या संसारांतून, सृष्टींतून काव्य-जीवन ओढून घेतो, संपादन करतो, हें खरें; परंतु जें संपादन केलें त्याचा काव्यांत सुंदर, रसपूर्ण आविष्कार करण्याचें जें कौशल्य कवीजवळ असतें तें तरी दैवी नाहीं काय ? साध्या विषयांतील मोठा आशय तो मधुर, परिणामकारक गीतांत व्यक्त करतो. या त्याच्या सामर्थ्यालाच स्फूर्ति म्हणतां येणार नाहीं काय ? मला वाटतें येथें सुद्धां मोठ्या आणि गूढ शब्दांचा उपयोग करण्याचें कारण नाहीं. काव्य हा भाषेचा एक उपयोग आहे, आणि भाषा